
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई चे

# वार्तापत्र



२५ नोव्हेंबर २००६

## मा. यशवंतराव चव्हाण यांच्या

### २२व्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन




'मा. यशवंतराव चव्हाण आणि आजचा महाराष्ट्र' मा. यशवंतराव चव्हाण जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यान - डावीकडून व्याख्यान देतांना मा. आ. श्री. उल्हास पवार, डॉ. चंद्रभान भोयर, श्री. विजय मोटघरे, श्री गिरीश गांधी, श्री. विजय जिचकार, डॉ. अक्षयकुमार काळे.
(नागपूर)

'मर्ढेकरांची कविता : आकलन, आस्वाद आणि चिकित्सा' या डॉ. अक्षयकुमार काळे यांच्या ग्रंथांचा प्रकाशन समारंभ, डावीकडून प्रकाशक श्री सचिन उपाध्याय, डॉ. अनिल नितनवरे, डॉ. निशिकांत मिरजकर, श्री. ना. धो. महानोर, डॉ. श्रीकांत तिडके, श्री. श्याम माधव धोंड.
(नागपूर)







'मुलांचे आरोग्य पालकांच्या हाती' या पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी प्रमुख अतिथी डॉ. स्नेहलता देशमुख, नाशिक विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. विनायकदादा पाटील व मान्यवर.
(नाशिक)

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि. नं. एफ. १०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि. नं. एम. एम. एच./बी. ओ. एम.-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जन. जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१.

## • विश्वस्त मंडळ सदस्य •

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. श्री. हुसेन दलवाई | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. अरुण गुजराथी | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. डॉ. रवींद्र बापट | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. मोहन धारिया | |
| ७. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ८. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| ९. | मा. प्रा. पी. बी. पाटील | |
| १०. | मा. श्री. राम प्रधान | |
| ११. | मा. श्री. गुलाम गौस | |
| १२. | मा. श्री. लक्ष्मण माने | |
| १३. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| १४. | मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे | |
| १५. | मा. सौ. सुप्रिया सुळे | |
| | **महाराष्ट्र शासन प्रतिनिधी** | |
| १६. | मा. श्री. सुभाष लाला, मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव | |
| १७. | महाराष्ट्र शासन प्रतिनिधी | |

## • कार्यकारिणी मंडळ सदस्य •

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. हुसेन दलवाई
३. मा. श्री. अरुण गुजराथी
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. डॉ. रवींद्र बापट
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धों. महानोर
९. मा. श्री. बापूसाहेब काळदाते
१०. मा. श्री. रा. सु. गवई
११. मा. श्री. एन. के. पी. साळवे
१२. मा. श्री. के. बी. आवाडे
१३. मा. श्री. खा. श्रीनिवास पाटील
१४. मा. श्री. गिरीश गांधी
१५. मा. सौ. सुप्रिया सुळे
१६. मा. श्री. शिवाजीराव गि.पाटील
१७. मा. श्री. अंकुशराव टोपे
१८. मा. श्री. अप्पासाहेब ऊर्फ सा. रे. पाटील
दत्त सहकारी साखर कारखाना लि., शिरोळ
१९. मा. श्री. शामराव पा. पाटील
मा. अध्यक्ष, सह्याद्री सहकारी साखर कारखाना, कराड (पदसिद्ध)
२०. मा. श्री. अशोक मारुतराव घुले-पाटील
२१. मा. श्री. माणिकराव पाटील
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिद्ध)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२२. मा. श्री. सुभाष लाला,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव

## कार्यकारी समिती

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. श्री. हुसेन दलवाई
३. मा. श्री. अरुण गुजराथी
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. डॉ. रवींद्र बापट
६. मा. श्री. ज्ञानेश्वर खैरे
७. मा. सौ. सुप्रिया सुळे

---

**नवनियुक्त विश्वस्त व कार्यकारिणी सदस्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा !**

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई

| | | |
|---|---|---|
| विभागीय केंद्र, कऱ्हाड | अध्यक्ष | श्री. राम प्रधान |
| विभागीय केंद्र, पुणे | अध्यक्ष | श्री. ज्ञानेश्वर खैरे |
| विभागीय केंद्र, नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| विभागीय केंद्र, नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| विभागीय केंद्र, रत्नागिरी | अध्यक्ष | श्री. भाऊसाहेब नेवाळकर |
| विभागीय केंद्र, औरंगाबाद | अध्यक्ष | श्री. नंदकिशोर कागलीवाल |
| विभागीय केंद्र, लातूर | अध्यक्ष | श्री. प्रा. जनार्दन वाघमारे |
| मुख्य कार्यालय | आर्थिक सल्लागार | श्री. व्ही. गणपती |
| सृजन | संकल्पना व संयोजिका | श्रीमती सुप्रिया सुळे |
| महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती विजया चौहान |
| नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. ज्ञानेश्वर खैरे |
| सांस्कृतिक विभाग | निमंत्रक | श्री. विनय नेवाळकर |
| | | श्री. सुनिल वालावलकर |
| मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सचिव | श्री. म.बा. पवार |
| वार्तापत्र | मानद संपादक | श्री. दत्ता बाळसराफ |
| यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय | ग्रंथालय सल्लागार | श्री. वा.रा. कामत |
| | ग्रंथपाल | श्री. अनिल पाझारे |
| यशवंतराव चव्हाण सभागृह व कलादालन | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर-श्री. सुशील गुप्तन |
| | मुख्य विपणन अधिकारी | श्री. विक्रम वासुदेव |
| प्रथम-प्राथमिक शिक्षण उपक्रम | कार्यकारी सचिव | श्रीमती फरीदा लांबे |
| मानद वास्तु विशारद | | मे. शशी प्रभू ॲण्ड असोसिएटस् |
| संविधिक लेखा परिक्षक | | मे. सी.व्ही.के. असोसिएटस्, मुंबई |
| अंतर्गत हिशोब तपासनीस | | मे. व्ही.एन. खांडेकर आणि असोसिएटस् |

## विचारधन



सहकारी साखर धंदा ही महाराष्ट्राची अभिमानास्पद कमाई आहे, असे मी मानतो. त्याच्याकडे जिव्हाळ्याने पहायला पाहिजे. त्यात काही दोष निर्माण झाले असतील तर ते दूर करण्याकरिता सहानुभुति व विधायक दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. त्याच बरोबर या क्षेत्रांत एकाधिकारशाहीची प्रवृत्ती आपले डोके वर काढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.या नवनेतृत्वाने आपल्या अनुभवाचे व सत्तेचे विकेंद्रीकरण करून या क्षेत्रात दुसरी-तिसरी पिढी निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे, असे मला मुळीच दिसत नाही.

— यशवंतराव चव्हाण

## अनुक्रमाणिका


संपादकीय.......................................... ५

भाषणातले यशवंतराव.......................................... ७

उपक्रम :-

महाराष्ट्र महिला व्यासपीठ कार्यवृत्त.......................................... १३

नवमहाराष्ट्र युवा अभियान कार्यवृत्त.......................................... १५

कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम कार्यवृत्त.......................................... २३

रंगस्वर कार्यवृत्त.......................................... २५

सृजन कार्यवृत्त.......................................... २६

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय कार्यवृत्त.......................................... २७

माहिती आणि तंत्रज्ञान प्रबोधिनी.......................................... २८

कृषी सहकार व्यासपीठ व पुणे विभागीय केंद्र-कार्यवृत्त.......................................... २९

कऱ्हाड विभागीय केंद्र, कार्यवृत्त.......................................... ३३

नागपूर विभागीय केंद्र कार्यवृत्त.......................................... ३७

नाशिक विभागीय केंद्र कार्यवृत्त.......................................... ४३

कोकण विभागीय केंद्र कार्यवृत्त.......................................... ४४

औरंगाबाद विभागीय केंद्र कार्यवृत्त.......................................... ४५

सन्मानपत्र - मा. भवरलाल जैन.......................................... ४६



वर्ष : नववे अंक : अठरावा

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे**

वार्तापत्र

खाजगी विनामूल्य वितरणासाठी

• **प्रकाशन**

२५ नोव्हेंबर २००६

मा. यशवंतराव चव्हाण यांची २२ वी पुण्यतिथी

• **सल्लागार**

मा. शरद काळे

मा. रवींद्र बापट

मा. ज्ञानेश्वर खैरे

• **संपादक मंडळ**

सुनिल वालावलकर

विद्याधर खंडे

ॲड. संघराज रुपवते

• **मानद संपादक**

दत्ता बाळसराफ

• **आभार**

प्रतिष्ठानचे सर्व अधिकारी, कर्मचारी व कार्यकर्ते यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार

• **अक्षरजुळवणी आणि छपाई**

सानप प्रिन्टींग प्रेस, मुंबई - २.

हे त्रैमासिक मुद्रक-प्रकाशक-संपादक **श्री दत्ता बाळसराफ** यांनी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई करिता, **सानप प्रिन्टींग प्रेस** ३६२, जगन्नाथ शंकरशेट मार्ग, ठाकुरद्वार पोष्टाशेजारी, मुंबई - ४०० ००२ दूरध्वनी क्र. : २२०१ ०६२२ येथे छापून यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१, येथून प्रकाशित केले.

नोंदणी क्र. ७१५८७/९९

# प्रतिसाद

**Mrs. Indrani Charles**
Deputy Director
Phone: 23034892
Telegram : LOKSABHA,
NEW DELHI
FAX : 23010756

D.O. No.17/34/2006(Acq)LY
LOK SABHA SECRETARIAT
PARLIAMENT HOUSE
NEW DELHI-110001

25th July, 2006

Thanks for presenting the book titled "Parliamentary Privileges, Judiciary and the Press" organised by Yashwantaro Chavan Pratishthan for addition to the Parliament Library.

The book has been added to the Parliament Library and I hope this will prove to be a valuable source of information for the members of Parliament and other users of the Library.

Yours sincerely,
(Indrani Charles)

**Shri. S. G. Kale**
General Secretary,
Yashwantrao Chavan Pratishthan
Gen. Jagannathrao Bhonsle Marg,
Mumbai-400 021.

---

मा. महोदय,

मी नितीन सिद्धार्थ धंदरे, बुलडाणा, तुम्ही मला दोन पुस्तके (अनुभव विश्वे) पाठविलीत. १) स्मरण साहेबांचे, २) पक्षी जाय दिगंतरा या बद्दल मी तुमचे मनःपूर्वक आभार मानतो.

विद्यार्थी जीवनामध्ये केवळ तीच ती शालेय पुस्तके वाचून मला कंटाळा आला होता. मात्र माझा अभ्यासाचा शीण घालवून पुन्हा एकदा प्रसन्न ताजे करण्याचे कार्य या दोनही पुस्तकांनी केले.

''स्मरण साहेबांचे'' हे पुस्तक (यशवंतरावांचे अनुभव विश्व) मला खुपच आवडले. बाहेरच्या जगातील नामांकित व्यक्ती कौटुंबिक जीवनात किती हळव्या असतात, हे समजले. त्यातून यशवंतरावांचे अनेक पैलू दर्शनास येतात.

तसेच ''पक्षी जाय दिगंतरा'' हे पुस्तक मानवाला त्याच्या मानवी जीवनातून नकळतच पक्षी जीवनात घेवून जाते. पक्ष्यांचे भावविश्व आकाशाप्रमाणेच सर्वव्याप्त असते. याच्या वाचनामुळे मलाही पक्षीनिरीक्षणात रमून जावेसे वाटते. खरंच या पुस्तकांना तोड नाही.

तुम्ही मला ही पुस्तके पाठविलीत, याबद्दल मी तुमचा आभारी आहे. प्रसन्न वाटले.

तुमचाच
नितीन

---

दि. १० मे २००६

प्रति,
**संयोजक,**
**नवमहाराष्ट्र युवा अभियान,**
यशवंतराव चव्हाण केंद्र,मुंबई.

महोदय,

आपण आवर्जून पाठविलेले अभिनंदन पत्र मिळाले. वाचून मनस्वी आनंद झाला. सोबत आपण पाठविलेले 'स्मरण साहेबांचे' व 'रानवाटा' हे दोन ग्रंथ मिळाले. याबद्दल मी आपले हार्दिक ऋण व्यक्त करतो.

आपण पाठविलेले दोन्ही ग्रंथ अनमोल आहेत. त्यातल्या त्यात 'स्मरण साहेबांचे' हा ग्रंथ पुन्हा पुन्हा पारायण करावा असा आहे. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या संपूर्ण जीवनपटाचे यथार्थ दर्शन घडविणारा हा ग्रंथ आहे.

सध्या मी पुण्यात C.O.E.P. मध्ये Electronics and Telecommunication च्या प्रथम वर्गात शिकत आहे. तो चांगला शैक्षणिक दर्जा या ठिकाणी आपल्या आशीर्वादाने टिकवून आहे.

आपण पाठविलेले अभिनंदन व ग्रंथाबद्दल पुनश्च एकदा हार्दिक आभार.

धन्यवाद.

आपला विश्वासू
श्री इगवे व्हि. पी., लातुर

# संपादकीय....

पुरोगामी वैचारिक परंपरा आणि विकासकार्यात अग्रेसर असणाऱ्या महाराष्ट्राची नवी ओळख बदलणारा निसर्ग अलीकडच्या काळात करू पहात आहे. महाराष्ट्र हा दगडा-धोंडयाचा देश जसा बऱ्याच प्रमाणात अवर्षन ग्रस्त असतो तसाच गेल्या दोन-तीन वर्षापासून तो 'पूरग्रस्त' म्हणून देखील प्रसिद्धीस आला आहे. अर्थात निसर्गाच्या प्रकोपाबरोबरच नियोजनातील त्रुटी आणि दोष हेही त्यांस कारणीभूत आहेत, हे नाकारून चालणार नाही. अशावेळी शासन प्रशासनाबरोबरच जनतेनेही या समस्येबाबत सर्वंकष विचार करावा या हेतूने महाराष्ट्र राज्याच्या आपत्ती व्यवस्थापनाविषयी एक खुली निबंध स्पर्धा प्रतिष्ठानने यावर्षी आयोजित केली होती. त्यांस बऱ्यापैकी प्रतिसाद मिळाला. मात्र त्याबद्दल अजूनही महाराष्ट्रात व्यापक व खोलवर जागृती व प्रशिक्षण करण्याची गरज आहे याची यानिमित्ताने नोंद करावीशी वाटते.

यावर्षीचे यशवंतराव चव्हाण कृषी-औद्योगिक समाजरचना राज्यस्तरीय पारितोषिक जळगावचे मा. श्री. भवरलाल हिरालाल जैन यांना प्रदान करण्यात येत आहे. पुरस्काराचे स्वरुप एक लक्ष रुपये, सन्मानपत्र, शाल व श्रीफल असे आहे.त्यांच्या कार्याविषयी महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेला व कृषितज्ञांनादेखील पुरेपूर आदर व आत्मीयता आहे. अंकातील त्यांच्या सन्मानपत्रातून त्यांचे जीवन आपल्याला अधिक नेमकेपणाने प्रतीत होईल. यशवंतरावांनी पाहिलेले कृषी-औद्योगिक समाजाचे स्वप्न साकारणारे श्री भवरलाल जैन महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला अभिमानास्पद वाटावे असे व्यक्तिमत्व आहे. मूल्याधारित समाजनिर्मितीसाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

अपंगांच्या हक्क व सर्वांगीण विकासाच्या कार्यात प्रतिष्ठानच्या युवा कार्यकर्त्यांनी पुढाकाराने जबाबदारी घेतली आहे. त्यांच्या समस्यांबरोबरच क्रिडा व सांस्कृतिक आघाडयांवरही अपंगांसाठी मेळावे, कार्यशाळा व स्पर्धा आयोजित करण्यात येत आहेत. त्यामुळे या क्षेत्रात एक प्रकारे महाराष्ट्रात चैतन्य निर्माण झालेले दिसत आहे. मा. खा. सुप्रिया सुळे यांच्या क्रीयाशील पाठींब्याने कार्यकर्त्यांचा उत्साह वाढत आहे.

प्रतिष्ठानच्या विविध विभागांचा व विभागीय केंद्रांचा कार्यवृत्तांतच पुरेसा बोलका असून त्याविषयी आपल्या प्रतिक्रीया व सूचना आल्या तर आम्हाला नक्कीच आनंद होईल.

यशवंतरावांच्या साहित्याविषयी प्रकाशित होत असलेल्या 'इ' बुकलाही आपला चांगला प्रतिसाद मिळेल अशी आशा व अपेक्षा आहे.

आपला

दत्ता बाळसराफ

## यशवंतराव चव्हाण जयंती समारंभ राष्ट्रीय पुरस्कार प्रदान सोहळा

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा यंदाचा यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार सत्यनारायण गंगाराम पित्रोदा ऊर्फ सॅम पित्रोदा यांना प्रदान करण्यात आला. मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते शाल-श्रीफळ, सन्मानपत्र व दोन लाख रुपये रोख असा हा पुरस्कार श्री पित्रोदा यांना दिला गेला. प्रतिष्ठानच्या पदाधिकारी सुप्रिया सुळे यांनी मानपत्राचे वाचन केले.

दूरसंचार क्षेत्रात महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याकडून मोठया अपेक्षा असल्याचे श्री पित्रोदा यांनी नमूद केले. आज ६-७ वर्षांचा मुलगा-मुलगी संगणकाचा वापर करीत आहे. त्यामुळे नव्या पिढीला त्यांनी कोणते शिक्षण घ्यावे. हे त्यांचे त्यांनाच ठरवू द्यावे, एका वेळी दोन-तीन विद्यापीठांचे शिक्षणक्रम त्याला आत्मसात करण्याची संधी मिळावी. असे आवाहन त्यांनी केले. देशात ३०० विद्यापीठे आहेत. ती संख्या हजारापर्यंत जायला हरकत नाही. पण अभ्यासक्रम हे आधुनिक काळाशी व दूरसंचार क्षेत्राशी संबंधित असावेत. अशी अपेक्षा श्री पित्रोदा यांनी व्यक्त केली.

शिक्षण क्षेत्रातील राजकारणी आणि सरकार यांचा हस्तक्षेप कमी झाला पाहिजे. असे ठामपणे सांगताना श्री पित्रोदा यांनी विद्यार्थ्यांनी कोणते शिक्षण घ्यावे, हे ठरवणारे सरकार कोण, असा सवाल केला. दूरसंचार क्षेत्रातील वाटचालीबाबत देशातील स्थिती समाधानकारक असल्याचे नमूद करताना, पित्रोदा म्हणाले, ''जेव्हा मी राजीव गांधी पंतप्रधान असताना या क्षेत्राची जबाबदारी स्वीकारली, त्या वेळी २ दशलक्ष फोन देशात होते. आता ही संख्या १४० दशलक्ष इतकी वाढली. येत्या चार वर्षात देशात २०० दशलक्ष फोन असतील व ते बहुतांश ग्रामीण भागात असतील. टेलिफोन हे आता केवळ संपर्काचे माध्यम न राहता त्याद्वारे शिक्षण, बाजारहाट, खरेदी-विक्री अशा जीवनातील प्रत्येक घटकाशी व्यवहार करता येणारे तंत्र बनले आहे.''

यशवंतराव चव्हाण यांचे कृषी व औद्योगिक क्रांतीचे स्वप्न घेऊन महाराष्ट्र पहिल्या क्रमाकांचे प्रगत राज्य बनले. असे मुख्यमंत्र्यांनी निदर्शनास आणले. ते पुढे म्हणाले, ''आता स्पर्धा वाढल्याने व विकासाच्या परिक्षेत पहिला क्रमांक राखण्यासाठी मेहनत घ्यावी लागेल. दळणवळण आणि माहिती क्षेत्रात महाराष्ट्र पहिला क्रमाकांवर नेण्याचा प्रयत्न करणे, यातूनच सॅम पित्रोदा यांनी व्यक्त केलेल्या अपेक्षांची पूर्ती होईल, असे ते म्हणाले.

या वेळी निवड समितीचे अध्यक्ष न्या. यशवंतराव चंद्रचूड यांनी पुरस्कारामागील यशवंतराव चव्हाणांच्या कारकिर्दीचा व कामगिरीचा आढावा घेतला. प्रतिष्ठानचे पदाधिकारी माजी खासदार हुसेन दलवाई, माजी मुख्यमंत्री शिवाजीराव निलगेकर, माजी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष अरूण गुजराथी, विधानसभाध्यक्ष शंकरराव जगताप, प्रतिष्ठानचे सरचिटणीस प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष डॉ. रविंद्र बापट, शरद काळे, सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ, अनिल देशमुख, बबनराव पाचपुते, माजी राज्यपाल राम प्रधान आदी उपस्थित होते.

१२ मार्च २००६

## 'ई' बुक प्रकाशन

मा. यशवंतराव चव्हाण यांच्याविषयी संगणकीय पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले. यशवंतराव हे केवळ राजकारणी नव्हते. ते ग्रंथप्रेमी, विचारवंत व साहित्यिक या भूमिकेतूनही सर्वांना परिचित आहेत. त्यांनी लिहिलेली पुस्तके, विधीमंडळात व संसदेत केलेली भाषणे आणि त्यांच्या आयुष्यातील महत्वाचे क्षण टिपणारी छायाचित्रे आधुनिक सांख्य तंत्रज्ञान (डिजिटल टेक्नॉलॉजी) वापर करून जतन करावी व त्यांच्या चाहत्यांना व अभ्यासकांना सहजपणे उपलब्ध व्हावी या दृष्टीने एक मराठी व इंग्रजी असा दोन संगणकीय पुस्तिका करण्यात आलेल्या आहेत. मराठी पुस्तिकेत 'कृष्णाकाठ', 'भूमिका', 'युगांतर', 'सह्याद्रीचे वारे' व 'ऋणानुबंध' ही यशवंतरावांची पांच संपूर्ण पुस्तके, महाराष्ट्र विधीमंडळात १९४६ ते १९६२ या काळात केलेली ५० निवडक भाषणे व महत्वाची सुमारे १७५ छायाचित्रे यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

इंग्रजी पुस्तिकेत त्यांनी संसदेत केलेल्या भाषणांचे चार खंड (श्री. राम प्रधान यांनी संपादित केलेले) श्री. टी. व्ही. कुन्नीकृष्णन यांनी लिहीलेले यशवंतरावांचे चरित्र व सुमारे १७५ महत्वाची छायाचित्रे यांचा संग्रह करण्यात आला आहे. या संगणकीय पुस्तिका तयार करण्याचे काम 'संगणक प्रकाशन' चे श्री माधव शिरवळकर यांनी काळजीपूर्वक, कसोशीने व वाजवी किंमतीत केलेले आहे.

# भाषणातले यशवंतराव

- आनंद पाटील

**यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्राच्या जडणघडणीचा पाया घालणारे शिल्पकार, विशाल मानवतावादी भूमिका असलेल्या यशवंतरावांचा उत्कृष्ट आणि व्यासंगी नेतृत्व, पारदर्शक व्यक्तिमत्व आणि स्वच्छ चारित्र्य याबद्दल दबदबा होता. यशवंतरावांच वाचन त्यांच्या दांडगा व्यासंग, बहुश्रुतता, रसिकता, विचारांचा ठामपणा, उपरोध, नर्म विनोद यांच प्रतिबिंब त्यांची संसदेतली भाषण, लेख आणि आत्मचरित्रातल्या नोंदी यांत पडलेलं आहे. राजकारण, इतिहास आणि वाङ्मय हे त्यांचे आवडीचे विषय, शेक्सपिअरपासून बेकेटपर्यंत आणि कार्ल मार्क्सपासून जॉन गालब्रेथपर्यंत अनेक लेखक त्यांनी वाचले, आजही त्यांच्या खासगी ग्रंथालयात तब्बल साडेआठ हजार इंग्रजी-मराठी पुस्तक आहेत.**

**अफाट वाचन असूनही पांडित्यप्रदर्शन त्यांनी कधीच केलं नाही. कारण शब्दांच्या सामर्थ्याची त्यांना जाणीव होती. स्वतःची म्हणून एक खास देशी शैली त्यांनी निर्माण केली होती. या सर्वांची झलक दाखविणारी त्यांची भाषण आणि त्याची वैशिष्ट्यं -**

---

लोकमान्य टिळकांच्या नंतर महाराष्ट्राला लाभलेला संपन्न व्यक्तिमत्वाचा व समर्थ नेतृत्वाचा सर्वात मोठा आदर्श म्हणून यशवंतराव बळवंतराव चव्हाण (१९१३-१९८५) हे 'महाराष्ट्राचे शिल्पकार' सर्वमान्य झाले आहेत. देवराष्ट्रेसारख्या छोटया खेडयातील अल्पभूधारक शेतमजुराचा मुलगा 'सर्व हि तपसा साध्यम्' हे ध्येय ठेवून राज्याचा प्रतिभासंपन्न, सर्वोत्कृष्ट मुख्यमंत्री व देशाचा संसदपटू उपपंतप्रधान होतो. दीर्घकाळ राज्याचे एकमुखी नेतृत्व करताना महाराष्ट्राच्या जडणघडणीचा पाया घालतो. पं. नेहरूनंतर लोकसभेत सर्वांत व्यासंगी, पारदर्शी, स्वच्छ चारित्र्याचा संसदपटू मंत्री म्हणून त्यांचा लौकिक होता. पं. नेहरूनंतर कोण, हा प्रश्न चर्चिला जात असता ब्रिटनमधील पत्रकार भावी पंतप्रधान म्हणून त्यांचेच नांव घेत. मोहन धारिया 'सोज्वळ मानवतावादी' या स्मृतिलेखात काही मतभेद नोंदवून शेवटी म्हणतात. ''मानवतेवर आणि मानवतावादावर त्यांची श्रद्धा होती. त्यांचा वाचनाचा व्यासंग गाढा होता. संगीत, साहित्य, नाटयकला, शिक्षण यांचे ते चाहते होते...महाराष्ट्राच्या कीर्तिमंदिराचे छप्परच कोसळून खाली यावे, असा सर्वत्र भास झाला. कारण छत्रपती शिवाजी महाराजानंतर महाराष्ट्रातला, तसेच महाराष्ट्रातील बहुजन व पददलित समाजाला एवढे भव्य नेतृत्व केव्हाही लाभले नव्हते.'' (केळकर, १९८५. ९०)

अशा महान नेत्याच्या जयंतीनिमित्त नगर परिषद व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने होणाऱ्या दोन व्याख्यानांसाठी मी विषय सुचवला होता. 'यशवंतराव चव्हाण आणि विश्वसाहित्य', याला दोन कारणं होती. यशवंतराव चव्हाणांचं ग्रंथवाचन हीच एक दंतकथा बनलीय. दुसरं, एस.एस. प्रॉवरच्या 'कार्ल मार्क्स अँड वर्ल्ड लिटरेचर' या तौलानिक ग्रंथान मला भारावून टाकलं होतं. वाचनातून यशवंतराव स्वतःला कसे 'रचित'गेले. याचा खरा साक्षात्कार मला त्या दोन भाषणांची तयारी करताना होत गेला. वयाच्या पाचव्या वर्षी वडील वारलेले. विठाई पडेल ती काम करून चार मुलांना कराडमध्ये वाढवत होती. अत्यंत गरीबीत शिक्षण घेत स्वातंत्र्य चळवळीत झोकून देणारा हा कविमनाचा तरूण तुरूंगालाच शाळा समजून ग्रंथवाचन चालू ठेवतो. बी.ए.एलएल.बी. परीक्षांसाठी क्रमिक पुस्तके कधीतरी चाळतो. इंग्रजी ग्रंथ वाचताना शब्दकोश जवळ बाळगतो. मुंबईत द्विभाषिक राज्यात निवडून गेलेला लोकप्रतिनिधी म्हणून वावरताना इंग्रजीत बोलण्याचं व्रत सांभाळतो. ग्रंथवाचनाचं वेड सोडत नाही. दिल्लीत गेल्यानंतर ते वाढतच राहतं. ज्या खात्याचं मंत्रिपद मिळाल त्या क्षेत्रातील जगातील अद्ययावत ग्रंथ स्वतःचे पैसे खर्च करून त्यांनी मागवले. शिवाय काव्य, नाटक, कादंबऱ्याही स्वतःच्या खासगी ग्रंथालयासाठी खरेदी केल्या. घरात सक्त ताकीद होती. या संग्रहातील ग्रंथ अथवा नियतकालिकं रद्दित विकू नये. याचे चालतेबोलते पुरावेच मला कै. वेणूताई चव्हाण ग्रंथालयातील साडे आठहजार ग्रंथ, पत्रे व इतर कागदपत्रे चाळताना मिळत गेले. काही पुस्तकांवर यशवंतरावांनी निरनिराळ्या रंगाच्या शाईत खुणा. शेरे वगैरे मारले आहेत. विकत घेतलेल्या पुस्तकावर इंग्रजीत वाय. बी. चव्हाण, त्याखाली ठिकाणाचे नाव

व दिनांक घालून सही करण्याची पद्धत सर्वत्र सारखी आहे. हे सगळे पाहताना मला स्ट्रॅटफर्ड-अपऑन-ॲव्हनमध्ये शेक्सपिअर सेंटरच्या ग्रंथालयात आठवडाभर केलेले संशोधन आठवले.

**संवादाची कला**

यशवंतरावांनी स्वतः कधी काय वाचले, याच्या नोंदी आत्मचरित्र व इतर लेखांत बऱ्याच केल्या आहेत; परंतु त्यांच्या वक्तृत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अफाट वाचन असूनही पांडित्यप्रदर्शन ते मुळीच करीत नाहीत. मराठी भाषण म्हणजे सामान्य माणसाशी 'संवाद', ही त्यांची धारणा आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील त्यांच्या भाषणात इंग्रजी उद्‌धृते अथवा साधे शब्दही सापडत नाहीत. उलट संसदेतील इंग्रजी भाषणात किंवा प्रशनोत्तरात मराठीची घुसखोरी होत नाही. पदव्यांसाठी वाचन व्यासंग केलेल्या थोर पुरूषांची उदाहरणे अनेक आहेत. परंतु स्वतःला घडवण्यासाठी वाचनाचे वेड जपत म. गांधी, पं. नेहरू, डॉ. राधाकृष्णन, कृष्ण मेनन अशा इंग्रजी वक्तृत्वासाठी नामवंत असणाऱ्या समकालीनांमध्ये स्वतःचे वेगळे स्थान शेतमजुराच्या मुलाने निर्माण केले. हा लोकशाहीतील एक चमत्कार आहे. त्यामुळेच मला त्यांच्या भाषणे, लेख व आत्मचरित्रातील विश्वसाहित्याचे प्रतिध्वनी शोधण्याची उत्सुकता निर्माण झाली. बारा वर्षे कार्ल मार्क्सचे लेखन व कागदपत्रे धुडांळण्यात प्रॉवरने घालवली. मराठी बरोबरच इंग्रजीत तसाच ग्रंथ लिहायचा आग्रह हिंदू बनारस विद्यापीःठातील इंग्रजी विभागप्रमुख डॉ. त्रिपाठींनी मला केला. यशवंतरावांच्या इंग्रजीतील भाषणांच्या स्वतःच्या वेगळ्या शैलीचा प्रभाव उत्तरेतही चर्चिला जात होता. त्यांच्या मराठी साहित्याची समीक्षा बरीच झाली आहे, परंतु त्यांच्या पार्लमेंटमध्ये किंवा इतरत्र केलेल्या इंग्रजी भाषणांची चिकित्सा कुठेच आढळली नाही. प्रस्तुत लेखात त्यांच्या इंग्रजी भाषणात विश्वसाहित्याचे पडसाद, आंतरसंहिता व प्रभाव कसा आढळतो, याची चर्चा केली आहे. त्यांचे वाचन जाणीवपूर्वक फ्रान्सिस बेकनचे 'ऑफ रीडिंग' व 'ऑफ स्टडीज' या निबंधामधील तत्वचिंतन आत्मसात केल्याप्रमाणे कसे सुरू राहिले, या विषयी ते 'कृष्णकाठ' मध्ये (१५४) लिहितात.

'आता माझे वाचन मर्यादित राहिले नव्हते. काय वाचावे आणि काय वाचू नये, असा संभ्रम आता वाटत नव्हता. त्या बाबतीत माझ्या दिशा कायम झाल्या होत्या आणि योजनापूर्वक काही वाचावे, असे मी ठरविले होते. राजकारणात, इतिहास आणि वाङ्‌मय या विषयांवरची निवडक पुस्तके मी शोधू लागलो'.

या 'नियोजनपूर्वक काही वाचावे' सवयीनेच त्यांना स्वामी रामदासांच्या उक्तीची अनुभूती दिलीः अभ्यासे प्रकट व्हावे, नाही तरी झाकून असावे, हे भान त्यांच्या भाषणांत कसे जाणवते आणि वाचन व्यासंग त्यांना सर्जनात्मक व मूलभूत द्रष्टा बनायला कसा हातभार लावतो, ते विश्ववाङ्‌मयातील संदर्भ तपासत क्रमाने पाहू. त्यासाठी खालील संग्रहांची संक्षिप्त नावे वापरली आहेतः

1. Yeshwantrao Chavan selected speeches in the state legislature : 1946 ed. V. G. Khobrekar (1990)
2. Winds of Change : Y. B. Chavan (1973)
3. India's Foreign Policy : Y. B. Chavan (1978)
4. Y. B. Chavan selected Speeches in Parliament vols. I-V. ed. Ram Pradhan (1995)

वाचलेल्या साहित्य/संहितांचे पक्के स्मरण व त्यांचे आशयानुरूप यथोचित उपयोजन हे यशवंतरावांचे कसब वाखाणण्यासारखे आहे. घरात कसलीही वाङ्‌मय परंपरा अथवा सांस्कृतिक भांडवल (cultural capital) नसताना त्यांनी गरिबीच वरदान समजून ते कमावले. उदा. कराडला हायस्कूलमध्ये असताना बर्नार्ड शॉच्या डॉक्टर्स डायलेमामधील एका प्रवेशात अभिनय केल्याचा उल्लेख आत्मचरित्रात प्रारंभी येतो. नंतर प्रत्यक्षात तमाशा बघायला चाललेली मुले रल्वे स्टेशनवर शॉच्या भावाला भेटायला चालल्याची थाप ड्रिल मास्तरला मारण्याचा प्रसंग आहे. एम.एन.रॉय यांच्या प्रभावाने कम्युनिझमवरील साहित्याचे त्यांचे वाचन वाढले. त्यामुळे शॉची नाटके त्यांनी किती चिकित्सकपणे वाचली होती, हे त्यांनी त्यावर केलेल्या सविस्तर भाष्यावरून लक्षात येईल (पाहा कृष्णाकाठ १५५)

अशा अभ्यासाविषयी बेकनने म्हटले आहे. ("Studies serve for delight, for ornament, and for ability...For expert men can execute, and perhaps judge of particulars one by one; but the general counsels, and the plots and marshalling of affairs, come best from those that are learned (128) 'सामर्थ्य' व प्रशासन 'अभ्यासपूर्वक जाणकारीने' करण्याचे कौशल्य विधान परिषदेत मुख्यमंत्री म्हणून १३ ऑक्टोबर १९५६ रोजी नगर परिषदांच्या निवडणुका पुढे ढकलणारे बिल मांडताना किती कलात्मकतेने, तसेच आत्मविश्वासापूर्वक प्रकटले, ते पाहणे उद्‌बोधक आहे. हा

लोकशाहीचा गळा घोटण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप आमदार श्री वर्टीनी बर्नार्ड शॉचा हवाला देत केला. समाजवादी शॉला झुंड-फंडवादी लोकशाही नको होती. हा हल्ला परतवताना चव्हाणांनी शॉचा गुरू सिडने वेबचे उद्‌धृत देऊन विरोधकांना अस्मान दाखवले.

... The hon.Member Shri Warty the other day threw out a quotation from Bernard Shaw about democracy. Well, I can very well appreciate the satire of it, but I can also quote another equally great contemporary of Bernard Shaw. Sydney Webb who said, 'Democracy is not a mere bundle of academic theorems, it is just a way of life (SSSL. II, 154).

मानवतावाद, समाजवाद, कल्याणकारी प्रशासन आणि राष्ट्रवाद या यशवंतरावांच्या प्रखर निष्ठा होत्या. स्वातंत्र्यलढ्यात व गावच्या आखाडयात तावूनसुलाखून निघालेल्या हा सैनिक होता. नम्रता व रसिकता हे गुण त्यांनी संपादन केले होते. सिडने वेब बियाट्रिस वेब या ब्रिटिश दांपत्यांच्या समाजवादावरील व्याख्यानांना गेल्यानंतर नाटककार शॉचा उदय झाला. त्याआधी तो रोमँटिक-रंजक कादंबऱ्या लिहिणारा पोटभरू लेखक होता. आत्मचरित्रात यशवंतराव लिहितात-"नाटकांच्या संहितांपेक्षा प्रस्तावनाच मोठया होत्या. या माणसाची प्रतिभा विशाल होती. त्यामुळे सर्व विषयांत त्यांचा प्रवेश होता. त्याचे समाजवादावरील एक पुस्तक त्या वेळी खूप नावाजले गेले होते. बर्नार्ड शॉची एक विशिष्ट लेखनशैली आहे. त्या शैलीची यानिमित्ताने ओळख झाली. (१५५)"

यशवंतरावांच्या संग्रहात शेक्सपिअर, शॉ, ओ'निल, ब्रेख्त बेकेट वगैरे ख्यातकीर्त नाटककारांची बहुसंख्य नाटके आहेत. हे सगळे लक्षात घेतले म्हणजे यशवंतरावांची उद्‌घृते कुठल्या खजिन्यातून बाहेर पडतात, याची चांगली ओळख पटते. ते बेगडी श्रुतयोजन (allusion) नसते. शिवाय ती रत्ने भाषणाच्या गोफात जडविताना पांडित्यप्रदर्शनाचा प्राध्यापकी हव्यास अथवा गर्वही नसतो. मिस्कीलपणे हसत हसत, चिमटे काढत वादविवादात लढण्याची हातोटी खास 'यशवंती' आहे. तिचे वर्णन अर्धमागधीतल्या श्लोकात करता येईल.

**साली भरेन तोएन । फल भरेन तरू सिहरा नमिन्त ।**
**सप्पुरिसा विनयेन नमन्ति । न कस्सवि भयेन ।।**

(पाण्याने भरल्याने ढग, फळांनी लगडल्याने झाडे आणि सत्परुष विनयाने नमतात. ते कुणाच्या भयाने वाकत नाहीत.)

स्वतःच्या राजकीय भूमिकेप्रमाणेच त्यांनी आपल्या भाषणकलेचा गंभीरपणे विचार केला होता. 'भाषण म्हणजे संवादच' या लेखात ते म्हणतातः

'मी असे पाहिले आहे, की सर्व विषयांवरील वाचन व चिंतन असले, तर अनपेक्षितपणे एखाद्या विषयावर बोलण्यास सांगितले, तर मी आज बोलू शकतो, असा माझा अनुभव आहे. यापाठीमागे आयुष्यभर केलेला विविध वाचनाचा संग्रह, हेच शक्तिस्थान आहे. लहानपणी विविध स्पर्धात मी भाग घेतला. त्यावेळी मुद्दे टिपून घेऊन त्या अनुषंगाने मी बोललो आहे. (शब्दांचे सामर्थ्य ३६९)'.

प्रश्नांचे चिंतन व त्यावरील उपाय शोधण्यासाठी केलेले सर्जनक्षम वाचन ही शिस्त त्यांनी स्वतःला कार्यकर्ता या नात्याने प्रारंभापासून लावून घेतलेली दिसते. लोककथा, म्हणींचा वापर, आकडेवारीसह तुलनांचे सादरीकरण आणि सोप्या इंग्रजीचे 'वायबी' वळण १२ फेब्रूवारी १९४७ रोजी त्यांनी केलेल्या जमीन तुकडेबंदी विधेयकाच्या समर्थनात दिसते. पार्लमेंटरी बोर्डाच्या सचिवपदावरील या तरुणाचे वाक्‌चातुर्य काही वाक्यांतच नजरेत भरतेः

... Everybody tries to see the problem of poverty from his own point of view. This reminds me of an old story of six blind men and their efforts to see what the elephant was like (3)

पुढे कॉम्रेड श्रीपाद डांगे यांचा रशियाच्या साम्यवादाचा फुगा ते टोचतात :

The leader whose quotation I am giving is no less than a person than Lenin, the father of Soviet Russia. He said, 'Nothing is more stupid' - stupid is his word, not mine, '-than the very idea of applying coercion in economic relation with the middle-class peasant (SPSLA II, 4)

देशी शैली

कसलाही उच्छृंखलपणा अथवा विषारी डंख न मारता शांतपणे वाद लढवायला वाचनाबरोबरच बहुश्रुततेची मोठी गरज असते. आदर्श भव्य असावे लागतात. शिवाय अनुकरणात न अडकता स्वतःची प्रबळ शक्तिस्थाने ओळखून पूर्वसुरी व समकालीनांशी लढत धूक्यातून वाट काढावी लागते. ते 'भाषण म्हणजेच संवाद' मध्ये शैलीविषयी म्हणतातः

'मी अनेकांची उत्कृष्ट व्याख्याने ऐकली आहेत. मी असे पाहिले आहे, की कोणाचे अनुकरण करणे मला शक्य नाही, व मी ते केलेले नाही. उत्कृष्ट इंग्रजी वक्तृत्व असलेले वक्ते

सर्वश्री सर्वपल्ली राधाकृष्णन, श्रीनिवास शास्त्री, भुलाभाई देसाई यांची अतिशय प्रभावी विचारपरिपूर्ण भाषणे मी ऐकली आहेत. त्यांच्यासारखे आपणास इंग्रजी बोलता यावे, असे वाटले, तरी त्यांचे अनुकरण करणे सुतराम शक्य नव्हते. मी इंग्रजी वाचन बरेच करीत होतो व त्यातून माझी एक देशी शैली निर्माण केली. (३७२)

या 'देशी शैली' चे अनेक रांगडे नमुने त्यांच्या भाषणात दाखवता येतील. तळागळातील कार्यकर्ता म्हणून त्यांना एक अभिमान होता. सर्वांत शेवटचा टोकाचा सामान्य गरिबाचा मी प्रतिनिधी आहे. ही ठाम भूमिका होती. ती महाराष्ट्रात बी. सी. कांबळे, सी. डी. देशमुख वगैरेंच्या संदर्भात वेळोवेळी व्यक्त होई. कांबळ्यांनी द्वैभाषिक राज्यात लायक मंत्री नसल्यासंबंधी उपरोधी टीका केली. निवडणूक जिंकलेले यशवंतराव त्यांची खिल्ली उडवत मराठीत एकच वाक्य बोलले.

विधवेला कुंकवाची उठाठेव कशाला? (To take interest in things that do not concern one). I really do not know what he has to do with the formation of the Ministry of this Party. (152-53)

त्यांच्या प्रसिद्ध झालेल्या अन्य कुठल्याही इंग्रजी भाषणात मराठी वाक्य, शब्दप्रयोग अथवा उद्धृते आढळत नाहीत. विद्वान सचिवांनी रचलेल्या भाषणांत अशी रसायने जमणे केवळ अशक्य आहे. त्यांची दिल्लीतील बावीस वर्षांची कारकीर्द तपासली तरी किती वैविध्यपूर्ण विषयांवरील अद्यायावत ग्रंथसंपदा त्यांनी संबंधित खात्याचे मंत्रिपद सांभाळताना उत्तम प्रशासक व नेता बनण्यासाठी जमवली, हे लक्षात येते. हाताळलेले खाते व ग्रंथालयातील पुस्तकांच्या त्या क्षेत्राशी संबंधित पुस्तकांच्या नोंदी यांचा बरोबर मेळ बसतो.

संरक्षण मंत्री १९६२-६६ गृहमंत्री १९६६-७०
अर्थमंत्री १९७०-७४ उपपंतप्रधान, गृहमंत्री १९७९-
अर्थ आयोगाचे अध्यक्ष - १९८२

अर्थात 'मोले घातले रडाया' ही धारणा चांगल्या वक्तृत्वाला मारक ठरते. उत्तम भाषणाचा एक नमुना राम खांडेकरांनी ''सत्तेवर नसलेल यशवंतराव'' मध्ये सादर केला आहे. इंदिरा गांधी यांनी पंजाब संदर्भातील व्हाईट पेपरबद्दल यशवंतरावांनी लोकसभेत बोलावे, अशी इच्छा व्यक्त केली. यशवंतरावांनी ती एका अटीवर मान्य केली. ती म्हणजे, कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याने येऊन त्यांना 'ब्रीफिंग' करायचे नाही किंवा काहीही सरकारी कागदपत्र भाषणासाठी द्यावयाची नाहीत.' (केळकर संपा. ५४) पंतप्रधान इंदिराजींनी दोन ओळींची प्रशंसा लिहून भलामण केलेले ते त्यांचे पार्लमेंटमधील शेवटचेच भाषण ठरले.

स्वावलंबन व अभ्यासू वृत्तीचा हा आदर्श त्यांनी नेहमीच जपल्याने त्यांच्याबरोबर विविध खात्यांत काम केलेल्या बडया अधिकाऱ्यांच्या मुलाखती व लेखांवरून स्पष्ट होते. ते संरक्षण मंत्री झाल्यानंतर नेफा आघाडीवरील पराभवाची चौकशी, विरोधकांचे आक्रमक हल्ले सुरू होते. अत्यंत शांतपणे त्यांना तोंड देताना ते म्हणाले,

... I am remined of the story of 'farman' isued by Akbar Badashah or some Badshah to hang all son-in-laws. When he issued the order, that the sons-in-law should be hanged, somebody reminded him at the last minute that he was also someone's son-in-law !" (Pradhan I, 13)

**चीन विषयी दीडशे ग्रंथ**

संरक्षणमंत्रिपद स्वीकारताच चीन, माओ आणि त्यांच्या इतिहासाविषयी इंग्रजीत उपलब्ध असणारी पुस्तके खरेदी करायच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. प्रगत देशातील संरक्षण व लढाई तंत्राविषयीचे ग्रंथही खरेदी केले. एकटया चीनशी संबंधित दीडशे इंग्रजी ग्रंथ त्यांच्या ग्रंथालयात आहेत. त्यांचे प्रतिबिंब त्यांच्या भाषणामध्ये वेगवेगळ्या पातळ्यांवर बघायला मिळते. बुद्धिचातुर्य (wit) व विनोदबुद्धि ही त्यांच्या भाषणाची प्रमुख वैशिष्टये आहेत. उदा. नाथ पै यांच्या भाषणांला दाद देत त्यांचीच 'अण्वस्त्र ब्रह्मचर्य' ही शब्दयोजना आपली भूमिका लक्षात घेऊन अशी फिरवली: "Naturally it has to be used for peaceful purpose. So there is no Brahmacharya as far as science is concerned." (Pradhan, I.53)

महाराष्ट्रातील शिवसेनेच्या उपद्रवमूल्याविषयी त्यांनी केलेली १९६७ मधील तीन भाषणे म्हणजे त्यांच्या समाजशास्त्र व इतिहासाच्या व्यासंगातून समकालीन परिस्थितीचा अचूक अंदाज बांधण्याचे उत्तम नमुने आहेत. प्रस्तुत चर्चेत 'विश्वसाहित्य' याचा अर्थ केवळ 'ललित' साहित्य असा नाही. बंगालच्या राज्यपालांच्या अभिभाषणातील दोन उतारे १९६८ मध्ये गाळल्यानंतर वादळ उठले. हिरेन मुखर्जी व इतरांनी असभ्य भाषा वापरली. तेव्हा उत्स्फूर्तपणे गृहमंत्री उच्चभ्रू नाठाळाच्या माथा काठी द्यायला सात्विक संतापाने पुढे सरसावले.

I have nothing to say about philosophy. Shri Rammurthi tried to interpret it in a different way. Shri Hiren Mukharjee went to find examples from the madieval history of Charles, Richards and Edwards....Let us deal with Mukharjee's. Tribedi's and Rammurti's present and the future...

My hon. friend Shri Ashoka Sen gave the example of war-time leader Sir Winston Churchill. I was reminded of another statement by another esteemed leader, of course, a century before-Napoleon. When he was fighting the Britishers... So once Napoleon said in a very typical remark "Britishers never know when they are defeated because Britishers have never understood what defeat was (bid.127)

नेपोलियनचे हेच उद्‌घृत त्यांनी मुख्यमंत्री असताना विरोधी पक्षांच्या पराभवाच्या संदर्भात मराठी भाषणात वापरलले दिसते. परंतु अशा पुनरुक्तींची संख्या फार मर्यादित आहे. कधी बौद्धिक तर कधी भावनेला आवाहन करीत बोलण्याची त्यांची हातोटी ही खास त्यांचीच आहे. त्यात शब्दांचा फुलोरा नसतो. मृदु स्वरात गंभीरपणे फार कमी बोलण्यासाठी ते प्रसिद्ध होते. स्वतः सर्जनक्षम लेखक असल्याने शब्दांच्या सामर्थ्यांची त्यांना चांगली कल्पना होती. "मी शब्दांना फार मानतो. त्यांच्यात अस्त्रांचे सामर्थ्य आहे. तसेच प्रकाशाचे तेज आहे." (ऋणानुबंध, २४८)

यशवंतराव साहित्य, कला, भाषा अशा विषयांवर बोलण्यात जास्त रमत. सत्तेत नसताना ते अशा भाषणांच्या निमंत्रणाची वाट पाहत. अशी माहीती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली आहे. पार्लमेंटच्या बाहेर त्यांनी भारतभर दिलेल्या इंग्रजी भाषणांचे संकलन व्हायला हवे; म्हणजे त्यांच्या विषयांची व्याप्ती व मांडणीतील व्यामिश्रता अधिक स्पष्ट होईल. उदा. - 'तामिळनाडू' हे राज्याचे नाव व हिंदीच्या स्वीकाराबाबत मोठा संघर्ष उडाला. तेव्हा गृहमंत्री म्हणून केलेली त्रीभाषा सूत्रावरील तीन भाषणे (१९६७) त्यांच्या सखोल चिंतन व वाचनाची साक्ष देतात. दाक्षिणात्यांचा हिंदी विरोध प्रसिद्ध आहे. इंग्रजीसारखी परकी राजभाषा जगात कुठेच स्वीकारलेली नाही. असे यशवंतरावांनी म्हणताच Anbazhagan या सदस्याने मोठयाने म्हटले, "आयर्लंड ! " ते उदाहरण गैरलागू असल्याचे यशवंतरावांनी ठणकावून सांगितले (SSp II, 174) पुढे त्यांनी संस्कृत तज्ज्ञ शंकराचार्यांचे योगदान सांगून बहुसंस्कृती व बहुभाषावादाचा पुरस्कार केला.

## काव्यात्मकता

इतिहासाचे भान व प्रसंगावधान राखून तुलना करीत समस्येवर तोडगा काढणे, हा त्यांचा सकारात्कम कृतिशीलतेला प्रेरणा देणारा दृष्टिकोन होता. अण्णादुराईंना हरभऱ्याच्या झाडावर चढवून काव्यत्मक शैलीत ते म्हणाले (१९६८):

... But I do remember to have mentioned to him as it should be a musical name, a literary name, at the same time, it should be one which not only the people of Tamil Nadu would understand but which the rest of the country would also immediately recognize... Only because it ends in 'oo' it does not become bad. For example, Mr. Modi's name is piloo ending in 'oo' (SSP II,203-5) हा हजरजबाबीपणा व निर्विष विनोद, यामुळे विरोधी पक्षांचे नेतेदेखील त्यांच्या मोठेपणाला मान्यता देत. यशवंतराव आदर 'कमांड' करीत. तो 'डिमांड' करण्याची गरज पडत नसे. संस्थानिकांचे तनखे बंदी विधेयकावर बोलताना उच्चभ्रू सरंजामदारांची बाजू घेत खा. कुमारी वशिष्टने यशवंतरावांच्यावर कठोर टीका केली. तेव्हा त्यांनी दिलेली उत्तरे वाचली म्हणजे कृती व उक्तीचा मेळ घालणाऱ्या वक्त्याच्या वैखरीला कसे नैतिक वजन प्राप्त होते, हे उमगते.

I can tell her that I have come up in political life the very hard way. I have identified myself with the lot of the common people...the moment that identification is not there, I do not care whether I am MInister or not, whether I am in difficulties or not (SSP II,157)

अर्थमंत्री झाल्यानंतर त्यांच्या भाषणांची परिभाषा कशी बदलते आणि त्यांच्या ग्रंथसंग्रहात नवी भर कशी पडत गेली, हे पाहणेही उद्‌बोधक आहे. कविता, नाटय, संगीतात रमणारा अभिजात रसिक १९७१ मध्ये तरुण उद्योजकांच्या मेळाव्यात प्रगत अर्थशास्त्राच्या गोष्टी गंभीरपणे करतो, त्या भाषणाचे शीर्षक आहे: "Young Enterpreneurs: A call for dynamism." त्यात investment in laissez-fair environment, IMF Charter, GAAT, European Economy Community अशा global village मधील आंतरसांहितात्मकतेच्या जोडीला मं.गांधींचे वचनही येते. बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर उठलेल्या वादळात सरकारी धोरणाचे समर्थन किती सुंदर, अलंकारिक भाषेत ते करतात, हे 'रोल ऑफ पब्लिक सेक्टर बँक्स' सारख्या रूक्ष विषयावरील भाषणातसुद्धा बघायला मिळते. ती लय व अलंकार पाहा :

Institutions and instruments have exactly the same relationship with the social order as embarkments of a

never with the running stream. (WC 112).

'Why do I believe in Socialism?' हा त्यांचा स्मरणिकेतील लेख त्यांच्या अंतरंगात मुरलेल्या संहिता व त्यातून आकाराला आलेल्या विशाल मानवतावादी भूमिकेवर प्रकाश टाकणारा आहे. त्या कार्ल मार्क्स, लेनिन, एम. एन. रॉय, बर्ट्रांड रसेल, महात्मा गांधी, पं. नेहरू आदी विचारवंतांच्या प्रभावांचा उल्लेख आहे. त्यांच्या ग्रंथांच्या परिशीलनामुळे त्यांना प्रादेशिक पक्ष अथवा स्वसांस्कृतिक उपगटाच्या संकुचित चौकटीतून बाहेर पडायला मदत झाली. आपले नेतृत्व 'मराठा' राहणारा नसून, 'मराठी' असेल, असे आत्मविश्वासाने सांगणे शक्य झाले. राष्ट्रीय पातळीवरही त्यांची ठाम भूमिका राहिली. १९७१ मध्ये अंदाजपत्रकावरील चर्चेत मोदी व एस.एम. कृष्णांची 'गरीबी हटाओ' वरील उपरोधी टीका परतवताना यशवंतराव बायबल वापरतातः

... You cannot say that you go on merely praying for the growth and 'there will be growth'. There was God who said. Let there be water.' I do not think there is any God to whom Shri Piloo Modi can pray... (SSP.III. 6)

प. बंगालमधील खासदारांना ते सुनावतात, की हेमंतकुमार वसूचा खुनी सापडत नाही. उन्नीकृष्णनना ऐकवतात, की त्यांनी उल्लेख केलेले प्रा. वि. म. दांडेकरांचे पुस्तक त्यांनी वाचले आहे आणि पुढे म्हणतातः

I have read Marx. But unfortunately I have tried to understand Marx inteligently, not blindly (Ibid.36) John galbraith. Arthur W.Lewis, Keneth Rivett, Michaer Stewart वगैरे अर्थशास्त्रज्ञांची त्या दशकातील गाजलेली पुस्तके त्यांच्या संग्रहात सापडतात. त्यांची संख्या शंभरच्या वर आहे. त्यांच्या शेजारी सोहनलाल शास्त्रींचे मनुस्मृती की शवपरीक्षा (१९७३), ग.बा. देवांचे श्रीसद्‌गुरू मोरया गोसावी यांचे चरित्र (१९७३) अशी भेट आलेली अनेक पुस्तके सुखाने नांदत आहेत. आंतरविद्याशाखीय ज्ञान निर्मित व प्रगतीवरील त्यांची श्रद्धा 'इंडिया अँड इंटरनॅशनल इकॉनॉमी' (१९७६) या राज्यशास्त्र परिषदेतील भाषणात बघायला मिळते. त्यात त्यांनी पं. नेहरूंच्या विधानासोबत ''आनौ भद्रा कर्तवी यन्तु विश्वतः'' Let good thoughts come from all directions या अनुवादासह उद्‌धृत केला आहे. त्याचा शेवटही 'कहाणी सफळ संपूर्ण' पद्धतीने करण्यात 'देशीयता' जाणवते.

इतर कोणत्याही विषयापेक्षा यशवंतराव वाङ्मय व कलांशी संबंधित विषयावरील भाषणात आपल्या आवडीच्या संहितांचा जास्तीत जास्त कलात्मक उपयोग कसा संवादी प्रतिभाशक्तीने करीत, याचा एकच नमुना शेवटी सादर करतो. सोव्हिएट लॅंड नेहरू ॲवॉर्ड प्रदान करताना 'Nehru's Insight into the Spriit of India' (1976) या छोटया भाषणात त्यांनी किती मोठया प्रमाणावर विविध संहितांचा वाङ्मेळ जमवला आहे, हे खूप तपशिलात जाऊन तपासावे लागेल. प्रारंभी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' तील पत्र येते. भारतीय व ग्रीक कलांच्या तुलना आणि रशियाच्या मैत्रीचे धागे उलगडत जातात. काउंट लिओ टॉलस्टॉयचे ॲना कॅरेनिनाच्या संदेशविषयीचे मार्मिक विधान येते. शिल्पकार, चित्रकार कवी तायुत्चेव्हची कला आणि चित्रकार Roerich च्या भारतप्रेमाचा गौरव होतो. अवघ्या तीन पानांत मोठया कलात्मकतेने हे सारे संदर्भ दागिन्यासारखे जडवलेले आहेत.

परराष्ट्रमंत्री म्हणून अमेरिकेत बोलताना ते मं.गांधींचा अहिंसावाद व अफ्रिकेतील 'ॲप्थेड' (वर्शभेद) चळवळींची तुलना करतात. आलिप्ततावादी राष्ट्राच्या कोलंबोमधील परिषदेत ॲलिस इन द वंडरलॅंडचे रूपक वापरून अलिप्तवादाचे महत्व शीत युद्ध काळात पटवून देतात. आयत्या वेळी ग्रंथाच्या लेखकाचे नाव आठवले नाही म्हणून त्यांचे फारसे बिघडत नाही. १९७६ मध्ये परराष्ट्र धोरणासंबंधी बोलताना प. नेहरू व मार्टिन ल्यूथर किंग ज्युनि. यांच्या विचारांची तुलना ते करतात. त्या जोडीला संस्कृत मंत्र व गांधीजींचे वचनही आहे. ( WC 156)

देवराष्ट्रासारखे खेडे ते विश्वग्रामपर्यंतची यशवंतरावांची ही वैश्विक आकाशझेपच आपणाला जागतिकीकरणाच्या सुनामींच्या संकटात तारक ठरणार आहे. भारताच्या परराष्ट्र धोरणावरील त्यांचे भाष्य मूलगामी आहे. तोच आजच्या जीवनाचा जाहीरनामा व्हावा :

Till recently such dialogues and exchanges of strategic questions had unfortunately been an exclusive Western monopoly ...we should develop our own independent perceptions unfettered by the biased strategic doctrines of western scholars...

Today, it is obvious that such an approach is grossly inadequate.

It is necessary for us to independently compile relevant factual data, analyse them critically and derive our own conclusions. It is on the basis of these independent conclusions that our own national strategies to be formulated (LFP, 224).

(साप्ताहिक सकाळ, दिवाळी अंक : २००६ मधून साभार)

# महाराष्ट्र महिला व्यासपिठ कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपिठाने विविध तऱ्हेचे कार्यक्रम करण्यावर नेहमीच भर दिला आहे.

**नियमितपणे होणारे कार्यक्रम :**

**१)बचत गट :** विविध विभागात जाऊन महिलांना एकत्र करणे, त्यांचा विश्वास संपादन करणे. त्यांच्यामध्ये भगिनीभाव निर्माण करणे या कामांमध्ये खुपच वेळ द्यावा लागतो. खुपदा शासनातर्फे वस्त्या उठवल्या जातात. लोक बेघर होतात, झालेले गट विस्कळीत होतात. अशा परिस्थितीत गट टिकवणे अधिकच अवघड होते. बचत गटांची संख्या आता पूर्वीच्या १७ पासून २५ पर्यन्त वाढली आहे.

रोजंदारीवर जगणाऱ्या या स्त्रियांची बचत अत्यल्प असते. व्यासपिठाने आता प्रत्येक गटातील सदस्यांचे रजिस्टर कार्यालयात ठेवण्यास सुरवात केली आहे. कुलाबा, चेंबूर, मुलुंड, गोवंडी, भांडूप, विक्रोळी इत्यादी भागात हे गट आहेत.

एप्रिल मध्ये "महिला आर्थिक विकास महामंडळ" या शासकिय संस्थेच्या सहकार्याने १८ व १९ मे रोजी ३० कार्यकर्त्यांसाठी एक प्रशिक्षण वर्ग व्यासपिठाने आयोजित केला होता. बचत गटांविषयी सर्व तांत्रिक गोष्टींची माहिती तेथे देण्यात आली. या प्रशिक्षण वर्गाचे वैशिष्ट्य म्हणजे जेवणाचा खर्च प्रत्येक सहभागीने स्वतःच केला होता. गट चालवण्याच्या दृष्टीने हे शिबिर अतिशय उपयुक्त ठरले.

**२) आरोग्य शिबिरे :** ही शिबिरे मुख्यतः मधुमेह, डोळ्यांचे विकार, गर्भाशयाचे विकार, सांधेदुखी या आजारांविषयी असतात. स्त्रिया स्वतःच्या आजारांविषयी उदासीन असतात. दरवेळी शासकिय रुग्णालयात लागणारा वेळ व बेफिकीरी यामुळे तेथे जाणे टाळले जाते व खाजगी डॉक्टर परवडत नाहीत. स्त्रियांची नोंदणी त्यांच्या आजारांविषयी त्यांच्याशी चर्चा, त्यांना घरगुती उपायांची माहिती देणे व स्थानिक डॉक्टरांच्या सहकार्याने शिबिरात नियोजन करणे ही सर्व कामे व्यासपिठाच्या कार्यकर्त्या उत्साहाने करतात.

प्रत्यक्ष शिबिराच्या दिवशी सर्व डॉक्टर्स विना मोबदला वेळ देतात. तात्कालिक औषधे, चष्मे यासाठी स्थानिक दुकानांची मदत मिळते. दीर्घकालिन उपचारांची गरज असल्यास कोठे जावे लागेल याचीही माहिती दिली जाते. कार्यवृत्त कालावधीत ८ वेगवेगळी शिबिरे झाली. साधारणपणे ४५० स्त्रियांना मदत करता आली.

मुरबाड येथेही माविम व प्रतिष्ठानच्या नवमहाराष्ट्र युवा अभियान विभागाच्या सहकार्याने आरोग्य शिबिर घेण्यात आले होते. महिला व्यासपिठाचाही त्यात सहभाग होता.

सामाजिक व आरोग्य विषयांवर महिलांनी गायलेली गीते हे या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य होते.

ऑगस्ट महिन्यात बोरीवली येथे महाराष्ट्र महिला मंडळातर्फे घेण्यात आलेल्या २५० स्त्री पुरुषांच्या आरोग्य शिबिरात ही व्यासपिठाच्या कार्यकर्त्यांनी भाग घेतला व अतिशय मदत केली. विविध कार्यक्रमांमध्ये अन्य संस्थांबरोबर सक्रिय सहकार्य हे व्यासपिठाच्या कामाचे वैशिष्ट्य आहे.

**विविध कार्यक्रम :**

१. महाराष्ट्र महिला व्यासपिठ व नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या वतीने 'संवाद संध्या' कार्यक्रमांतर्गत ज्ञानपिठ विजेते ज्येष्ठ कवी श्री विंदा करंदीकर यांच्या कवितांचे सादरीकरण श्रीमती उषा मेहता, नीरजा व प्रज्ञा लोखंडे या नामवन्त कवियत्रींनी केले. कवीच्या प्रतिभेची उंची व सखोलता जाणवून देणारा हा एक प्रतिभावंत कार्यक्रम - पूर्व प्रसिद्धी अभावी श्रोत्यांची संख्या मात्र मर्यादित होती. संवाद संध्या कार्यक्रम पुढेही चालू ठेवण्यात येणार आहे.

२. सप्टेंबर महिन्यात हैद्राबाद येथील NIRD या संस्थेत Gender in Education या विषयावर विजया चौहान यांनी आपले विचार मांडले.

३. लोकसंख्येतील स्त्रियांचे घटते प्रमाण हा एक अत्यंत काळजीचा विषय त्या अनुषंगाने स्त्रियांचे कायदेशीर हक्क, विवाह

नोंदणीचे महत्व इत्यादी विषयही स्त्रियांसमोर मांडणे महत्वाचे ठरते. व्यासपिठाच्या कार्यकर्त्या श्रीमती वासंती शेवाळे यांनी अहमदाबाद येथे या विषयावरील एका राष्ट्रीय कार्यशाळेत भाग घेतला होता (एप्रिल ०६) व नंतर ठिकठिकाणी या विषयावर मार्गदर्शन केले. भृणहत्या या विषयावर अन्य संस्थातर्फे होणाऱ्या कार्यक्रमांमधेही विशेषतः व्यासपिठाची पूर्णवेळ कार्यकर्ती शोभा लोंढे नेहमी भाग घेते. ऑक्टोबर महिन्यात असंघटीत क्षेत्रातील स्त्री कामगारांचे प्रश्न, स्त्री विषयक कायदे, शासकिय योजना व अंमलबजावणी इत्यादि विषयांवर झालेल्या कार्यशाळांमध्ये व्यासपिठाने भाग घेतला होता. अलिकडेच लोकसभा - विधानसभा येथे स्त्रियांना ३३% आरक्षण मिळावे व त्यासंदर्भातील विधेयक मजूर व्हावे म्हणून सर्व स्त्री संघटना पुन्हा चळवळ हाती घेत आहेत. खासदारांना भेटून त्यांच्याशी चर्चा हा त्या कामाचा एक भाग ज्यात व्यासपिठाचा सहभाग आहे.

४. गरीब मुलींचे शिक्षण हा व्यासपिठाच्या कार्यकर्त्यांचा जिव्हाळ्याचा विषय व्यासपिठाच्या मुलुंड विभागातील श्रीमती रतन गोडांबे कुसुम साळवी व किशोरी साळवे या त्या दृष्टीने अत्यंत क्रियाशील कार्यकर्ती आहेत. सप्टें ०६ महिन्यात मुलुंडमध्ये महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थिनींसाठी विविध स्पर्धांचे (चित्रकला, रांगोळी खेळ) आयोजन करून बक्षिसे देण्यात त्यांनी पुढाकार घेतला. रतन गोडांबे यांनी तर स्वखर्चाने इयत्ता १ लीतील गरीब मुलींना शैक्षणिक साहित्य विकत घेऊन दिले.

५. युवती नेतृत्व विकास, युवती प्रशिक्षण हे अन्य विभागीय केंद्रांच्या मदतीने महत्वाचे कार्यक्रम व्यासपिठातर्फे हाती घेतले जात आहेत. दलित, आदिवासी व मुस्लिम समाजातील १८ ते २५ वयोगटातील सुमारे १०० युवतींची निवड करून त्यांची वर्षभरात ३-४ शिबिरे घेऊन त्यांच्यामध्ये नेतृत्व रूजवण्याचा खास प्रयत्न करण्याच्या दृष्टीने व्यासपिठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान प्रयत्नशील आहे. त्यासाठीची पूर्वतयारी चालू आहे. विविध विभागीय केंद्रामार्फत राष्ट्रसेवादलाच्या सहकार्याने किशोरी प्रशिक्षण शिबिरे घेण्याच्या दृष्टीने नाशिक व पुणे येथे पूर्वतयारीच्या बैठका घेण्यात आल्या.डिसे.पासून ही शिबिरे सुरू होतील. तसेच विदर्भातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवा स्त्रियांच्या आर्थिक सामाजिक सांस्कृतिक अंगाने अभ्यास करण्याची कल्पना असून तसे प्रयत्न चालू आहेत.

६. पुणे विभागीय केंद्रा तर्फे श्रीमती शैला लिंमये सुहासिनी करंडक स्पर्धा घेतात. यावर्षी नाटय विषयावर एक कार्यशाळा आयोजित केली जाते. यामध्ये व्यासपिठातर्फे शोभा लोंढे, माधुरी व वासंती यांनी भाग घेतला.

**संघटनात्मक कार्यक्रम**

ऑगस्ट महिन्यात विभागीय केंद्रांच्या महिला प्रतिनिधींची एक बैठक मुंबईत घेण्यात आली. वर्षभरात हाती घेण्याचे कार्यक्रम विभागीय केंद्रांच्या अपेक्षा, कार्यकर्त्यांची बौद्धिक तयारी इत्यादि विषयांवर चर्चा झाली. बैठकीत उपाध्यक्ष श्री हुसेन दलवाई व सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी बहुमोल मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र महिला व्यासपिठाच्या संघटन समितीत पुढील कार्यकर्त्या काम करतात. (१) मंजुश्री भालेराव - मुलुंड (२) शालिनी गायकवाड - मुलुंड (३) रतन गोडांबे - मुलुंड (४) माधुरी शर्मा - दादर (५) वासंती शेवाळे - वरळी (७) अरूणा इसनगर - दादर (८) शाहजाबी हकिम - मुंबई सेंट्रल (९) कांचन पाटील - कुर्ला (१०) रेखा नार्वेकर - कुलाबा. त्याखेरीज सुजाता तपासे, मंदा मोरे, कुसुम व किशोरी साळवे, भारती या कार्यकर्त्यांचा देखील सक्रिय सहभाग असतो. संघटन समितीच्या दर २ महिन्यांनी बैठका होतात व कार्यक्रमांची चर्चा करून जबाबदारी घेण्यात येथे, शोभा लोंढे ही एकमेव पूर्णवेळ कार्यकर्ती निमंत्रक असून विजया चौहान संयोजक म्हणून काम पहातात.

निधीची चणचण, कार्यकर्त्यांच्या वेळेच्या मर्यादा या अडचणींवर मात करीत पुढे जाण्याचे प्रयत्न महाराष्ट्र महिला व्यासपिठ करीत आहे.

# नवमहाराष्ट्र युवा अभियान कार्यवृत्त

नवमहाराष्ट्र युवा अभियानचे काम संयोजक श्री दत्ता बाळसराफ व त्यांचे पूर्णवेळ सहकारी सुरेश पाटील हे पहातात.

**दि. २३ फेब्रु २००६ :** अपंग क्षेत्रात काम करणाऱ्या महाराष्ट्रातील प्रमुख संस्था व्यक्तींची राज्यव्यापी परिषद घेण्याबाबत पुणे येथील 'बाल कल्याण संस्था' येथे बैठक, प्रमुख उपस्थित श्री दत्ता बाळसराफ, श्री विजय कान्हेकर.

**दि.२४,२५ फेब्रु २००६ :** नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या २००७-२०१२ चा पंचवार्षिक कार्यक्रमाच्या आखणीसंदर्भात नाशिक येथे दोन दिवसाची बैठक आयोजित करण्यात आली होती. मा. श्री. विनायकदादा पाटील, मा. विजयाताई चौहान यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी दत्ता बाळसराफ होते. प्रस्तावाची मांडणी तसेच बैठकीचे उत्तम आयोजन श्री विश्वास ठाकूर व त्यांचे सहकारी यांनी केले.

**दि. २६ फेब्रु २००६ :** प्रतिवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रजांचा जन्मदिन 'मराठीदिन' म्हणून साजरा केला जातो. त्या निमित्ताने 'नवमहाराष्ट्र युवा अभियान' आणि 'अभिधानंतर' वाङमयीन चळवळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'नव जगणं...नवी कविता' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री कुमार केतकर. (संपादक, दैनिक लोकसत्ता) श्री सतीश काळसेकर, प्रा. प्रवीण बांदेकर, प्रा. नितिन रेंढे हे होते.

**दि.१२ मार्च २००६ :** समाजकार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाचा समारोप श्रीमती विजया चौहान यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. कार्यक्रमासाठी मा. दत्ता बाळसराफ, श्री. विजय कसबे, श्री. संजय शेटे श्रीमती अनिता पगारे इ. प्रमुख व्यक्ती उपस्थित होते.

**दि. १९ मार्च २००६ :** चेतना महाविद्यालय, वांद्रे, मुंबई येथे कविवर्य विंदा करंदीकर गौरवार्थ आयोजित केलेल्या कार्यक्रमात नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या कार्यकर्त्यांनी सहभाग.

**दि.१० एप्रिल २००६ :** नवमहाराष्ट्र युवा अभियान आयोजित 'अपंग हक्क व विकास परिषद' च्या पूर्वतयारीसाठीची बैठक यशवंतराव चव्हाण सेंटर येथे घेण्यात आली. या बैठकित मा. सुप्रियाताई सुळे, मा. दत्ता बाळसराफ, मा. विजय कान्हेकर, मा. वा. ना. तुंगार, डॉ. कल्याणी मांडके, मा. वसंत संखे इ. प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

**दि. १६ एप्रिल २००६ :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त धसई, ता. मुरबाड, जि.ठाणे येथे 'वैद्यकिय शिबीर व औषध वाटप' हा कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम नवमहाराष्ट्र युवा अभियान, पिनॅकल क्लब व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्तविद्यमाने घेण्यात आला.

या कार्यक्रमास पिनॅकल क्लबचे संतोष कल्याणपूर, सचिन आयरे, माविमच्या पुष्पा खंडे व इंदिरा ढोबळे आणि नव महाराष्ट्राचे कार्यकर्ते उपस्थित होते.

**२३ व २४ एप्रिल :** सृजन बालमहोत्सव कराड -

या बालमहोत्सवात मुंबईहुन शुभानंद जोग, विवेक टेटविलकर, विवेक प्रभूकेळूसकर आदि प्रशिक्षक तर सुरज भोर्डर, रविंद्र झेंडे, कार्यालय प्रमुख सुरेश पाटील तसेच संयोजक दत्ता बाळसराफ व सहसंयोजक विश्वास ठाकूर उपस्थित होते. या कार्यशाळेच्या समारोपात मा. खा. सुप्रिया सुळे, मा. खा. श्रीनिवास पाटील, आमदार बाळासाहेब पाटील, डॉ. सुरेश भोसले, सौ. उत्तरा भोसले उपस्थित होते. संयोजन विभागीय संघटक अभिजित कुलकर्णी यांनी केले.

**शैक्षणिक गुणवत्ता (प्राथमिक शिक्षण) चर्चासत्र**

महाराष्ट्रात शिक्षणांच जाळं सर्वत्र पसरलेलं आहे. दुर्गम भागातील प्रत्येक वस्ती-पाडयापर्यंत शिक्षणाच्या सुविधा पोहोचवण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. तरीही प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत गुणवत्ता, शिक्षकांच्या कामाचे मुल्यमापन, प्रयोगशिल शाळा व शासन, शाळा चालकांची भूमिका, शाळांमधील अध्ययन पद्धती आनंदायी कशी करता येईल ? ग्रामीण भागात फारसे साहित्य नसतांना शिक्षकांना कोणते उपक्रम राबवता येतील ? आजच्या प्रशिक्षणातील दोष कोणते? प्रशिक्षण केवळ तांत्रिक न राहता त्या जीवंतपणा कसा आणता येईल. शिक्षकांचा व्यक्तिविकास, ग्रामशिक्षण समित्यांचे कामकाज या सारख्या अनेक बाबींचा उहापोह करण्यासाठी दि.

१८ जून २००६, रविवारी यशवंतराव चव्हाण केंद्रात दिवसभराचे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

या चर्चासत्रात, रमेश पानसे, विजया चौहान, मंजिरी निमकर, हेरंब कुलकर्णी, गिरीश सामंत, हर्षवर्धन सपकाळ, शहाजी ढेकणे, रमेश जोशी, यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील ३५-४० तज्ज्ञांनी सहभाग घेतला. प्रतिष्ठानचे सरचिटणीस शं. ग. काळे व कोषाध्यक्ष डॉ. रवी बापट यांचीही चर्चासत्रात महत्वपूर्ण उपस्थिती होती राज्याचे तत्कालीन शिक्षण सचिव सुमित मलिक, सर्व शिक्षा अभियानचे ज. मो. अभ्यंकर, भाऊ गावंडे, लोकसत्ताच्या सहसंपादिका शुभदा चौकर, रमेश जोशी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तर्फे मा. सुप्रिया सुळे, यांनी या चर्चासत्राचे आयोजन करण्यात पुढाकार घेतला होता.

समारोप सत्रात शिक्षण सचिव सुमित मलिक यांनी शासनाची भूमिका मांडली.

चर्चासत्राच्या समारोपात डॉ. रवी बापट यांनी शहरी व ग्रामीण भागातील शालेय शिक्षणातील तफावत लक्षात घेवून दोन्ही भागांची स्वतंत्र चर्चासत्र घेणे आवश्यक आहे असे सांगितले.

प्राथमिक शिक्षणाच्या चर्चासत्रात राज्याचे सचिव सुमित मलिक यांची दिवसभराची उपस्थिती, शिक्षणक्षेत्रातील अभ्यासकांची नेमकी व आटोपशीर मांडणी, शालेय शिक्षण क्षेत्राबद्दल आस्था असलेल्यांचा सहभाग आणि समस्या व उपाय यांची मुद्देसूद व नियोजनबद्ध चर्चा हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल.

दत्ता बाळसराफ व युवराज मोहिते यांनी या चर्चासत्रासाठी संपर्क साधून समन्वयाचे काम केले.

**दि. १९ जून :** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या कार्यकारी मंडळाची बैठक पार पडली. या सभेस संयोजक, सहसंयोजक सर्व विभागीय संघटक व विशेष निमंत्रीत उपस्थित होते. या बैठकीमध्ये येणाऱ्या वर्षामध्ये घेण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरवण्यात आली व ठराव मंजूर करण्यात आले.

**दि. १४ ऑगस्ट :** स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येस स्वातंत्र्य फेरी आयोजित करण्यात आली होती. या फेरीस मुंबईचे संघटक दिनेशचंद्र हुलावळे, राजू घुगे, दिपा देशमुख, विजय कसबे, सुरेश पाटील, सिद्धेश्वर डुकरे, प्रा. राजेंद्र जाधव इत्यादी उपस्थित होते. महात्मा गांधी यांच्या पुपळयास अभिवादन करून या फेरीची सुरूवात झाली पुढे महात्मा फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करीत फेरी संपन्न झाली.

**कर्जदार जागरण शिबीर - पूर्वतयारी बैठक**

गुरुवार दिनांक २४ ऑगस्ट 'सुजलाम सुफलाम महाराष्ट्राची उभारणी' हे नवमहाराष्ट्र युवा अभियानचे स्वप्न आहे. कर्जबाजारपणाच्या विळख्यात मोठया संख्येने अडकल्याचे दिसते. या विळख्यात सापडलेली व्यक्ती व कुटुंब नैराश्याच्या गर्तेत सापडल्यानेच व्यसनाधिनता, जुगार वा आत्मनाशाकडे ओढली जाते. मात्र कर्जबाजारपणाची अनेक कारणे आहेत. या कारणांच्या मुळाशी जाऊन सामुहिक प्रयत्नातून कर्जबाजारपणाच्या समस्येशी झगडावे लागणार आहे. त्यासाठी नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या मुंबई विभागातर्फे कर्जदार जागरण शिबीराचे आयोजन करण्याचा उद्देश आहे.

**दि.१३ सप्टे. २००६ :** असंघटीत कामगारांच्या सामाजिक सुरक्षेसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या महाराष्ट्रव्यापी रॅलीच्या मुंबईच्या आयोजनासंदर्भातील पूर्वतयारी बैठक शासकीय बराकीत घेण्यात आली. या बैठकिस मा. आ मृणालताई गोरे, मा. अरविंद वैद्य, मा. नितीन पवार, मा. मार्क्वीस जडारे, मा. दिपक शेलार, मा. दत्ता बाळसराफ, मा. शंकर साळवे, इ. उपस्थित होते.

**१६ सप्टे २००६ :** असंघटित कामगारांच्या सामाजिक सुरक्षा रॅलीचे स्वागत मुंबईतील बहुसंख्य संस्था व संघटना यांनी करावे यासाठी येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस मच्छिंद्र वानखेडे, अनुपम साळवे, सागर नायडे, प्रविण शिंदे, त्रिवेणी माने, विद्या पाटील, नवमहाराष्ट्र युवा अभियानचे मुंबईचे सह संघटक रविंद्र झेंडे इ. उपस्थित होते.

**२० सप्टे. २००६ :** महाराष्ट्र राज्याचे उप-मुख्यमंत्री मा. आर.आर. पाटील यांनी आयोजित केलेल्या अपंगांच्या विविध समस्यांसंदर्भातला बैठकिस अपंग हक्क व विकास मंचाच्या संयोजिका मा. सयप्रियाताई सुळे, मा. विजय कान्हेकर, मा.

दत्ता बाळसराफ, मा. हेमंत टकळे, सुरेश पाटील, दिपक शेलार इ. हजर होते.

**२४ सप्टे. २००६ :** नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या विभागीय संघटकांची बैठक यशवंतराव सेंटर येथे घेण्यात आली. या बैठकित सर्व विभागांचे अहवाल सादर करण्यात आले. तसेच आगामी काळात घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमाबाबत साधक बाधक चर्चा करण्यात आली. या बैठकीमध्ये संघटनेच्या विविध विभागात व राज्य कार्यकारणीत अधिक कार्यकर्त्यांनी सहभागी करण्याबाबत विचार विनिमय करण्यात आला. राज्याच्या सहसंयोजनाची जबाबदारी असल्यामुळे नाशिक विभागाच्या संघटक पदाची जबाबदारी दिपाली मानकर यांनी स्विकारावी असे विश्वास ठाकूर यांनी सुचविले व त्यांस सर्वांनी मान्यता दिली. तसेच मराठवाडा विभागाचे समन्वयक म्हणून विजय कान्हेकर, मुंबईचे सह-संघटक म्हणून रविंद्र झेंडे व राज्य कार्यकारणीवर विशेष निमंत्रित म्हणून विजय कसबे, डॉ. दिपा देशमुख, अंजली काटे यांनी जबाबदारी घ्यावी असे दत्ता बाळसराफ यांनी सुचविले व त्यांस सर्वांना मान्यता दिली.

**२५ सप्टे. २००६ :** महिला व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कविवर्य विंदा करंदीकर यांच्या कवितेवर आधारित 'संवादसंध्या' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

**'फिल्म एप्रिसिएशन यात्रा'**

नवमहाराष्ट्र युवा अभियान व 'इंडियन फिल्म ॲकेडेमी' (इफा) तर्फे आयोजित केलेल्या 'फिल्म एप्रिसिएशन यात्रा' या उपक्रमाचा शुभारंभ नाशिक येथून झाला. तेथील के. टी. एच. एम. या महाविद्यालयात सोमवार दिनांक ७ ऑगस्ट २००६ रोजी पहिली कार्यशाळा घेतली. शाळा-कॉलेजच्या पातळीवर चित्रपट शिक्षण दिलं जावं आणि त्यांच महत्व समाजातील सर्व थराला, विशेषतः शिक्षण व्यवस्थेला समजावून द्यावे म्हणून हा उपक्रम हाती घेण्यात आला. महाराष्ट्रातील जवळपास सर्व जिल्ह्यातील ५० शहरातील ५० कॉलेजात एक दिवसाच्या चित्रपट रसास्वाद कार्यशाळेच (फिल्म एप्रिसिएशन वर्कशॉप) आयोजन असा ह्या 'फिल्म एप्रिसिएशन यात्रा' या उपक्रमाचा कार्यक्रम आहे. सहा तासांच्या या कार्यशाळेत चित्रपट इतिहास (माध्यम स्वरूप आणि विकास), चित्रपटाची भाषा, चित्रपट आणि तमाम पारंपारीक कला, चित्रपट कला विरूद्ध धंदा आणि चित्रपट रसग्रहण या पाच विषयांवर संवादपूर्ण व्याख्यान, चर्चा आणि जगातला पहिला चित्रपट (१८९५), दादासाहेब फाळके यांनी निर्माण केलेला पहिला भारतीयपट 'राजा हरिश्चंद्र' (१९१३) तसेच देशी-परदेशातील काही चित्रपटातील निवडक दृश्ये, काही लघूपट यांचं विषयानुरूप प्रदर्शन असं या कार्यशाळेच स्वरूप होते.

**७ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २००६**

कॉलेजेस : २५

उपस्थिती -

प्रत्येक ठिकाणी १५० ते २०० विद्यार्थी, साधारणपणे १० प्राध्यापक आणि विशेष पाहूणे म्हणून १५ ते २० गावातील मंडळी असत.

व्याख्यानाचे एकूण तास : १५०

प्रमुख वक्ता व सुत्रधार : अशोक राणे

**समाजकार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग - २००६**

**प्रशिक्षण समन्वयक :** श्री. विजय कसबे

प्रतिवर्षीप्रमाणे घेण्यात येणाऱ्या समाजकार्यकर्ता प्रशिक्षण वर्गाची सुरूवात झाली. सदर प्रशिक्षण वर्गाचे वर्ग पुढील प्रमाणे घेण्यात आले.

**दि. २० ऑगस्ट २००६**

**विषय** : स्व. ओळख, मूद्दे व निर्णय

**वक्ते** : मा. जगन्नाथ कांबळे

**दि. ३ सप्टें २००६**

**विषय** : समाजकार्याचा इतिहास

**प्रमुख वक्ते** : श्री भगवान सूर्यवंशी

**विषय** : मानवी विकासाचे टप्पे

**वक्ते** : श्री. अरविंद वैद्य

**दि. १७ सप्टें २००६**

**विषय**

१) व्यक्ती सहयोग कार्य

२) संवाद व्याख्या व प्रकार

३) भूमिका सादरीकरण

**वक्ते** : श्री. जगन्नाथ कांबळे

# अपंग हक्क व विकास परिषद २००६

माध्यम

*दिपक शेलार*

केंद्र सरकारने १९९२ मध्ये अंध आणि अपंग नागरिकांसाठी आर.आय.सी. (पुनर्वसन) कायदा केला. त्यामुळे अपंगांना विकासाची संधी उपलब्ध झाली. त्यांच्या पुनर्वसनाचे प्रयत्न होऊ लागले. त्यानंतर १९९५ मध्ये समान संधी, हक्क सरक्षण व पूर्ण सहयोग कायदा तर १९९९ मध्ये समर्थ, सशक्त व संघटन पुनर्वसन कायदे संमत झाले आणि खऱ्या अर्थाने अपंगांच्या पुनर्वसनास जोर आला. त्यांच्या विकासासाठी अनेक संस्था उदयास आल्या. अपंगांना आपणही समाजाचे घटक आहोत, समाजात आत्मविश्वासाने वावरण्यासाठी इतरांप्रमाणे आपणासही नोकरीची संधी तसेच नोकरी व उद्योग धंद्यात सवलती मिळाल्या पाहिजेत याची जाणीव होऊ लागली.

आज अपंगांच्या विकासासाठी अनेक संस्था अस्तित्वात असल्यातरी प्रत्येक अपंगाचे सामाजिक आणि आरोग्य विषयक प्रश्न निराळे आहेत. शिवाय हा प्रवर्ग एकसंध नसल्यामुळे त्यांच्या समस्याविषयी एकत्रितपणे चर्चा करुन त्या जाणून घेणे आणि उद्याची दिशा निश्चित करणे यासाठी १ व २ जुलै २००६ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या नवमहाराष्ट्र युवा अभियान यांनी मुंबईत अपंग हक्क व विकास परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेला केंद्रीय कृषीमंत्री मा.ना. शरद पवार, उपमुख्यमंत्री मा.ना. आर. आर. पाटील, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री मा.ना. दिलीप वळसे- पाटील, सामाजिक न्यायमंत्री मा. ना. धर्मरावबाबा अत्राम अपंग कल्याण आयुक्त आर. के. गायकवाड यांच्यासह राज्यभरातून १०० मान्यवर तसेच १५० उपचार तज्ञ आणि ७५० प्रतिनिधी उपस्थित होते.

दोन दिवस चाललेल्या या परिषदेत अपंगांच्या विकासासाठी राबविण्यात आलेले विविध कायदे आणि त्यांच्या समस्या या विषयक चर्चा झालीच याशिवाय अपंगांच्या स्वयंसेवी संस्थांना भेडसावणाऱ्या अडचणी व त्यावरील उपाय यावर विचार करण्यात आला. चर्चेत अपंगांच्या कायद्याची नीट अमलबजावणी होत नसल्याबद्दल खत व्यक्त करण्यात आली. तसेच अपंग आयुक्त हा अपंग असावा, त्याचप्रमाणे कायद्याच्या अमलबजावणीसाठी नेमलेल्या सल्लागार समितीमध्ये अपंगांचा सहभाग असावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. अपंगांच्या कायद्यात विशेष शाळांच्या तपासणीचे निकषही बदलण्याची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले.

चार सत्रात चालविण्यात आलेल्या या परिषदेत अंध, दृष्टीदोष, कर्णबधिर, मुकबधिर, अस्थिव्यंग व मतिमंद या अपंगाच्या सर्व प्रवर्गाच्या विविध प्रश्नांवर विचारवंतानी आपले मनोगत व्यक्त केले. दोन दिवसात झालेल्या चर्चेतून समोर आलेल्या अपंगांच्या समस्या प्रतिष्ठानचे सरचिटणीस शरद काळे यांनी प्रास्ताविकातून मांडल्या. अपंगांच्या सर्व प्रवर्गांचे प्रश्न वेगवेगळे व गंभीर असून त्यांची उत्तरे ही स्वतंत्रपणे शोधण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. अपंग आणि आरोग्य या विषयावर चर्चा करतांना डॉक्टर रवी बापट यांनी आई ही बालकांची पहिली तज्ञ आहे. अपंग मुलांना इतर मुलांसारखाच दंगा आवडतो असे मार्मिक विश्लेषण केले. बालविकासातील अडथळे ओळखण्याच्या सोप्या पद्धती त्यांनी यावेळी सांगितल्या. तर डॉ. कदम यांनी मतीमंद मुलांच्या समस्यांबाबत विवेचन केले. डॉ. मिलिंद कान्हेकर यांच्या अपंगत्वाचा पालक व स्वयंसेवी संस्थांनी खरोखरच स्वीकार केला आहे का?

यप्रश्नाने उपस्थितांना आत्मपरिक्षण करावयास लावले. मुंबई, ठाणे, पुणे व नागपूर शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात अपंगत्वाचा म्हणावा तितका स्वीकार झाला नसल्याचे दिसून येते. पालक अपंग बालकांकडे एक बोजा म्हणून पाहतो. ग्रामीण भागामध्ये स्वयंसेवी संस्था झाल्या आहेत. त्यांनी अपंगांचा स्वीकार केला. कारण या विशेष शाळांना शासकीय अनुदान मिळते. डॉ. मिलिंद कान्हेकर यांनी उपस्थित केलेला प्रश्न समाजाला नक्कीच विचार करायला लावणारा आहे.

डॉ. निलिमा देसाई यांनी मतीमंद मुलांना गिर्यारोहण करावयास नेले होते. तो क्षण रोमांचकारक व या मुलांचा आत्मविश्वास वाढविणारा होता असे सांगितले. घराच्या किंवा शाळेच्या चार भिंतीत अडकून राहिल्यानंतर निसर्गाच्या सान्निध्यात जेव्हा ही मुले बागडली असतील. तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर एक सात्वीक समाधान झळकले असेल, कारण निसर्गाच्या सानिध्यात मानवाचे चित्त प्रफुल्लीत करण्याची ताकद आहे. डॉ. निलिमा देसाई यांचा हा उपक्रम अतिशय स्तुत्य असून इतर संस्थांनी देखील हा उपक्रम राबविल्यास मतीमंद मुलांना त्याचा नक्कीच फायदा होणार आहे.

अपंगांच्या प्रवेश नियमात सुधारणा, पुनर्वसनाच्या बाबतीत पाठपुरावा, याबाबत एनजीओची भुमिका तसेच विविध उपचार पद्धतीमुळे अपंगांचे आयुष्यमान वाढल्यामुळे प्रौढ अपंग पुनर्वसन याबाबत विविध सूचना या परिषदेत मांडण्यात आल्या.

अपंगत्व व शैक्षणिक आव्हाने या विषयावरील चर्चासत्रात अपंगांच्या शिक्षणाचे सद्यस्थितीतले मुल्यमापन, भविष्यातील शिक्षणाच्या गरजा यावर यावेळी चर्चा करण्यात आली. अनेक नामवंत तज्ञांनी या मध्ये भाग घेतला. अपंगांच्या विशेष शाळांमध्ये अद्यापही त्यांच्यासाठी विशेष कौशल्य निश्चित करण्यात आली नाहीत. अपंगांच्या प्रत्येक प्रवर्गाच्या गरजा काय आहेत याचाही योग्य तो विचार करण्यात आला नाही. त्याचबरोबर १८ वर्षांनी या मुलांनी काय करावे यासाठी व्यावसायशिक्षणाची रुपरेषा होणे गरजेचे आहे. असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. अपंगांच्या सर्वांगीण विकासासाठी या तिन्ही बाबी महत्वाच्या असून त्याचा साकल्याने विचार होणे गरजेचे आहे. बहुतेक तज्ञांचा कल अपंगांसाठी नविन शिक्षण प्रणाली अस्तित्वात येणे आवश्यक असल्याकडे होता. तर काही जणांनी चर्चासत्रात केवळ अपंगांच्या प्राथमिक शिक्षणाची चर्चा झाल्याचा आरोप करुन अपंगांनी उच्च शिक्षण घेऊच नये त्यांनी फक्त टेलिफोन ऑपरेटरच बनावे का ? असे मत व्यक्त केले.

देशात जनगणनेच्या आकडेवारी नुसार अपंगांच्या एकुण संख्येमध्ये ४२ टक्के स्त्रिया आहेत. महाराष्ट्रात ही संख्या ४० टक्के इतकी आहे. अपंग मुलींकडे दुर्लक्ष झाल्यामुळे केवळ ३८ टक्के अपंग मुली शिक्षणाचा लाभ घेतात. अनेक अपंग स्त्रियांना लग्न व माता बनण्याचा हक्क आहे याची जाणीवही नाही. अपंग पुरुषांची लग्ने सहज होतात परंतु अपंग स्त्रियांना लग्न करताना अडचणी येतात हे मांडण्यात आलेले चित्र विदारक आहे. समाजाने याकडे जाणीवपूर्वक पाहिले पाहिजे आणि ही परिस्थिती बदलली पाहिजे. अपंग महिलांना प्रोत्साहन देऊन त्यांच्या मनात विश्वास निर्माण करुन तु हे करु शकतेस म्हणजे तिचा खरा विकास होईल. अपंग स्त्रियांचे प्रश्न फार गंभीर असून त्यांच्या वैद्यकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक अडचणी फार आहेत. याकडे प्रकर्षाने पाहिले पाहिजे.

या सत्रात साप्ताहिक महाराष्ट्र अपंग शक्तीचे संपादक दिपक शेलार यांनी सर्व प्रकारच्या अपंगांचा कायदा १९९५ अन्वये एक संघ व्हावा त्यात कुष्ठरोग मुक्तांचा समावेश

असल्यामुळे त्यांनाही पुनर्वसनात सहभागी करुन घेण्यात यावे. त्याचप्रमाणे त्यांनी एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला. एच. आय. व्ही. बाधितांचाही अपंग प्रवर्गामध्ये समावेश करण्यात यावा अशी मागणी केली. देशात एच.आय.व्ही. बाधितांची संख्या फार आहे. एच.आय.व्ही. बाधितांना एक प्रकारचे पंगुत्व लादले जाते. समाज त्यांना आपल्याबरोबर घेण्यास तयार नसतो. अशी माणसे असहाय्य व हतबल असतात. समाजाच्या घृणेची ती शिकार असतात अशावेळी या लोकांचे जीवन सुसाह्य होण्यासाठी त्यांचे एकत्रित पुनर्वसन करणे जरुरीचे आहे. त्यांचा अपंग प्रवर्गात समावेश झाल्यास अपंगांच्या सवलती मिळून त्यांच्या जगण्यात एक नवी उमेद येईल.

या सत्रात अपंग कल्याण आयुक्त श्री. गायकवाड यांनी शासनाने राज्यात अपंगांसाठी हाती घेतलेल्या उपक्रमाची माहिती दिली. शासनाने विविध माध्यमातून १२५ कोटी रुपयांची तरतूद अपंगांच्या कल्याणासाठी केली असून त्यांच्यासाठी राष्ट्रीय स्तरावर कार्य करणारा एक सेल स्थापन करण्यात येणार आहे. अपंगांच्या राखीव जागा भरण्यासाठी मुख्यसचिवांच्या अध्यक्षतेखाली बैठका झालेल्या आहेत असेही त्यांनी यावेळी सांगितले. ही माहिती उपस्थितांना नक्कीच दिलासा देणारी होती.

दोन दिवस चाललेल्या या परिषदेच्या समारोप प्रसंगी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांनी अपंगांच्या प्रश्नाचा धोरणात्मक विचार राज्य व केंद्र पातळीवर केला जाईल तसेच आतापर्यंत आखलेल्या धोरणांची समिक्षा व विश्लेषण करण्याची गरज असल्याचे सांगितले. तर उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील यांनी अपंगांच्या प्रश्नांवर विचार मांडतांना सांगितले की अपंगांच्या प्रश्नांवर स्वतंत्र बैठका घेऊन त्यांचे प्रश्न त्या त्या प्र वर्गाच्या समस्याप्रमाणे सोडविले जातील.

या परिषदेची फलित म्हणजे अंध, दृष्टीदोष, अस्थिव्यंग, कर्णबधिर, मुकबधीर व मतिमंद इत्यादी अपंगांच्या प्रवर्गांना विस्तृत व्यासपिठ उपलब्ध झाले. या सर्व प्रवर्गांचे प्रश्न भिन्न असल्याने या सर्व प्रश्नांचा एकाच व्यासपिठावरुन एकत्रित विचार करण्याची संधी यामुळे उपलब्ध झाली असून त्यावर सर्वंकष उपाय निघण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अपंगांचे व्यावसायिक, वैद्यकिय, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, मानसिक पुनर्वसन करण्यासाठी विशेष मोहिमेची आवश्यकता आहे. समाजाने देखील अपंगांच्या सकारात्मक दृष्टीकोन अंगिकारला पाहिजे. तरच अपंगांची उद्याची पहाट विकासाची असेल, असे परिषदेच्या संयोजिका सौ. सुप्रियाताई सुळे म्हणाल्या. परिषदेचे सूत्रसंचलन समन्वयक विजय कान्हेकर व डॉ. कल्याणी मांडके यांनी केले. तसेच ऐन पावसातही परिषदेच्या व्यवस्थापनाची चोख जबाबदारी समन्वयक दत्ता बाळसराफ व सहकारी विश्वास ठाकूर (नाशिक), बापू दासरी (नांदेड), डॉ. दिपा देशमुख, अरुण रसाळ, निलेश राऊत (औरंगाबाद), सुरेश पाटील (मुंबई), प्रशांत दलाल (परभणी) व सर्व सहकाऱ्यांनी यशस्वीपणे पार पाडली तसेच सभागृहाचे व्यवस्थापक मा. विजय देसाई यांचे मोलाचे सहकार्य झाले. परिषदेत ठरल्याप्रमाणे मा.ना. आर.आर. पाटील, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात अपंगांच्या मागण्याबाबत सामाजिक न्यायमंत्री मा. चंद्रकांत हंडोरे, सामाजिक न्याय राज्यमंत्री मा. धर्मरावबाबा अत्राम, अपंग हक्क व विकास मंचाच्या संयोजिका मा. सौ. खा. सुप्रियाताई सुळे व मंचाचे इतर पदाधिकारी दि. २० सप्टेंबर २००६ रोजी प्रमुख उपस्थितीत बैठक झाली.

# अपंगांना २०० फूट जागा मिळावी

**अपंग हक्क व विकास मंचाचे विशेष प्रयत्न**

शासनाने कायदा १९९५ अन्वये अपंगांसाठी सार्वजनिक मोकळ्या जागेत २०० चौ. फुट जागा विना लिलाव नझुल सर्वेअरतर्फे सर्वे करुन अपंगांसाठी प्राधान्याने आरक्षित करुन त्यांचे नावे मालकीतत्वावर त्याचे किमान शुल्क आकारणी करुन जिल्हाधिकारी मार्फत देण्याचे संदर्भीय शासन निर्णयानुसार मंजुर झालेले आहे. परंतु जिल्हास्तरावरुन याबाबत अपंगांना सहकार्य व प्रोत्साहन मिळत नाही. नागपूर व वाशिम जिल्ह्यात अशा प्रकारच्या जागा वाटप झालेल्या आहेत. राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये याची परिणामकरित्या अंमलबजावणी व्हावी यासाठी आपल्या स्तरावरुन अंमलबजावणीसाठी परिपत्रक पारित व्हावे हयासाठी उपमुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत अपंग हक्क व विकास मंच आयोजित २० सप्टेंबर २००६ रोजी झालेल्या बैठकीत मंत्रालयात त्यांच्या दालनात जाहिर करण्यात आले.

---

# अपंगांना कृत्रिम अवयव व शस्त्रक्रियेसाठी सर्वतोपरी मदत केली जाईल - आरोग्यमंत्री

**अपंग हक्क व विकास मंच विशेष**

अपंगांना कृत्रिम अवयव उपलब्ध करुन देणे व शस्त्रक्रिया यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल अशी ग्वाही सार्वजनिक आरोग्यमंत्री विमलताई मुंदडा यांनी दिली. अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने आणि शस्त्रक्रिया यासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानाचा वापर न झाल्याने ते मागील दोन वर्षे परत पाठवावे लागले. यासंदर्भात अपंगांच्या एका शिष्टमंडळाने आरोग्यमंत्री मुंदडा याची मंत्रालयात भेट घेतली त्यावेळी त्या बोलत होत्या. राज्यभर जिल्हा पातळी ते राज्यपातळी पर्यंत अपंगाना कृत्रिम अवयव उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच शस्त्रक्रिया करण्यासाठी आरोग्य विभाग व अपंग हक्क व विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने शिबीरे तसेच कृत्रिम अवयवांचे वाटप आयोजित करण्यात येतील असेही त्यांनी सांगितले.

बैठकीस संयोजिका सौ. सुप्रियाताई सुळे, संयोजक समिति सदस्य मा. हेमंत टकले, समन्वयक विजय कान्हेकर, सुरेश पाटील, प्रसिद्धी प्रमुख दिपक शेलार उपस्थित होते.

**दिपक शेलार**

प्रसिद्धी प्रमुख : अपंग हक्क व विकास मंच,

२०२, चर्चगेट चेबर्स, ५, न्यू मरिन लाईन्स,

मुंबई - ४०० ०२०. मो.: ९८१९१६०३६७

माध्यम

दिपक शेलार

# अपंग हक्क व विकास परिषद २००६

**• क्षणचित्रे •**




स्मरणिका प्रकाशन सोहळा




मा. शरद पवार साहेबांचे मार्गदर्शन



उद्घाटन प्रसंगी मा. दिलीप वळसे-पाटील व मान्यवर



समारोप प्रसंगी मा. आर. आर. पाटील, उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य



परिषदेचा मंत्रालयात पाठपुरवठा करताना मा. उपमुख्यमंत्री आर. आर. पाटील सोबत मा. धर्मराव बाबा आत्राम व मान्यवर



उपस्थित प्रतिनिधी सोबत श्री. दिपक शेलार

# कायदे विषयक सहाय्य व सल्ला फोरम कार्यवृत्त

१९९२ पासून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने कायदे विषयक सहाय्य व सल्ला फोरम विभाग सुरू केला.

विधी सेवा प्राधिकरण आधिनियमाला अभिप्रेत असलेली सर्व काम या फोरम मार्फत केली जातात. त्या मध्ये मोफत सल्ला देणे, पक्षकारांच्या वादामध्ये समेट घडवून आणणे, लोक न्यायालयांचे आयोजन करणे, कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विशेष व्याख्यानांचे आयोजन करणे, विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे, विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूटकोर्ट, निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे किंवा विधी संशोधन करुन असे प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे इत्यादी कामांचा समावेश होतो. परंतु मोफत वकील देण्याचे काम फोरम कडून केले जात नाही. त्यानुसार गेल्या आठ महिन्यामध्ये फोरम कडून करण्यात आलेल्या कामाचा आढावा खालील प्रमाणे आहे.

**१)फोरमच्या बैठका :** योजनेचे काम व्यवस्थित होण्यासाठी त्या बाबत विचार करण्याची आणि धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी दर महिन्याला फोरमच्या बैठका घेतल्या जातात.

**२) सल्ला केंद्र :** गरजवंताना मोफत सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० पासून सल्ला केंद्र चालविले जाते. निष्णांत वकीलांमार्फत सल्ला दिला जातो गेल्या आठ महिन्याच्या कालावधी मध्ये या केंद्रांचे काम त्यानुसार ३३ दिवस झाले.

**३) विधी साक्षरता कार्यशाळा :** सामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असलेल्या कायद्याची माहिती करुन देण्यासाठी महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन केले जाते. या साठी, महिला, पुरुष व विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, सहकारी गृह निर्माण संस्थेचे सदस्य यांच्या साठी खास प्रकल्प बनविण्यात आले आहेत. त्यानुसार गेल्या आठ महिन्या मध्ये खालील कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

३.१) फोरम व आचार्य मराठी महाविद्यालय, चेंबुर यांच्या संयुक्त विद्यमाने त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी रविवार दिनांक ५ फेब्रूवरी २००६ रोजी सकाळी १०.०० व सायंकाळी ६.०० वाजे पर्यंत एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते. अध्यक्ष श्री. मापणकर हे होते.

३.२) फोरम व खारघर केरळा समाज यांच्या संयुक्त विद्यमाने गोखले हालस्कूल खारघर नवी मुंबई येथे रविवार दिनांक ५ मार्च २००२ रोजी सहकार गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यासाठी एक दिवसाची कार्यशाळा घेण्यात आली, २०० पेक्षा जास्त लोक उपस्थित होते. अध्यक्षस्थानी श्री राधाकृष्णन् हे होते.

३.३) फोरम व सलाह संस्था भांडूप यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १९ मार्च २००६ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६.०० पर्यंत), युवक प्रतिष्ठान सभागृह, भांडुप (पूर्व) येथे सहकारी गृह निर्माण संस्थांचे सद्स्यांसाठी गृह निर्माण संबंधी असलेल्या कायद्या संबंधी एक विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. १०० पेक्षा जास्त लोक उपस्थित होते. श्री मधुकांत पाथारिया हे अध्यक्षस्थानी होते.

३.४) फोरम व समीप प्रतिष्ठान, डोंबिवली यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक २ एप्रिल २००६ रोजी रोटरी सेवा सभागृह, डोंबिवली येथे सामान्य स्त्री-पुरुषांसाठी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. २०० पेक्षा जास्त स्त्री-पुरुष उपस्थित होते. श्री अनील भानुदास हे अध्यक्षस्थानी होते.

३.५) फोरम व कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, वाशी यांच्या संयुक्त विद्यमाने त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यासाठी त्या महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये रविवार दिनांक ६ ऑगस्ट २००६ रोजी एक विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, १०० पेक्षा जास्त विद्यार्थी (मुले व मुली) उपस्थित होते. ठाणे जिल्हा न्यायाधीश श्री हेमंत देशपांडे हे अध्यक्ष होते व मुंबई उच्च न्यायालयाचे पीठासीन न्यायमूर्ती श्री डी जी देशपांडे हे प्रमुख पाहुणे होते.

३.६) फोरम व वीर वाजेकर महाविद्यालय, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने त्या महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी रविवार दिनांक १३ ऑगस्ट २००६ रोजी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी (मुले व मुली) उपस्थित होते. रायगड जिल्हा न्यायाधीश श्री खानझोडे हे अध्यक्ष होते याची मुंबई उच्च न्यायालयाचे पीठासीन न्यायमूर्ती मा. श्री. अभय ओक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

३.७) फोरम व डी वाय पाटील विधी महाविद्यालय, नेरुळ यांच्या संयुक्त विद्यमाने त्या महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये त्यांच्या विद्यार्थ्यांसाठी रविवार दिनांक २० ऑगस्ट २००६ रोजी एका विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्ष स्थानी ठाणे जिल्हा न्यायाधीश श्री हेमंत देशपांडे होते व प्रमुख पाहुणे म्हणुन मुंबई उच्च न्यायालयाचे पीठासीन न्यायमूर्ती मा. श्री. राधाकृष्णन हे उपस्थित होते. २०० पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते.

३.८) फोरम व डोंबिवली ज्येष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त विमाने ज्येष्ठ नागरिकासाठी श्री ज्ञानेश्वर मंगल कार्यालय, डोंबिवली येथे रविवार दिनांक २२ सप्टेंबर २००६ रोजी एक विधीसाक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. १०० पेक्षा जास्त जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

वरील सर्व विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये संविधानच्या सरनाम्याचे वाचन करण्यात आले. तसेच मूलभूत कर्तव्याबाबत आणि हुंडा बंदी बाबत शपथा घेण्यात आल्या.

४) कायद्याची ओळख योजना : या योजने अंतर्गत दिनांक २९ एप्रिल २००६ रोजी श्री महाबळेश्वर मोरजे' यांचे डेव्हलपमेंट कंट्रोल रेमग्युलेशन या विषयावर व्याख्यान झाले. श्री शशी प्रभु, शिल्पकार हे अध्यक्ष होते. या वेळी मुंबई महानगरपालिकेचे निवृत्त चीफ इंजिनियर, श्री साने व माजी मंत्री श्री दिवाकर रावते यांची सुद्धा भाषणे झाली.

५) 'न्यायालयात मराठीचा वापर' या बाबतची चळवळ या चळवळीचा भाग म्हणून फोरम तर्फे खालील कार्यक्रम आयोजीत करण्यात आले.

५.१) विधी महाविद्यालयामध्ये मराठीचे वर्ग : मुंबई विद्यापीठाच्या विधी शाखेचे जे विद्यार्थी एल.एल.बीच्या परीक्षे मध्ये मराठीतून उत्तर पत्रिका लिहिणार आहेत. अशा विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग योजनेचा उद्घाटन समारंभ न्यू लॉ. कॉलेज माटुंगा, मुंबई येथे दिनांक १९ फेब्रुवारी २००६ रोजी संपन्न झाला. अध्यक्ष स्थानी मा. न्या. श्री चंद्रशेकर धर्माधिकारी हे होते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु श्री विजय खोले हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. १०० पेक्षा जास्त मराठी विद्यार्थी समारंभाला उपस्थित होते.

शनिवार व रविवार या दिवशी न्यू फर्स्ट एल.एल.बी. विद्यार्थ्यांसाठी लॉ महाविद्यालयामध्ये सकाळचे वर्ग भरविण्यात आले.

५.२) मराठी परिषद : मुबई विद्यापीठ व मराठी भाषा विकास व संरक्षण समीती यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ व २६ मार्च २००६ रोजी परिषदेमध्ये फोरमच्या सदस्यांनी सक्रीय भाग घेतला.

५.३) मराठी चर्चा सत्र : फोरम दिनांक १५ जून २००६ रोजी न्यायालयात मराठीचा वापर या विषयावर एका चर्चा सत्राचे आयोजन केले होते. हे चर्चा सत्र, चव्हाण केंद्राच्या सभागृहामध्ये झाले अध्यक्ष श्री न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी होते. प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री शरद काळे हे सुद्धा उपस्थित होते चाळीस पेक्षा जास्त प्रतिनिधी उपस्थित होते.

५.४) संपादक मंडळाची बैठक : १९९५ मध्ये 'न्यायालयात मराठीचा वापर' या विषयावर प्रथम एक चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी सर्व वक्त्यांनी आपले निंबंध सादर केले होते. आता त्या सर्व निबंधाचे संकलन करुन पुस्तकाच्या स्वरुपात प्रकाशित करण्याचा निर्णय प्रतिष्ठानने घेतला आहे. त्या साठी एक संपादक समितीची स्थापना करण्यात आली आहे. त्या समीतीची प्रथम बैठक दिनांक ३० सप्टेंबर २००६ रोजी चव्हाण केंद्रामध्ये झाली. श्री शरद काळे अध्यक्ष स्थानी होते.

सर्व विभागाची बैठकः दिनांक २८ जुलै २००६ रोजी दुपारी ३ वाजता चव्हाण केंद्रामध्ये श्री गुप्तन यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागांची बैठक झाली.

१) प्रतिनिधी बैठक : दिनांक ११ सप्टेंबर २००६ रोजी सायंकाळी ३ वाजता विरंगुळा केंद्र मुलुंड (पूर्व) येथे फेस्कॉमचे अध्यक्ष श्री मधुकर कुलकर्णी यांच्या अध्यक्षस्थाने, खाली ६० ज्येष्ठ नागरिक संघाच्या प्रतिनिधींची बैठक झाली बैठकीला ६० पेक्षा जास्त प्रतिनिधी उपस्थित होते.

६ मूल्य मापन राज्यात मोफत कायदे विषयक सहाय्य व सल्ला योजनेचे कायदे मूल्य मापन करण्यासाठी संसदीय समीती आली होती. दिनांक ६ फेब्रुवारी २००६ रोजी दुपारी १२ वाजता ताज महाल होटेलमध्ये या समीतीची बैठक झाली. सभेला फोरमचे पदाधिकारी उपस्थित राहून फोरमच्या कामाची माहिती दिली, कामाचा व्याप व स्वरूप पाहुन समितीने समाधान व्यक्त केले.

८) विधी संशोधन या सदरा खाली सहाय्य खालील काम चालू आहे.

१) महाराष्ट्र हुंडा बंदी नियमाची छाननी.

२) फोरम नियमाची छाननी.




यवतमाळ येथून आलेल्या १० वी पास मुलींचा सत्कार - विजया चौहान, शरद काळे साहेब, सुप्रिया सुळे ताई व यवतमाळ येथे काम करणारी कार्यकर्ती
( चव्हाण सेंटर, मुंबई )




कोकण विभागीय केंद्रातर्फे आयोजित महिलांचे कार्यक्रमात सौ. युगंधरा राजेशिर्के दिपप्रज्वलन करताना सोबत सौ. प्राची शिंदे, सौ. स्मितल पावसकर, नंदा शेलार व सईदा बाग.
( रत्नागिरी )



आरोग्य शिबीर - धसई, ता. मुरबाड जि. ठाणे दि. १६प्रिल २००६.

नवमहाराष्ट्र युवा अभियान, पिनॅकल क्लब ( मुंबई ) व माविम ( ठाणे) यांच्या संयुक्त विद्यमाने.

कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज वाशी येथे कायदेविषयक कार्यशाळेत प्रमोद ढोकळे, डॉ.अजित मृगदूम, एम्. बी. पवार, श्रीमती स्मिता कर्वे, श्री. पाटील व श्रीमती वृषाली मगदूम.






घाटकोपर ( मुंबई ) येथे महिलांसाठी आयोजिण्यात आलेल्या विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये न्यु लॉ कॉलेजचे प्राचार्य नारायण राजाध्यक्ष बोलत आहेत.

**वेणूताई चव्हाण जयंती-२ फेब्रूवारी**

उपस्थितांत अरूणा इसनगर, आशा दंडवते, प्रकाश बुद्धीसागर, वासंती शेवाळे, श्री राजाभाऊ मयेकर ( चव्हाण सेंटर, मुंबई )



**विविध स्पर्धांचे प्रमाणपत्र वितरण :**

ति. विठामाता स्मृतिदिन दि. १८.०८.२००६ - श्री मोहनराव डकरे, सौ. शोभना रैनाक, श्री. व्ही. बी. पाटील.

( कराड )






स्व.वेणूताई चव्हाण ८६ वी जयंती - प्रा. विजया पाटील - ' यशवंतरावांची वेणूताई ' हा एकपात्री प्रयोग सादर करतांना.

(कराड)

स्वातंत्र्यदिना निमित्त मध्यरात्री अभिवादन मशाल फेरी , नाशिक : श्री. विलास लोणारी व मान्यवर तसेच संघटक दिपा मानकर व अनिता पगारे.





म. गांधीसेवा संघ आणि नवमहाराष्ट्र युवा अभियान संचलित पद्मभुषण बाळासाहेब भारदे अकॅडमीचे उद्घाटन करतांना खा. सुप्रिया सुळे, सोबत डावीकडून विजय कान्हेकर, विश्वास ठाकूर, बापुसाहेब काळदाते, मधुकर अण्णा मुळे, शशिकांत देशपांडे.
(औरंगाबाद)




नवमहाराष्ट्र युवा अभियान, अपंग हक्क विकास मंच विभागीय केंद्र औरंगाबाद तर्फे आयोजित अपंगांकरिता मोफत अनुशेष भरती मार्गदर्शन मेळाव्यात मार्गदर्शन करतांना समन्वयक विजय कान्हेकर डावीकडून बसलेले विभागीय संघटक अरूण रसाळ, श. द. बोंडे, सचिन मुळे, सुहास तेंडुलकर, व सहसंघटक निलेश राऊत.
(औरंगाबाद)



कोकणात महिलांसाठी प्रबोधन मेळावे
दि. २४.८.२००६ रोजी महिलांची कार्यक्रमाला उपस्थिती.
(रत्नागिरी)

# रंगस्वर कार्यवृत्त

**१४ मार्च :** भीमसेन जोशी अध्यासन ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ सहकार्याने पवन नाईक यांचे गायन आयोजित केले होते.

**२३ मार्च ते ३० मार्च :** मुंबई अकॅडमी ऑफ मुव्हींग इमेज, प्रभात चित्र मंडळ, संयुक्त विद्यमाने 'चित्रपट महोत्सव' पार पडला. याला चित्रपट रसिकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.

**११ एप्रिल :** भीमसेन जोशी अध्यासन ललित कला केंद्र, पुणे विद्यापीठ सौ. अंजली दाते यांची शास्त्रीय गायन आयोजित करण्यात आले होते.

**१५ एप्रिल :** रंगस्वरच्या वतीने कै. सुरेश भट यांच्या जन्मदिना निमित्ताने मराठी गझल मुशायरा आयोजित करण्यात आला. त्यामध्ये सदानंद डबीर, दिलीप पांढरपट्टे, मनोहर रणपिसे, डी. एन. गांगण, दत्ता सतवडेकर, अभिमन्यू अळतेकर, सुनिल तांबे यांचा सहभाग होता.

**१७ एप्रिल :** प्रभात चित्र मंडळाच्या सहयोगाने लाइफलेस पेपर हा इराणी चित्रपट दाखविण्यात आला.

**१८ एप्रिल :** रंगस्वरच्या वतीने अर्चना कान्हेरे यांचे शास्त्रीय गायन आयोजित करण्यात आले होते.

**२४ एप्रिल २००६ :** प्रभात चित्र मंडळाच्या सहयोगाने 'द सायलेन्स' (इंगमार बर्गमन स्वीडन) दिग्दर्शित चित्रपट दाखविण्यात आला.

**२५ एप्रिल :** रंगस्वरच्या वतीने वीणा वायकुळ यांचे शास्त्रीय गायन आयोजित करण्यात आले होते.

**४ मे :** प्रभात चित्र मंडळाच्या सहकार्याने रेनन् ॲलेक्झन्ड्रोविक दिग्दर्शित इस्त्रायल चित्रपट दाखविण्यात आला (जेम्स जर्नी टू जेरूसलेम)

**१० मे :** साईसाक्षी प्रकाशित अनामिका निर्मित 'माकडाच्या हाती शॅम्पेन' लेखक डॉ. विवेक बेळे, दिग्दर्शक गिरीश जोशी या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

**१६ मे :** साईसाक्षी प्रकाशित अनामिक निर्मित 'फायनल ड्राफ्ट' (लेखक / दिग्दर्शक गिरीश जोशी) या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

**१७ मे :** भीमसेन जोशी अध्यासन ललित कला केंद्र पुणे विद्यापीठ सहकार्याने ह्रषिकेश गांगुर्डे यांचे शास्त्रीय गायन आयोजित करण्यात आले होते.

**१८ मे :** ललित मुंबई निर्मित 'अलविदा' (लेखक मनस्वीनी लता रविंद्र, दिग्दर्शक सतीश मनवर) या नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

**१९ मे ते २० मे :** पंचम निषाद सहकार्याने आरोही हिंदुस्थानी संगीत महोत्सव संपन्न झाला.

**२२ मे :** रंगस्वरच्या वतीने जॅन कडार व इल्मार क्लीस झेक दिग्दर्शित द शॉप ऑन द मेन स्ट्रीट चित्रपट दाखविण्यात आला.

**६ जुलै :** रंगस्वरच्या वतीने आषाढी एकादशीच्या पूर्वसंध्येला अभंग भक्तिगीतांचा सुंदर ते ध्यान कार्यक्रम संपन्न झाला कार्यक्रमाची संकल्पना / संयोजन / निरूपण रेखा नार्वेकर यांनी केले.

**१२ जुलै :** ललित थिएटर्स सहकार्याने 'सिगारेट्स' (लेखक मनस्विनी लता रविंद्र, दिग्दर्शक सतीश मनवार) नाटकाचा प्रयोग संपन्न झाला.

**१३ जुलै :** प्रभात चित्र मंडळाच्या सहकार्याने मान्यवर दिग्दर्शकांचे लघुपट दाखविण्यात आले.

**१७ जुलै :** प्रभात चित्र मंडळाच्या सहकार्याने संस्कार दिग्दर्शक : पट्टीभिराम रेड्डी हा कन्नड चित्रपट दाखविण्यात आला.

**१८ जुलै :** भीमसेन जोशी अध्यासन, ललित केंद्र पुणे विद्यापीठ सौ. मृणाल नाटेकर-भिडे यांचे गायन आयोजित करण्यात आले होते.

**२९ जुलै :** ललित थिएटर मुंबई निर्मित 'बार बार' (लेखक / दिग्दर्शक : सतीश मनवार) या नाटकांचा प्रयोग संपन्न झाला.

**९ ऑगस्ट :** भीमसेन जोशी अध्यासन, ललित कला केंद्र पुणे विद्यापीठ विश्वजीत बोरवणकर यांचे शास्त्रीय गायन आयोजित करण्यात आले होते.

**१० ऑगस्ट :** प्रभात चित्र मंडळाच्या सहकार्याने 'ट्रेन टू पाकिस्तान' (दिग्द-पामेला रूक्स) हा हिन्दी चित्रपट दाखविण्यात आला.

**१७ ऑगस्ट :** प्रभात चित्र मंडळाच्या सहकार्याने सत्यजित राय दिग्दर्शक गणशत्रू हा बंगाली चित्रपट दाखविण्यात आला.

**२३ ऑगस्ट :** सोसायटी ऑफ इंडियन रेकॉर्ड कलेक्टर्स सहयोगाने पावसाची गाणी हा कार्यक्रम सादर करण्यात आला.

**२४ ऑगस्ट :** रंगस्वरच्या वतीने राधिका पेंडसे यांचे कथ्थक नृत्य आयोजित करण्यात आले होते.

**४ सप्टेंबर :** रंगस्वरच्या वतीने गणेशोत्सवा निमित्त गणराज रंगी नाचतो हा अभंग भक्तिगीतांचा श्रवणीय कार्यक्रम करण्यात आला.

**१२ सप्टेंबर :** प्रभात चित्र मंडळाच्या सहकार्याने मार्को पोन्टी दिग्दर्शित 'सॅन्टा मॅरेडोना' हा इटालियन चित्रपट दाखविण्यात आला.

**१३ सप्टेंबर :** ओमकार इंटरटेनमेंटच्या सहकार्याने संजय सूरकर दिग्दर्शित मराठी चित्रपट 'आई शप्पथ' दाखविण्यात आला.

**२२ सप्टेंबर :** इनरं कोर्ट यार्ड सहकार्याने पंडित रतन मोहन शर्मा यांचे गायन आयोजित करण्यात आले होते.

**२५ सप्टेंबर :** रंगस्वर आय एन टी आयोजित कै. प्रविण जोशी आंतर महाविद्यालयीन मराठी एकांकीका स्पर्धा २००६ संपन्न झाली.

**२६ सप्टेंबर :** भीमसेन जोशी अध्यासन ललित कला केंद्र पुणे विद्यापीठ सहकार्याने श्रीमती शीला जोशी यांचे गायन आयोजित करण्यात आले होते.

**२७ सप्टेंबर :** प्रभात चित्र मंडळाच्या सहकार्याने अ सॅन्ट्री बिना दिग्दर्शक माय ब्रदर इन लॉ हा इटालियन चित्रपट दाखविण्यात आला.

**२९ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर :** रुद्रवीणा तपस्वी उस्ताद झीया मोहिउद्दीन डागर, यांच्या स्मरणार्थ 'धृपद महोत्सव' संपन्न झाला.

xxxxx xxxxx xxxxx xxxxx

## सृजन कार्यवृत्त

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या रंगस्वर या विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांच्य विकासाकरता सृजन हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सृजनच्या माध्यमातुन समाजातील मान्यवर व्यक्तींच्या सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवुन त्यांच्यामधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे.

सृजनची संकल्पना आणि संयोजन मा. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सन्माननीय सल्लागार म्हणुन सुप्रसिद्ध चित्रकार डगल्स जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग हे काम पहातात. दर महीन्याच्या पहिल्या रविवारी सृजन कार्यशाळा सकाळी ९.०० वाजता चव्हाण सेंटर मध्ये आयोजित करण्यात येते श्री विद्याधर खंडे त्यांना सहाय्य करतात.

जून २००६ रोजी श्री शुभानंद जोग (जे.जे. कला महाविद्यालय) यांनी मुलांना भेटकार्ड या संदर्भात मुलांची कार्यशाळा घेतली या कार्यशाळेमध्ये वेगवेगळ्या वस्तुंच्या सहाय्याने भेटकार्ड कशी बनवायची हे शिकविण्यात आले.

जुलै २००६ - मा डॉ. कामक्षी माटे, असोसिएट प्रो. के. ई. एम. हॉस्पीटल यांनी मुलांकरता शारिरीक आणि आरोग्य शिक्षण या विषयावर कार्यशाळा घेतली या कार्यशाळेमध्ये मुलांना होणारे पावसाळ्यातील विविध आजार व मुलांच्या वाढीच्या समस्या या विषयावर चर्चात्मक माहिती दिली त्याचबरोबर पोस्टाच्या सहकार्याने भिंतीपत्रके यांच्या सहकार्याने आपला विषय सोप्या पद्धतीने समजावून सांगितला.

ऑगस्ट २००६ - श्री अरुण नाईक यांनी 'अस्तित्व' या संस्थेमार्फत मुलांच्या मानसिक आरोग्यावर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेमध्ये मानसिक ताण-तणाव पालक, शिक्षक, विद्यार्थी व मुले यांच्या परस्पर नाते संबंधात छोटया-छोटया गोष्टींद्वारे मुलांना माहिती दिली. परिक्षेच्या दृष्टीकोनातून सोप्या व कठीण विषयांचा अभ्यास कसा करावा हे समजावून सांगितले.

सप्टेंबर २००६ - कार्टुनिस्ट विवेक प्रभु केळुस्कर यांनी विविध प्राण्यांच्या, पक्ष्यांच्या व मानवांच्या भावमुद्रांचे व्यंगात्मक चित्रण करून मुलांना ते कसे करता येईल ते कसे ओळखायचे याचे मार्गदर्शन केले. मुलांनी या कार्यशाळेमध्ये मानवी चेहऱ्यावरचे विविध भावांचे निरिक्षण करून चित्र रेखाटण्याची माहिती समजावून घेतली.

# यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय मुंबई

यशवंतराव चव्हाण ग्रथालयाच्या उदिष्टाप्रमाणे, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शेती, सहकार, महाराष्ट्राची संस्कृती व इतिहास कायदा, विश्वकोष, महत्वाच्या व्यक्तींची चरीत्रे, आत्मचरीत्रे, इ. विषयांवरील पुस्तके ग्रंथालयांनी घेतली आहे. प्रतिष्ठानचे सुरु केलेल्या उपक्रमांना पुरक असे हे विषय आहेत.

एप्रिल २००६ ते आक्टोबर २००६ या कालावधीत खालील महत्वाची पुस्तके ग्रंथालयात घेतली.

१) तमाशा : एक रांगडी गंमत - भंडारे - सं. ज्ञा.

२) वॉर्ड नं. ५ के. ई. एम. डॉ. रवि बापट

३) यशवंतरावांचे उत्तराधिकारी - गोपाळ वेजारे

४) मुक वेदना काळोख्यातील भारताची - भार्गवे वृ.

५) हिटलर - वि. स. वाळिंबे

६) जागतिकीकरण, उदारीकरण आणि अर्थकारण -डॉ. दुभावी

७) भारताचे परराष्ट्र धोरण :-

८) भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म : डॉ. आंबेडकर

९) आपत्ती : व्यवस्थापन मार्गदर्शन पुस्तिका

१०) Collapse - Diamond, J

११) Our Parliament : An Introduction to the Parliament of India - Ka shyap, S.C.

१२) The End of poverty - Sacns - J.D.

१३) Ayodhya - 6 December 1992 - P.V. Narasim

१४) Emerging India - Security & foreign policy Perspective - sisodia - N.S.

१५) Scared - In Gujrat -- Bunsha, D.

१६) Maharashtra Local Act C Rub - Gupte A. K.

१७) The lost Hero - A Biography of Subhan Bose.

१८) IRAN - Awakaning - Ebadi, S

१९) In the line of Fire - Munshart p

२०) The last (Mughal) Dalrymple, w

# Yashwantrao Chavan Pratishthan's Academy of Information Technology

*(February 2006 to October 2006)*

**Diploma in Advanced Computing (DAC)**

1. Stage II & III of the CET for DAC August 2006 Course was conducted from 10th July to 14th July 2006 and 17th July to 21 July 2006, 87 students are admitted for DAC August 2006 Batch. The batch commenced on 14th August 2006 and will conclude on 4th February 2006.

2. DAC AUG 06 Students appeared for their Centralised Mid-Course Examination of C-DAC at M.E.T. Institute on 28.29 Oct.2006. The results are awaited.

3. The DAC February 2006 Course was concluded on 31st January 2005. A farewell was organized for the students. The 1st YCP Cash Prize of Rs.2,000/- was awarded to Mr. Sumit Rusia, 2nd YCP Cash Prize of Rs.1,500/- was awarded to Mr. Manish Kumar Chauthani and 3rd YCP CashPrize of Rs. 1,000/- was awarded to Mr. Dhanya Nair. An effort was made for local placements wherein 95% of students are placed.

**Diploma in Information Technology (DIT)**

4. Ten DIT Batches were conducted and 125 no. of students were trained since March 2006. The current batch will go on till January 2007.

5. Admissions are open for next DIT Batch, which will be commencing from first week of December,2006.

**Diploma in Multimedia Creations (DMC)**

6) Three batches of DMC are conducted since March 2006. Admissions for Diploma in Multimedia Creations are continuing.

7) The next batch for the same is likely to be commencing from 4th December 2006.

**Diploma in Advanced Computer Arts (DACA)**

8) DACA Aug 06 batch is running smoothly. It will conclude by January 2007.

9) Our students attended the function of World Animation Day on 28th October 06 at N.C.P.A. Theatre, Mumbai. The Session was mostly based on 2D and 3D Animation.

10. CET Test for DACA, new batch conducted on 18th November 2006. Business Communication and Personality Development sessions are being conducted for 15 hours. Professional visits will be arranged for knowledge development and practical skills.

**New Course Launched by YCP's AIT**

11) We have conducted our own course as 'Certificate Course in Programming using 'C' (CCPC) launched by YCP's AIT for students who are interested to give CET for DAC Course.

**Corporate Training**

12) Computer Training Programme was suggested for Navy Dependents, Conducted Y|CP's new course for their 15 candidates named 'Certificate Course in Computer Operation' (CCCO)

13) AIT had offered Customised Training Programme to Prasar Bharti Dept. of All India Radio (AIR) which was duly accepted. Successfully conducted this training for Prasar Bharti employees (50) in the period of August to September.

14) Corporate Training is being conducted for Food Corporation of India since Aug 06. It will be continued till April 2007 approximately. Till date we have trained 125 employees of FCI, Mumbai.

15) The computer training for DGQA Unit of Army at Vikhroli is started since 14th November 2006. The course will last till next three months.

16) Centra; Railway tender had been bid by YCP's AIT and achieved the same.

17) Naval Dockyard has offered computer training requirement to YCP's AIT which will be commencing soon.

**ARMY & NAVY Batches :**

18) We have also successfully completed 1 Batch of Certificate Course in Database Administration (CCDA) for 15 students (MoUBatch).

# कृषि व सहकार व्यासपीठ आणि पुणे विभाग कार्यवृत्त

**१. कृषी व सहकार व्यासपीठ :**

कृषी व सहकार व्यासपीठाचे काम विश्वस्त व निमंत्रक श्री ज्ञानेश्वर बापू खैरे आणि माजी महापौर श्री अंकुश काकडे संयोजक म्हणून पाहतात. पुणे कार्यालयातून हे काम चालते. त्याला पद्मविभूषण मा. मोहन धारीया यांचे मार्गदर्शन मिळते. या कामकाजात श्री. भिडे आणि पंडित यांचा सहभाग असतो.

**अ) कृषी विभाग :**

१) कृषी सहकार व्यासपीठाच्या अभ्यास गटाच्या अनेक सभा घेण्यात आल्या. त्यात तसेच राष्ट्रीय विकास कॉन्सिलमधील पुढील कृषी विषयक नियोजनाबद्दलच्या मुद्यांवर आधारकर संशोधन संस्थेत दि. ३ फेब्रुवारी २००६ रोजी चर्चा घेण्यात आली व त्यावर टिपण तयार करुन केंद्र व राज्य शासनास सादर केले आहे. या चर्चांना अन्य तज्ञां बरोबर श्री भिडे व प्रा. पंडित यांनी सहभाग घेतला. त्यामुळे प्रत्येकी ९ मुद्दे व २२ उप मुद्दे यावर उपसमित्या स्थापन करुन सर्वकष टिपण तयार करता आले व शासनास प्रतिष्ठान तर्फे मा. बापूसाहेब खैरे यांनी सादर केले.

**आ) सहकार :**

१) **व्यासपीठाचे अभ्यास मंडळ :-**

व्यासपीठा तर्फे तज्ञांचे अभ्यासमंडळ दरमहा व मधून मधून आवश्यकतेनुसार भरविण्यात येते. अहवाल काळात त्यात अनेक प्रश्नांचा उहापोह करण्यात आला. या मंडळाचे कामकाज मा. श्री बापूसाहेब खैरे यांचे अध्यक्षतेखाली चालते. त्यात श्री भिडे व श्री पंडित यांचे बरोबर श्री. कोरान्ने, डॉ. कामत, प्रा. नाडकर्णी, डॉ. घाणेकर, कै. जोगळेकर तसेच अन्य तज्ञांनी वेळोवेळी सहभाग घेऊन आपले विचार व्यक्त केले आहेत. तसच सदर चर्चा सत्रात व्यक्त झालेली संकलित मते पत्र द्वारा केंद्र शासनास मा. धारिया यांचे स्वाक्षरीने व राज्य शासनास मा. बापूसाहेब खैरे यांचे सहीने सादर करणेत येतात. तसेच श्री भिडे व प्रा. पंडित सदर पत्राच्या प्रती मा. सहकार आयुक्तांना समक्ष सादर करून पाठपुरावा केला जातो. सदर कार्य या कालावधीत प्रसंगानुसार चालू राहिले. नव नियुक्त सहकार आयुक्त मा. श्री अनिल दिग्गीकर व त्या त्या आधीचे मा. श्री शर्मा यांनी या कालावधीत वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन केले.

२) **शेती कर्ज पुरवठा :-**

सहकारी बँकां संबंधी जो वैद्यनाथन समिती अहवाल शासनाने स्विकारला आहे. त्यावर व्यासपीठाचे वतीने दोन बैठकात चर्चा करणेत आली आहे. सदर चर्चेत डॉ. दुभाषी, प्रा. नीलकंठ रथ, श्री कोरान्ने, डॉ.कामत, प्रा. नाडकर्णी, श्री पुजारी तसेच श्री. भिडे व प्रा. पंडित यांनी सहभाग घेतला. त्यांत सहकारी पतपुरवठयाचा दिर्घ मुदतीसह एकत्र विचार करावा व समितीने नमूद केल्याप्रमाणे वर्षा तसेच अन्य नैसर्गिक अपत्तीचे धोके यापासून शेतकऱ्याचे संरक्षण केलेच पाहिजे. त्यासाठी राज्यातील सर्व पिकांचेसाठी सर्वकष विमा योजना चालू ठेवावी. तसेच प्रा. रथ यांच्या टिपणीतील मुद्देही लक्षात घ्यावेत असे ठरविण्यात आले. त्यानुसार मा. मोहन धारीया यांच्या स्वाक्षरीने मा. शरद पवार कृषी मंत्री केद्रशासन यांना अहवाल सादर केला.

३) महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० या मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे अपिल क्र. १५५१ / २००० चे निकालामुळे उद्‌भवलेल्या समस्येवर मात करण्यासाठी सुचविलेल्या दुरुस्ती बाबतचा पाठ पुरावा चालू आहे. या बाबत मा. धारिया यांचे सहीने मा. विलासराव देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांना दि. १७.७.२००६ रोजी खुलाशाचे सविस्तर पत्र पाठविले असून त्याचा पाठपुरावा करण्यांत येत आहे.

४) **सहकार आयोग :-**

मा. धारिया साहेब यांनी केंद्रिय कृषी व सहकार मंत्री महोदयांना सहकार शताब्दी संबंधात एक सहकार आयोग नेमून या संबंधाने सहकारी चळवळीच्या १०० वर्षांचा आढावा घेवून पुढील कामकाजाची दिशा ठरवावी असे सुचविले होते. त्याबाबत पाठपुरावा करण्यात आला आहे. या संबंधी मा. आनंदराव पाटील, कार्याध्यक्ष - भारती विद्यापीठ यांचेसह श्री भिडे व प्रा. पंडित यांनी मा. सहकारमंत्री यांचेशी व श्री ओऊळकर, सहनिबंधक व वैयक्तिक सहाय्यक यांचेशी चर्चा केली असता

त्यांनी सहकार महाशताब्दी कार्यक्रम हाती घेण्यात येईल असे सांगितले. त्याप्रमाणे तो घेण्यात आला आहे. त्याच्या सांगली येथील कार्यक्रमात प्रा. पंडित यांनी नागरी बँका व पतसंस्था आणि सहकारी अधिनिय या विषयावर व्याख्यान दिले. सहकारी चळवळीचा १०० वर्षाचा आढावा घेऊन पुढील वाटचालीचे दृष्टीने केंद्र शासनाने सहकार विषयक जी उच्चाधिकार समिती नियुक्त केली आहे. तिचे अध्यक्ष मा. शिवाजीराव पाटील यांचेशी मा. श्री बापू साहेब खैरे यांनी सातत्याने संपर्क ठेवला आहे.

५) राज्य सहकारी संघाशी संपर्क व समन्वय साधण्याचा प्रयत्न चालू असतो. संघाचे अध्यक्ष श्री शिंदे व अन्य पदाधिकारी यांचेशी संयुक्त कार्यक्रमाबाबत सातत्याने चर्चा केली. संघाने आपले सभासद प्रशिक्षण वर्ग व अन्य शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमात माहिती अधिकार अधिनियम २००५ याचा समावेश करणे बाबत जे आग्रहाने प्रतिपादन केले होते. त्या प्रतिसाद संघाकडून मिळाला आहे. के धनंजयराव गाडगीळ स्मृति कार्यक्रमास श्री भिडे, प्रा. पंडित उपस्थित राहिले.

६) केंद्र शासनाने नेमलेल्या उच्चाधिकार समितीने पाठवलेल्या प्रश्नावली संबंधी (२६ मुद्दे) प्रतिष्ठानच्या व्यासपीठाने तज्ञांच्या दोन बैठका घेऊन त्यांचे मुद्दे संकलित करून त्यावर मा. मोहन धारिया यांचेशी चर्चा केली. श्री भिडे यांनी त्याबाबत अहवाल तयार केला. सदर अहवाल मा. बापूसाहेब खैरे यांची स्वाक्षरीने मा. शिवाजीराव पाटील अध्यक्ष उच्चाधिकार समिती यांना सादर केला आहे.

७) 'माहितीचा अधिकार' ही श्री. भिडे लिखित पुस्तिका मा. कै. यशवंतराव चव्हाण जयंतीचे दिवशी प्रतिष्ठानचे कार्यक्रमात 'विशाल सह्याद्री' चे वतीने प्रकाशित झाली. पुस्तिकांचे वितरण व संबंधितांना मार्गदर्शन सातत्याने चालू आहे.

सदर पुस्तिकेस मा. अण्णा हजारे यांची प्रस्तावना आहे.

८) मा. श्री बापूसाहेब खैरे यांचे पुढाकाराने 'यशदा' संस्थेशी सामंजस्य करार करणेत आला असून त्यांचे वतिने तसेच प्रतिष्ठान व 'विशाल सह्याद्री' च्या संयुक्त विद्यमाने सदर कालावधीत कार्यशाळा घेणेत आल्या. त्यात सर्वश्री भिडे मा. पंडित तसेच विशाल सह्याद्रीचे वतीने प्राचार्य सिन्नरकर यांनी सहभाग घेतला.

९) पुणे मराठी ग्रंथालय 'संस्थेच्या वतीने' माहिती अधिकार यावर परिसंवाद घेणेत आला.तेथे पुस्तिकेच्या २०० प्रति प्रा. पंडित यांनी उपस्थितांना वितरित केल्या. त्याबद्दल संयोजकांची प्रतिष्ठानचे आभार मानून प्रतिनिधिक सत्कार केला. कार्यक्रमास श्री. भिडे व प्रा. पंडित व प्राचार्य सिन्नरकर उपस्थित होते.

१०) मा. ना. शरदराव पवार यांनी केंद्र शासनामध्ये कृषी खात्याचा कार्यभार संभाळल्यानंतर वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्था पुणे येथे भेट दिली होती. त्यावेळी त्यांनी सदर संस्थेचे संचालक पद महिनोमहिने भरले नसल्याचे समजल्यावरून सदर पद तातडीने भरले जाईल असे आश्वासन दिले होते. त्यानंतर वर्ष होऊन गेले तरी सदर पद भरले नसल्यामुळे माहितीच्या आधिकाराखाली मा. श्री बापूसाहेब खैरे यांनी त्याबाबत कृषी व सहकार व्यासपीठामध्ये चर्चाही योजली व सदर बाबतीत अर्ज केला नंतर आलेल्या उत्तरानुसार केंद्रशासनाकडे पत्र व्यवहार केला आहे. त्यामुळे या विषयास चालना मिळाली आहे.

११) प्रतिष्ठानचे वतीने 'माहितीचा अधिकार' या विषयावरील या कालावधीत दोन सभांचे आयोजन करण्यात आले. (दि. १२.४.०६ वे २४.६.०६) या वेळी मा. बापूसाहेब खैरे यांनी मार्गदर्शन केले. श्री भिडे, प्रा. पंडित व विशाल सह्याद्रीचे श्री सिन्नरकर यांनी उपस्थित राहून विषय मांडणी केली.

१२) पुणे जिल्हा न्यायालयात मा. मुख्य न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय यांचे 'माहिती अधिकार' या विषयावर व्याख्यान झाले. त्या कार्यक्रमास श्री. भिडे व प्रा. पंडित व प्राचार्य सिन्नरकर उपस्थित होते. मा. श्री बापूसाहेब खैरे यांचे सौजन्याने 'विशाल सह्याद्रि' चे वतीने तयार केलेली पुस्तिका मा. मुख्य न्यायाधीश, मा. जिल्हा न्यायाधीश, तसेच सर्व विधिज्ञांना वितरित करणेत आली.

१३) पुणे जिल्ह्यातील प्राथमिक कृषि संस्थेच्या तालुका सचिवांची एक बैठक दि. २७ एप्रिल २००६ रोजी मा. श्री बापूसाहेब खैरे यांच्या सूचनेनुसार घेण्यात आली. त्यात 'महिला

अधिकार' तसेच सचिवांचे कामकाज आणि वैद्यनाथ समितीच्या संदर्भात सचिवांचे भवितव्य या विषयावर श्री भिडे व प्रा. पंडित यांनी सविस्तर उहापोह केला व संघटनेचे प्रमुख श्री लोणकर यांच्याशी या संदर्भात ३-४ वेळा चर्चा केली.

१४) 'यशदा' चे माहिती अधिकार विभाग प्रमुख व डेप्युटी डायरेक्टर जनरल यांनी विनंती केल्या प्रमाणे पंजाब मधील माहिती अधिकाराबाबत तेथील सहकारी शिखर संस्थांच्या संघ संस्थेने त्यांच्या सुमारे २५० कार्यकर्ते अधिकाऱ्यांच्या प्रबोधनासाठी जो प्रशिक्षण कार्यक्रम हाती घ्यावयाचा आहे. त्यात वितरक करण्यासाठी जी घडी पत्रिका (फोल्डर) तयार करावयाची आहे. त्यासाठी सुमारे दहा पृष्ठांचे टिपण देण्याची विनंति श्री भिडे यांना (प्रतिष्ठान व विशाल सह्यांद्रि साठी) केली. त्यानुसार मा. श्री बापू साहेब खैरे यांचेशी चर्चा करून श्री. भिडे व प्रा. पंडित यांनी वैकुंठ मेहता संस्थेचे प्रा. एलुमलाई यांचेशी चर्चा केली. व इंडियन सोसायटी फॉर स्टडीज इन् को ऑपरेश या संस्थेची परवानापत्रिका (कार्ड) मिळवून पंजाब सहकारी अधिनियमाचे पुस्तक मिळवले व सदर माहितीचे टिपण श्री भिडे यांनी तयार केले.

१५) धुळे येथे 'यशदा' च्या वतीने झालेल्या शासकीय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण वर्गात प्राचार्य सिन्नरकर यांनी ६ व्याख्याने दिली.

१६) सहकारी प्रबंध संस्था, पुणे येथे 'माहिती अधिकार' यावर प्रशिक्षण वर्गात श्री सिन्नरकर यांनी व्याख्याने दिली.

१७) विद्यापीठाचे समाजशास्त्र केंद्रात दि. २५.९.२००६ रोजी शर्वरी भिडे, जोगळेकर, पंडित व सिन्नरकर यांनी 'माहिती अधिकार' या चर्चासत्रांत व्याख्याने दिली.

**अन्य कार्यक्रम :**

१) मा. काळे साहेब यांचे सूचनांनुसार 'सेंटर फॉर ॲड्व्हान्सड् स्ट्रॅटेजीज' या संस्थेच्या वतीने मराठा चेंबर मध्ये 'प्रोबिटी इन् पब्लिक लाईफ' या विषयावर व्याख्यान कार्यक्रमास श्री भिडे व प्रा. पंडित उपस्थित राहिले. मा. न्या. पी. बी. सावंत अध्यक्षस्थानी होते.

२) प्रतिष्ठान व त्रिशक्ति फाऊंडेशन यांचे वतीने दि. ५ फेब्रुवारी २००६ रोजी या वर्षीचा 'मिस इंडिया' किताब मिळवणाऱ्या अमृता थापर यांचा सत्कार श्रीमती सुनेत्रा पवार यांच्या हस्ते करण्यात आला. कुमारी थापर यांनी आपल्याला 'पुणेरी सैनिकाची मुलगी असल्याचा अभिमान आहे' असा कृतज्ञता भाव व्यक्त केला. कार्यक्रमास मा. बापूसाहेब खैरे, फाऊंडेशनचे कर्नल संभाजी पाटील, माजी महापौर द्वय सर्वश्री अंकुश काकडे व शांतीलाल सुरतवाला व्यास पीठावर उपस्थित होते.

३) दि. १२ मार्च २००६ रोजी कै. यशवंतराव चव्हाण यांचे ९३ व्या जयंती निमित्त परिसंवाद आयोजित करणेत आला. त्यावेळी माजी खासदार श्री अनंतराव पाटील यांनी लिहिलेल्या 'गुरूकृपा' या पुस्तकाचे प्रकाशन श्री बाळ गाडगीळ यांचे हस्ते करणेत आले.

४) स्वरराज छोटा गंधर्व यांच्या जयंती निमित्त दि.१३ मार्च २००६ रोजी प्रतिष्ठानच्या पुणे केंद्राचे वतीने संगीत सभा व पुरस्कार सन्मानाचा कार्यक्रम आयोजित करणेत आला. डॉ. श्री. श्रीराम लागू यांचे हस्ते श्रीमती शांताबाई मोडक यांचे अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे पुरस्कार देणेत आले. स्व. छोटा गंधर्व पुरस्कार - श्रीमती कीर्ती शिलेदार नवोदित कलाकारांसाठी कै. नरूभाऊ लिमये पुरस्कार - श्री. पुष्कर लेले कै. डॉ.वसंतराव देशपांडे पुरस्कार - श्री चंद्रशेखर देशपांडे

५) 'विशाल सह्याद्रि' आवारात कै. यशवंतराव चव्हाण पुतळ्याचे अनावरणाचा कार्यक्रम झाला. उद्घाटक श्री भिलारे, गुरूजी, अध्यक्ष मा. बापूसाहेब खैरे सूत्र संचालक प्रा. पंडित, प्रमुख वक्ते मा. श्री. अंकुश काकडे, तसेच श्री. भिडे व अन्य मंडळी उपस्थित होती.

६) **पालखी सोहळा -**

प्रतिवर्षी प्रमाणे पुणे केंद्राच्या वतीने वारकरी बंधु भगिनींना एकादशी निमित्त साबुदाणा खिचडी व स्पेशल चहा वाटप तिरंगा भवन येथे करणेत आले. सदर कार्यक्रमास लायन्स क्लब पुणे हिलटॉपचे सहकार्य प्राप्त झाले.

७) दि. १२ मार्च २००६ रोजी कै. यशवंतराव चव्हाण यांच्या ९३ व्या जयंती निमित्त यशवंतरावांचे योगदान या विषयावर कार्यक्रम आयोजित करणेत आला. मा. श्री. बापू साहेब खैरे अध्यक्षस्थानी होते. पद्मभूषण डॉ. मुजुमदार एस. कुलकर्णी

पत्रकार डॉ.मंगुडकर, चित्रपट महर्षि राम गबाले आदींनी विचार मांडले. श्री अंकुश काकडे यांनी प्रास्ताविक केले. श्री. सुरतवाला यांनी आभार मानले.

८) कै. बेगम अख्तर याच्या संगीत जीवनावर आधारित कार्यक्रम मलिक - ए गझल पुणे विभाग व सूर विहार या संस्थेतर्फे गुरूवारी पुण्यात सादर करण्यात आला. त्यावेळी ज्येष्ठ गझल गायक अभ्यासक डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी यांना मा. मोहन धारिया यांच्या हस्ते बेगम अख्तर पुरस्कार प्रदान करण्यात आला. सूत्र संचालन प्रकाश कामत यांनी केले. यावेळी श्री अंकुश काकडे, अतुल करमरकर आदि उपस्थित होते. या कार्यक्रमात हिंद केसरी श्री. योगेश दोडके यांचाही सत्कार करण्यात आला.

**महाराष्ट्र महिला व्यासपीठ पुणे केंद्र -**

१) सदर केंद्राचे कामकाज मा. बापूसाहेब खैरे यांचे मार्गदर्शनानुसार व मुंबईहून आलेल्या सूचनांनूसार चालते. श्रीमती शैला लिमये यांच्या नेतृत्वाखाली विविध प्रकारचे महिलांना उपयुक्त कार्यक्रम केले जातात. त्या प्रामुख्याने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे महिला व्यासपीठ व माझी मैत्रीण ट्रस्ट यांच्या समन्वयाने महिलांसाठी मा. बापूसाहेब खैरे यांचे अध्यक्षतेखाली नियमित सभा घेणेत येतात. त्यात श्रीमती शैला लिमये आणि श्री. भिडे व प्रा. पंडित रोजगार प्रधान कामकाज विषयक मार्गदर्शन करतात. त्यामुळे महिलांच्या उद्योजकतेस उत्तेजन मिळते व प्रत्यक्ष अर्थार्जन होते. विशेष प्रसंगी श्री. देशपांडे - स्वयंरोजगार केंद्रप्रमुख उपस्थित राहून सभेस मार्गदर्शन करतात.

२) 'माझी मैत्रीण' ट्रस्टच्या पुढाकाराने स्थापित जिजाऊ सहकारी महिला संस्थेच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या महिला प्रधान अन्नपदार्थ निर्मिती व विक्री केंद्राचे आधुनिक वास्तुत स्थलांतराचा कार्यक्रम मा. बापूसाहेब खैरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

३) माझी मैत्रिण चॅरिटेबल ट्रस्ट व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान (मुंबई) पुणे विभाग यांच्या सहयोगाने 'माझी मैत्रिण' मासिकाच्या विशेषांकाचे प्रकाशन दि. ९.३.२००६ रोजी विभागीय आयुक्त मा. पी. डी. करंदीकर यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास मा. बापूसाहेब खैरे अध्यक्षस्थानी होते. तसेच स्टेट बँक ऑफ इंडियाचे मायक्रो फायनान्स हाताळणारे अधिकारी श्री जामगडे प्रमुख पाहुणे म्हणून या तिघांनी कार्यक्रमात मार्गदर्शन केले.

४) 'सुहासिनी करंडक' या महिलांच्या एकपात्री नाटय अभिनय स्पर्धेची पूर्व तयारी म्हणून 'एकपात्री नाटय अभिनय' यावर १६ सप्टेंबर रोजी कार्यशाळा आयोजित केली होती. उद्‌घाटन अभिनेत्री दीपा श्रीराम यांच्या हस्ते झाले. जवळ जवळ ९० महिलांनी - मुलींनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. या कार्यशाळेत स्मिता तळवलकर, राहूल सोलापूरकर, सुषमा देशपांडे, वि. भा. देशपांडे व दीपा श्रीराम यांनी मार्गदर्शन केले.

**१९ सप्टेंबर २००६**

**लैंगिक शिक्षण प्रशिक्षण**

ता. पुरंदर, जि. पुणे येथील हायस्कूलच्या मुलींकरीता लैंगिक शिक्षण प्रशिक्षण आयोजित केले होते. महिला व बाल सहाय्यक कक्षांच्या रंजना गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. श्री. भैया साहेब खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली व शिक्षकांच्या सहकार्याने कार्यक्रम घेण्यात आला.

**२५ सप्टेंबर २००६**

**माहितीचा अधिकार कार्यशाळा**

भारती विद्यापीठ सोशलवर्क कॉलेज मध्ये माहितीचा अधिकार या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. श्री. पंडीत, श्री. भिडे, श्री. सिन्नरकर यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रा. देशमुखसर यांच्या संहकार्याने हा कार्यक्रम घेण्यात आला.

**सर्वधर्मसमभाव प्रशिक्षण कार्यशाळा :-**

१० सप्टेंबर २००६ रोजी सर सय्यद अहमखान फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षकांकरिता या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. असरग अली इंजिनिअर यांनी पूर्णदिवस मार्गदर्शन केले. नवमहाराष्ट्र यावा अभियानाचे संयोजक श्री. दत्ता बाळसराफ यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उदघाटन करण्यात आले. श्री. भैय्यासाहेब खैरे, प्रा. धनंजय लोखंडे, प्रा. मल्लिका मिस्त्री यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोंढे यांनी केले व समारंभाचे अध्यक्ष डॉ. अन्वर शेख उपस्थित होते.

# विभागीय केंद्र - कऱ्हाड कार्यवृत्त

महाराष्ट्र महिला व्यासपीठ - कऱ्हाड सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट व विठामाता विद्यालय कऱ्हाड यांच्या संयुक्त विद्यमाने सौ. वेणूताई चव्हाण स्मारकात वेणूताईंची ८६ वी जयंती साजरी झाली. या कार्यक्रमाचे उद्घाटन शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव प्रकाशबापू पाटील यांनी केले. प्रा. सौ. निर्मला घोरपडे अध्यक्षस्थानी होत्या यावेळी प्राचार्या सौ. विजया पाटील, कोल्हापूर, प्रा. सौ. शोभना रैनाक, कऱ्हाड यांनी वेणूताई व सावित्रीबाई यांच्या व्यक्तिरेखा साकारल्या उपस्थितांनी त्यांना भरभरुन दाद दिली.

प्राचार्य सौ. निर्मला घोरपडे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. सौ. सुनिता पाटील यांनी प्रास्ताविक केले. सौ.ज्योति रैनाक यांनी सुत्रसंचालन केले या प्रसंगी मा. मोहनराव डकरे, विठामाता विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. कमल शेलार व विद्यार्थिनी उपस्थित होते.

**यशवंतराव चव्हाण वक्तृत्व स्पर्धा (विद्यापीठस्तर) मार्च २००६**

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या 'यशवंतराव चव्हाण' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा सौ. वेणूताई चव्हाण स्मारक भवनात रविवार दि. ५ मार्च २००६ रोजी घेण्यात आल्या. सातारा, सांगली, कोल्हापूर या तीन जिल्ह्यातील ३५ महाविद्यालयांनी सहभाग घेतला. स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनातील महत्वपूर्ण पैलुंवर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्ण भाषणे केली.

मा. विद्याधर गोखले यांनी दिपप्रज्वलन करुन स्पर्धेचे उद्घाटन केले. परिक्षक म्हणून मा. मुकुंदराव कुलकर्णी (धनी), सौ. सोनल भोसेकर, सौ. सोनार यु. एल. यांनी काम पाहिले. प्रतिष्ठानचे सचिव मा. मोहनराव डकरे, श्री अनिल पाटील सर्व सेवक वर्ग यांनी सर्व व्यवस्था केली.

या प्रसंगी मा. आमदार बाळासो पाटील, मा. बाबूरावजी कोतवाल, संजय जगदाळे, अंकुश मोहिते, सुरेश पाटील (विटा), किसनराव पाटील इत्यादी मान्यवर हजर होते.

या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक - श्री हणमंत बाबूराव शिंदे, शिवाजी विद्यापीठ, द्वितीय क्रमांक - कु. ज्योती भिमराव पाटील, छत्रपती शाहू इन्स्टिटयुट कोल्हापूर तृतीय क्रमांक - श्री जयपाल खेडेकर, कृष्णा कृषी महाविद्यालय, रेठरे बु॥ यशस्वी विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु.१०००/-, रु. ७००/-, रु. ५००/- व प्रमाणप्रत्र देण्यात आले.

**D भव्य रांगोळी व ग्रंथ प्रदर्शन**

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण यांच्या ९३ व्या जयंतिनिमित्त सृजनसृष्टी ग्रुप यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या रांगोळी व पुस्तक प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या ''विरंगुळा'' निवासस्थानी भरविण्यात आलेल्या प्रदर्शनाचे उद्घाटन - विलासराव पाटील बापू (वाठारकर) यांच्या हस्ते झाले.

रांगोळी प्रदर्शनात यशवंतराव चव्हाण, त्यांच्या मातोश्री विठामाता व पत्नी सौ. वेणूताई चव्हाण यांच्या विविध भावमुद्रा असलेल्या आकर्षक रांगोळ्या रेखाटण्यात आल्या होत्या. या रांगोळ्या चि. रविराज, चि. प्रल्हाद व्हेटम, कु. अर्चना वसंत कांबळे, कु. शुभश्री संजय मोहिते, कु. शरयू कृष्णतराव भोसले, चि. शेखर साळुंखे, चि. वैभव विश्वास जाधव, कु. प्रज्ञा सुनिल काकडे आदी शालेय कलाकारांनी रेखाटल्या होत्या.

**D ग्रंथ प्रदर्शन १२ मार्च २००६**

पुस्तक प्रदर्शनात यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावरील सुमारे १२० पुस्तके मांडण्यात आली होती. साहेबांनी लिहीलेली व साहेबांच्या विषयी इतरांनी लिहीलेल्या विविध ग्रथांचे प्रदर्शनात ''विरंगुळा'' बंगल्यात भरविण्यात आले होते. कृष्णकाठ, भुमिका, ऋणानुबंध, शिवनेरीच्या नौबत्ती, युगंधर, यशवंतराव चव्हाण समग्र साहित्य सूची, शब्दाचे सामर्थ्य, साहेबांची निवडक भाषणे इत्यादी विविध पुस्तकाबरोबर पी. एच. डी., एम. फीलचे १२ प्रबंध मांडण्यात आले होते.

या पुस्तक व रांगोळी प्रदर्शनास केंद्रिय गृहराज्यमंत्री, ना. माणिकराव गावित, राज्याचे सहकारमंत्री, ना. पतंगराव कदम, आ. बाळासाहेब पाटील, माजी आमदार बाबूराव कोतवाल, प्रकाशबाबू पाटील, शकंराप्पा सौसुंदी, गोरख गुरुजी, स्वातंत्र्य सैनिक, इत्यादी विविध मान्यवरांनी या प्रदर्शनाचा अस्वाद घेतला. प्रदर्शन सतत तीन दिवस लोकांना पाहण्यासाठी विनामुल्य खुले होते. हे प्रदर्शन भरविण्यासाठी सृजनसृष्टीचे अध्यक्ष सतिश गायकवाड, सचिव विकास शेवाळे, प्रतिष्ठानचे सचिव मा. मोहनराव कृष्णाजी डकरे, अनिल पाटील, महिला व्यासपीठाच्या निमंत्रक सौ. शोभना रैनाक यांनी परिश्रम घेतले.

**D प्रभात फेरी**

यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालय आणि वेणूताई चव्हाण महाविद्यालयाने कऱ्हाड मधून प्रभात फेरीने अनोख्या पद्धतीने उत्साहात जयंती साजरी केली.

सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टमधील स्वर्गीय चव्हाण साहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला यावेळी प्राचार्य व्ही. ए. पाटील, प्राचार्य बी. एन. कालेकर यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सचिव मा. मोहनराव कृष्णाजी डकरे यांनी प्रतिमेचे पूजन केले. सौ. वेंणूताई चव्हाण ट्रस्टपासून महाविद्यालयीन प्राध्यापक विद्यार्थी आणि शिक्षकेत्तर कर्मचारी सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमधील सर्व कर्मचारी फेरीत उपस्थित होते.

सजवलेल्या घोडयांच्या बगीमध्ये श्री. चव्हाण साहेबांची प्रतिमा ठेवण्यात येवून फेरी काडण्यात आली.

**D ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्ग एप्रिल २००६**

विभागीय केंद्र - कऱ्हाडद्वारा संचालीत शिवाजी विद्यापीठ, प्रौढ आणि निरंतर शिक्षण केंद्र कोल्हापूरच्या ग्रंथालय व्यवस्थापन प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्गाचे उद्घाटन मा. आ. बाळासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. अध्यक्षस्थानी केंद्राचे सचिव मां. मोहनराव कृष्णाजी डंकरे होते.

ज्येष्ठ ग्रंथपाल पालेकर यांनी आपल्या मनोगतमध्ये प्रगती तंत्रज्ञान युगात ग्रंथालयाचे अनन्य साधारण महत्व आहे. ग्रंथ आणि वाचक यांच्यातील ग्रंथपाल हा दुवा आहे. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करण्यात ग्रंथापाल हा महत्वाचा घटकअसल्याचे यावेळी सांगितले.

सार्वजनिक ग्रंथालयातील अप्रशिक्षीत सेवकांनी व ग्रंथालय प्रेमीनी या अभ्यासक्रमांचा आवश्य लाभ घ्यावा असे आवाहन प्रतिष्ठानचे सचिव मा. मोहनराव कृष्णाजी डकरे यांनी त्यांच्या मनोगत मध्ये व्यक्त केले.

मा. आ.बाळासाहेब पाटील यांनी दिपप्रज्वलन करुन ग्रंथालय अभ्यासक्रम वर्गाचे उद्घाटन केले. आपल्या उद्घाटनपर भाषणात हा अभ्यासक्रम पुर्ण करणाऱ्यांना रोजगाराची मोठी संधी असल्याची अपेक्षा व्यक्त केली.

**D महाआरोग्य मेळावा एप्रिल २००६**

फेडरेशन ऑफ स्पोर्टस, सर्व्हिस ॲण्ड कल्चर कराड, व विभागीय केंद्र-कराड, कृष्ण चॅरिटेबल ट्रस्ट, कऱ्हाड यांच्या संयुक्त विद्यमने दि. १६.०४.२००६ रोज जागतीक आरोग्य दिनाचे औचित्य साधून महाआरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

येथील शिवाजी हायस्कूल मध्ये सकाळी ११ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत कऱ्हाड शहरातील व आसपासच्या परिसरातील स्त्री / पुरूष नागरीकांनी या मेळ्याचा उपयोग घेतला. कऱ्हाड शहरातील व कृष्णा वैद्यकिय ट्रस्टमधील ९० तज्ञ डॉक्टरासह, ४५ आरोग्यसेविका, ६० स्वयंसेवक व औषधविक्री प्रतिनिधीचे सहकार्य लाभले. सर्वसामान्य जनतेला महागडा औषधोपचार न परवडणारा असल्यामुळे महाआरोग्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले या मध्ये सर्व प्रकारच्या तपासण्या मोफत करण्यात आल्या.

**D सृजन बालमहोत्सव कार्यशाळा २३-२४ एप्रिल २००६**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, विभागीय केंद्र कऱ्हाड, नवमहाराष्ट्र युवा अभियान विभागीय केंद्र कऱ्हाड व कृष्णा बालवाद्यवृंद यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३ व २४ एप्रिल २००६ या दोन दिवशी सृजन बालमहोत्सव कार्यशाळा आयोजित करण्यात आली. विठामाता विद्यालय येथे ही कार्यशाळा संपन्न झाली. कऱ्हाड शहर व परीसरातील इ. १ ली ते ९ वी या वयोगटातील सुमारे १५० विद्यार्थी विद्यार्थीनींना चित्रकला, सुंलेखन, ओरीगामी व गायन याबाबतचे प्रशिक्षण घेतले. नवमहाराष्ट्र युवा अभियानच्या कऱ्हाड केंद्राच्यावतीने संघटक अभिजित कुलकर्णी यांनी कार्यशाळेचे आयोजन केले.

मुंबई येथील अनुभवी व ज्येष्ठ शुभानंद जोग, विवेक टेटविलकर, विवेक केळूसकर, विद्याधर खंडे, सुरेश भोईर यांनी विविध कलांची ओळख, प्रात्यक्षिक तसेच थेट संवाद साधत दोन दिवसांचे प्रशिक्षण दिले. कार्यशाळेत इस्लामपूर येथील दीपक कोठावळे व प्रा. नितिन शिंदे यांनी विज्ञानावर आधारित स्लाईड शो दाखवला व विद्यार्थ्यांना वेगळ्या ज्ञानाचा व माहितीचा अनुभव दिला.

कार्यशाळेचा समारोप यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विश्वस्त मा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते सौ.वेणूताई चव्हाण सांस्कृतिक सभागृंहात झाला. त्यांच्या उपस्थितीत विद्यार्थांनी गायनाचे सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खासदार श्रीनिवास पाटील तर आमदार बाळासाहेव पाटील, कृष्णा बालवाद्यवृंदाचे संकल्पक डॉ.सुरेश भोसले, सौ. उत्तरा भोसले, प्रतिष्ठानच्या कऱ्हाड केंद्राचे सचिव

मा. मोहनराव डकरे, नवमहाराष्ट्र युवा अभिनयाचे संयोजक दत्ता बाळसराफ, सहसंयोजक विश्वास ठाकूर (नाशिक) आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी व शहरातील ज्येष्ठ व्यक्तींही उपस्थित होत्या.

कार्यशाळेसाठी दीपक कोठावळे (इस्लामपूर), विरेश बाबर (कऱ्हाड), सौ. वेणूताई चव्हाण स्मारकचे सहाय्यक अनिल पाटील यांचे सहकार्य लाभले.

दरम्यान दिनांक २४ एप्रिल २००६ रोजी दुपारी २ वाजता मा. सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रतिष्ठानच्या कऱ्हाड येथील पदाधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक सौ. वेणूताई चव्हाण स्मारक येथे झाली. या बैठकीत प्रतिष्ठानच्या कऱ्हाड केंद्राचे विविध उपक्रम कार्यपद्धती व भविष्यकाळातील उपक्रमांबाबत विस्तृत चर्चा झाली. कऱ्हाड परिसरातील सामाजिक प्रश्नांबाबतही मा. सुप्रिया सुळे यांनी मार्गदर्शन केले.

**D सौ. वेणूताई चव्हाण जयंती १ जून २००६**

स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्या दिवंगत पत्नी सौ. वेणूताई चव्हाण यांची २३ वी पुण्यतीथी विभागीय केंद्र - कऱ्हाड व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट यांच्या वतीने साजरी करण्यात आली.

चव्हाण साहेबांच्या निवासस्थानी ''विरंगुळा'' बंगल्यात व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टमध्ये प्रतिष्ठानचे सचिव मा. मोहनराव कृष्णाजी डकरे, विश्वस्त अशोकराव चव्हाण व शिवाजी शिक्षण संस्थेचे सचिव मा. प्रकाशबापू पाटील यांच्या हस्ते सौ. वेणूताई व मा. चव्हाण साहेबांच्या प्रतिमेचे पूजन करुन आदरांजली वाहण्यात आली.

सायंकाळी निश एन्टरटेंमेंट प्रस्तुत ''भैरवी ते भैरवी'' या गायन मैफलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन कऱ्हाड विभागीय केंद्राचे सदस्य मा. पी. डी. पाटील, मा. विलासराव पाटील; बापू (वाठारकर) यांच्या हस्ते झाले.

**D स्वर्गीय चव्हाण साहेबांच्या छायाचित्राचे प्रदर्शन**

सौ. वेणूताई चव्हाण सांस्कृतिक सभागृहात स्वर्गीय चव्हाण साहेबांच्या विविध भावमुद्रा मान्यवरांनी दिलेल्या भेटी, अभिप्राय, दुर्मिळ छायाचित्राचे प्रदर्शनातून त्याच्या कार्याची ओळख फ्लॅश बॅक प्रदर्शनातून लोकांच्यासमोर ठेवण्याचे कार्य यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कऱ्हाड विभागीय केंद्र करत असते. सतत वर्षभर या छायाचित्र प्रदर्शनाचे कामकाज चालू असते.

**D ग्रंथालय सहल व मार्गदर्शन कार्यशाळा**

ग्रंथालय प्रमाणपत्र अभ्यासक्रम वर्ग २००६ मधील सर्व विध्यार्थ्यांची ग्रंथालय अभ्यास सहल कऱ्हाड मधील नगरवाचनालय व कृष्ण वैद्यकिय महाविद्यालयास झाली.

यावेळी विद्यार्थ्यांना नगरवाचनालयातील सुमारे दिड लाख ग्रंथाची मांडणी, वर्गवारी, ग्रंथालयाचे कामकाज इत्यादीबाबत शास्त्रशुद्ध माहिती नगरवाचनालयाचे ग्रंथपाल ए. जी. आदमणे यांनी दिली. तसेच महाविद्यालयातील संदर्भ ग्रंथाची माहिती ग्रंथपाल श्रीधर कुलकर्णी यांनी दिली.

दिनांक ०४.०६.२००६ रोजी ग्रंथालय क्षेत्रातील नामवंत मा. श्री. अरविंद टिकेकर (मुंबई) यांचे सुमारे तीन तास मार्गदर्शन ग्रंथपालन कोर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिष्ठानच्या या उपक्रमातून देण्यात आले.

**D इलेमेंट्री ग्रेड व इंटरमिजिएट ड्राईंग ग्रेड परिक्षा मार्गदर्शन व पूर्वपरिक्षा -**

'लहान सृजनांचे सृजन हेच धेय.' या ध्येयाची जाणीव ठेवून नव्या पिढीत चित्रकलेचा प्रसार व विकास व्हावा या हेतूने विभागीय केंद्र - कऱ्हाड व ''सृजनसृष्ठी'' कऱ्हाड यांच्या संयुक्त विद्यमाने इलेमेंट्री ग्रेड व इंटरमिजिएट ड्राईंग ग्रेड परीक्षा मार्गदर्शन व पूर्वपरीक्षा कार्यशाळेचे आयोजन दि. २०.०७.२००६ ते २४.०९.२००६ अखेर सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या सभागृहात आयोजित केले होते.

यात प्रत्येक रविवारी सकाळी ८ ते ११ या वेळेत कोणत्याही प्रकारचे शुल्क न घेता. कऱ्हाड मधील सर्व शाळेतील एकूण सत्तेचाळीस (४७) विद्यार्थी चित्रकलेचे प्रशिक्षण घेत होते. यासाठी श्री. सतिश गायकवाड व विकास शेवाळे याशिवाय विविध तज्ञ रंगकर्मींचे मार्गदर्शनपर व्याख्यान रंगशाळेच्या कार्यशाळेत घेण्यत आलेली होती.

या कार्यशाळेतील यशस्वी चार विद्यार्थ्यांना ''यशवंतराव चव्हाण कऱ्हाड कल्पक पुरस्कार'' देऊन सन्मानित करण्यात आले. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रतिष्ठानच्या वतीने सहभागाबद्दलचे प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यशाळेच्या समारोप कार्यक्रमाचे पाहूणे मा. प्रा. अशोकराव चव्हाण व अध्यक्ष मा. सौ. निर्मला घोरपडे होत्या.

चित्रकला कार्यशाळेत उत्कृष्ठ चित्र निर्मित केलेबद्दल रितेश मोहिते, ओमकार पवार, रणजित थोरात, रहेमा काशिद यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करणेत आले. सहभागी

सर्व प्रशिक्षणार्थींना सहभागाबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले.

D **१५ ऑगस्ट २००६**

अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात देशाचा ५९ वा स्वातंत्र्यदिन केंद्रात संपन्न झाला.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सचिव मा. मोहनराव कृष्णाजी डकरे यांच्या शुभहस्ते प्रतिष्ठानच्या ''विरंगुळा'' कार्यालयात व सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्ट मध्ये ध्वजारोहण संपन्न झाले व शिवाजी हायस्कूलच्या बँड पथकाने ध्वजवंदना दिली.

यावेळी कऱ्हाड मर्चंट सहकारी बँकेचे सर्व सेवक, प्रतिनिधी, शिवाजी विद्यालयातील विद्यार्थी, विठामाता विद्यालयातील विद्यार्थीनी, प्रतिष्ठान व ट्रस्टचे सर्व सेवक, लिबर्टी मजदूर कल्बचे मा. रामभाऊ रेपाळे, धोंडीराम भोसले, अनिल पाटील, दिपक पाटील, योगेश मुळे, साठे सर, पाठसुते सर, पवार सर इत्यादी विविध मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी ध्वजरोहणानंतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

D **ति. विठामाता स्मृतिदिन १८ ऑगस्ट २००६**

स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या मातोश्री स्व. विठामाता यांचा ४१ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या जन्मगावी 'देवराष्ट्रे' ता. कडेगांव, जि. सांगली, यशवंतराव हायस्कूल व कला, विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, देवराष्ट्रे या ठिकाणी विभागीय केंद्र कराडच्या महिला व्यासपीठामार्फत दि.१८.०८.२००६ रोजी आदरांजली वहाण्यात आली.

महिला व्यासपीठाच्या प्रमुख सौ. शोभना रैनाक यांनी विठामातांच्या अविस्मरणीय कार्याचा आढावा घेतला. या प्रसंगी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे सचिव मां. मोहनराव डकरे तसेच प्रा. छाया पाटील (कामेरी) यांचीही हृदयस्पर्शी भाषणे झाली. प्रतिष्ठानच्या वतीने मोफत पुस्तके देण्यात आली. सेवानिवृत्त शिक्षकांच्या वतीने मुलामुलींनी गणवेश वाटप करण्यात आले.

यशवंत एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री मोहनराव मोरे, उपाध्यक्ष महादेव महिंद, विश्वस्त दिनकरराव महिंद, आनंदराव मोरे, मुख्याध्यापक श्री. व्ही. बी. पाटील व त्यांचे सहकारी त्याचप्रमाणे अनेक ग्रामस्थ कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्थाविक सौ. बी. टी. साळुंखे तर आभार प्रा. सौ. व्ही. एन्.राडे यांनी मानले. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन श्रीमती एस. एस. मोरे यांनी केले.

'सूर्यमालेतील एका ग्रहावर आपण राहत असतो; परंतु त्याचेही पूर्ण ज्ञान आपल्याला नसते. सूर्यमालेतील सृष्टीचमत्कार हे अद्‌भूत आणि अगम्य असे आहेत,' असे मत प्रा. मोहन आपटे यांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई विभागीय केंद्र कऱ्हाड, महिला व्यासपीठ व डॉ.कल्पना चावला विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'सूर्यमालेतील सृष्टीचमत्कार' या विषयावरील विज्ञानविषयक व्याख्यान व स्लाईड शो मध्ये ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नेते श्री. पी. डी. पाटील, खासदार श्रीनिवास पाटील, विलासराव पाटील (वाठारकर), डॉ. रा. गो. प्रभुणे, डॉ. एस. व्ही. उमर्जीकर आदी उपस्थित होते.

भारताने सुरू केलेली चंद्र यानाची मोहीम यशस्वी झाली पाहिजे. त्यातून भारताला फार मोठा फायदा होणार आहे. असे सांगून त्यांनी चंद्र व मंगळ या ग्रहाविषयीही सविस्तर माहिती सांगितली.

सौ. शोभना रैनाक यांनी आपल्या प्रस्ताविकात प्रतिष्ठानचे विविध उपक्रमाची माहिती सांगितली. श्री. संजय पुजारी यांनी सुत्रसंचालन केले. यावेळी मतिमंद मुलांनी बनवलेले बुके देऊन उपस्थितांचे स्वागत रोबोच्या साह्याने करण्यात आले. मा. मोहनराव कृष्णाजी डकरे सचिव यांनी सर्वांचे आभार मानले. कऱ्हाड मधील सर्व विज्ञान प्रेमी नागरीक, विद्यार्थी, विद्यार्थीनींनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

D **पद्मश्री डॉ. एस.आर.रंगनाथनः स्मृतीदिन २७ सप्टेंबर २००६**

भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. शि. रा. रंगनाथन यांचा स्मृती दिन सौ. वेणूताई चव्हाण संशोधन ग्रंथालयात संपन्न झाला. सांगलीच्या जिल्हा नगर वाचनालयाच्या माजी ग्रंथपाल सौ. अबोली उमरानी या प्रमुख पाहुण्या या समयी उपस्थित होत्या, केंद्राचे सचिव व सौ. वेणूताई चव्हाण प.चॅ.ट्रस्ट कराडचे ग्रंथपाल मा. मोहनराव कृष्णाजी डकरे, ग्रंथालयातील सर्व कर्मचारी वर्ग, वाचक, अभ्यासक या समयी उपस्थित होते.

D **ग्रंथालय व्यवस्थापन परीक्षेत प्रतिष्ठानच्या कऱ्हाड केंद्राचे सुयश**

कोल्हापूर शिवाजी विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तारकार्य योजनेतंर्गत एप्रिल २००६ ते जून २००६ अखेर घेण्यात आलेल्या ग्रंथालय व्यवस्थापण प्रमाणपत्र अभ्यासक्रम परिक्षेमध्ये कऱ्हाड विभागीय केंद्राचा निकाल ९९% लागला.

यामध्ये प्रथम क्रमांक कु, आमणे गितल अमित (७०.७१), द्वितीय क्रमांक कु. शर्मा सुरज गणेशमल (६८.८५) तृतिय क्रमांक सौ. तावरे रुपाली गोकूळ (६६.८५) यांनी पटकावला.

कऱ्हाड केंद्रामार्फत एकूण ३४ विद्यार्थी परीक्षेस बसले होते, त्यापैकी २१ विद्यार्थी प्रथम श्रेणी व १२ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत पास झाले.

सदर अभ्यासक्रम वर्गाचे प्रकल्प अधिकारी म्हणून श्री. अनिल शिवाजीराव पाटील यांनी काम पाहिले. विद्यार्थ्यांच्या या नेत्र दिपक यशात ग्रंथपाल सौ. उमराणी मॅडम, पालेकर सर, आदमणे सर, कुलकर्णी सर, पवार सर, अनिल पाटील यांचा सिंहाचा वाटा आहे.

D **मान्यवरांच्या भेटी**

यशवंत विचारांनी पुनित झालेल्या सौ. वेणूताईंच्या स्मृतीनी सुगंधीत झालेल्या ''विरगुंळा'' (केंद्र य.च.प्र.) व वेणूताई चव्हाण स्मृती मंदीराला देशभरातून व महाराष्ट्रातून विविध मान्यवर, शाळा, संस्था, संघटना भेट देत असतात. पन्नासाहून अधिक नामवंतानी व असंख्य लोकांनी भेट दिली.

# विभागीय केंद्र, नागपूर कार्यवृत्त

**फेब्रुवारी :** एस्. एफ्. एस्. महाविद्यालय आणि नागपूर विद्यापीठाचा स्नातकोत्तर मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'आदिवासी मराठी साहित्य' या विषयावर दोन दिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

उद्घाटक माजी आमदार श्री एकनाथराव साळवे म्हणाले की आदिवासी आणि शेतकऱ्यांच्या व्यथा साहित्यात मांडल्या पाहिजेत. ज्येष्ठ अभ्यासक डॉ. गोविंद मेघाजी गारे म्हणाले की नवे प्रवाह शोधताना आदिवासींच्या मौखिक साहित्याचा नवीन साहित्यिकांनी अभ्यास केला पाहिजे. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री गिरीश गांधी म्हणाले की जीवनातील अनेक दालने आज उपेक्षित आहेत. त्यावर लिखाण होण्याची गरज आहे.

प्रस्तावना डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केली तर डॉ. अक्षयकुमार काळे यांनी या चर्चासत्रामागची भूमिका मांडली. प्रा. डॉ. सुनील रामटेके यांनी संचालन केले.

यानंतर झालेल्या 'आदिवासी जीवन, कला आणि साहित्य' या विषयावरील चर्चासत्रात डॉ. विनायक तुकाराम, डॉ. श. गो. देवगावकर, प्रा. माधव तारकुंडे, बाबाराव मडावी, दशरथ मडावी व सुनील कुमरे यांनी आपले विचार मांडले.

समारोपाच्या अध्यक्षस्थानी असलेले अ.भा. मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष व लोकमत चे संपादक श्री सुरेश द्वादशीवार म्हणाले आज सर्व सामाजिक प्रवाह मूळ आदिवासी संस्कृतीतून आले आहेत. डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी संचालन केले.

**मार्च :** विजय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. अक्षयकुमार काळे लिखित 'मर्ढेकरांची कविताः आकलन, आस्वाद आणि समीक्षा' या समीक्षा ग्रंथाचे प्रकाशन पद्मश्री ना. धो. महानोर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्रसिद्ध समीक्षक डॉ. निशिकांत मिरजकर होते.

मा. महानोर म्हणाले की कविता ज्याला जशी वाटते तशी असते. म्हणूनच अनेक लोकांनी लिहूनही मर्ढेकर उरतातच. डॉ. काळे यांची समीक्षा नव्या पिढीला उपयुक्त आहे. डॉ. निशिकांत मिरजकर म्हणाले की मर्ढेकरांनी ईश्वरावर श्रद्धा व्यक्त केली असली तरी ती रसिकांवर लादलेली नाही. डॉ. काळे यांचा समीक्षा ग्रंथ आस्वादक चिकित्सा व मूल्यमापन या समीक्षेच्या कसोटयांवर उतरणारा असा आहे. डॉ. काळे आपल्या मनोगतात म्हणाले की या ग्रंथाच्या लेखनासाठी जवळपास ३१ वर्षे मर्ढेकरांच्या कवितांचा त्यांनी अभ्यास केला.

प्रारंभी कुमुद मंडलेकर, श्याम माधव धोंड, प्रा. अमृता इंदूरकर आणि तुषार जोशी यांनी मर्ढेकरांच्या निवडक कवितांचे वाचन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. सुनील रामटेके यांनी केले. या कार्यक्रमाला साहित्यक्षेत्रातील दिग्गजांसह विद्यार्थी व रसिकांनी गर्दी केली होती.

विदर्भ पर्यावरण व विकास संस्था आणि सृजन प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने कवी श्री मनोहर नरांजे यांच्या 'सर्पगंधा' या कवितासंग्रहाचे प्रसिद्ध कवी प्रा. सुखदेव ढाणके यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. ते म्हणाले की, उपहासाचा उपयोग करीत टोकदार राजकीय भाष्य 'सर्पगंधा' कवितासंग्रहात करण्यात आले आहे. अध्यक्ष श्री. गिरीश गांधी म्हणाले की

आज पोट भरलेल्या वर्गासाठी नवेनवे वेतन आयोग येत आहेत, तर दुसरीकडे शेतकऱ्यांची दारूण अवस्था आहे. कवी नरांजे यांनी त्यांच्या कवितांमध्ये शेतकऱ्यांच्या या विदारक अवस्थेकडे लक्ष वेधले आहे.

सुनीता झाडे यांच्या 'कॉमन वुमन' या कवितासंग्रहाचे प्रकाशन प्रख्यात कादंबरीकार प्रा. सदानंद देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. ते म्हणाले सुनीता झाडे यांच्या कविता पुरुषी व्यवस्थेला लगाम घालण्याचे काम करीत आहे. कवितासंग्रहाचे प्रकाशन ज्यांच्या हस्ते संपन्न झाले ते आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी श्री. विजयसिंह राजपूत म्हणाले हा कवितासंग्रह केवळ स्त्रीमनापुरता नसून तो समाजातील विविध प्रवृत्तींवर बोट ठेवणारा आहे. सर्वसामान्य स्त्रीच्या जीवनाचे पद्धतशीर वर्णन करून त्यानंतर प्रश्न उपस्थित करणारा कवितासंग्रह म्हणून याकडे बघावे असे प्रतिपादन प्रसिद्ध कवियत्री डॉ. सुलभा हेर्लेकर यांनी केले. या कवितासंग्रहातील कवितांमध्ये आपल्याला आपला अंतराळ बघता येतो असे प्रसिद्ध कवी श्याम माधव धोंड म्हणाले. श्री. गिरीश गांधी यांनी भावी वाटचालीसाठी कवयित्री सुनिता झाडे यांना शुभेच्छा दिल्या. प्रतिष्ठानच्या सौ. मनीषा साधु यांनी काही निवडक कवितांचे वाचन केले.

प्रमोद काळबांडे यांनी संचालन केले तर रंगकर्मी हरीश इथापे यांनी आभार मानले.

१२ मार्च, २००६ : मां. यशवंतराव चव्हाण यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त 'यशवंतराव चव्हाण व आजचा महाराष्ट्र' या विषयावर महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष व आमदार मा. श्री उल्हास पवार यांचे अभ्यासपूर्ण व्याख्यान आयोजित करण्यात आले. ते म्हणाले मा. यशवंतराव चव्हाण हे विवेकशील व चारित्र्यवान राजकारणी होते. ते संयमी होते. कर्मठ स्वातंत्र्य सेनानी असलेले यशवंतराव एक जाणकार राजकारणी व नैतिकता जोपासणारे व्यक्तिमत्व होते. त्यांच्या विचारांवर गांधी, कार्ल मार्क्स व राजाराम मोहन राय यांच्या विचारसरणीचा प्रभाव होता.

जातीय राजकारणाला यशवतरावांनी कधीच प्रोत्साहन दिले नाही. सर्वधर्म समभावाचाच संदेश त्यांनी आपल्या कार्यातून दिला.

प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सरचिटणीस डॉ. अक्षयकुमार काळे यांनी केले तर संचालन डॉ. चंद्रभान भोयर यांनी केले. याप्रसंगी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते.

स्व. सुरेश भट यांच्यां स्मृतिदिना निमित्त त्यांच्या गजलेतील 'कालचे मुके सारे आज बोलू लागले' ही ओळ कवींनी देऊन त्यांना स्वतःची नवीन गज़ल तयार करून सादर करवयास सांगितले. या अभिनव कार्यक्रमात मिलींद तुपकर, मधुकर मुंघाटे, ह्रदय चक्रधर, प्रा. उमेशचंद्र सरोदय, प्रा. शुभांगी रथकंठीवार, प्रकाश दुलेवाले, मुरलीधर खेतकर, जीवन खोब्रागडे। देवीदास इंदापवार, प्रमोद वाळके आदि कवींनी गज़ला सादर केल्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय किर्तीचे शायर मनशा-उर-रहमान होते. श्रीमती पुष्पाताई भट, सामाजिक कार्यकर्ते श्री उमेश चौबे, कवी श्री. नीलकांत ढोले विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री. विजय जिचकर म्हणाले की स्व. सुरेश भट यांचे मराठी गज़ल आणि काव्य निर्मितीतील स्थान अढळ आहेच. त्याच बरोबर एक माणूस म्हणूनही ते फार मोठे होते.

कार्यक्रमाचे खुमासदार संचालन श्री. भोला सरवर यांनी केले. स्नातकोत्तर मराठी विभाग, नागपूर विद्यापीठ आणि युगसंवाद याच्या संयुक्त विद्यमाने 'मर्ढेकरांचे साहित्य' व 'घाशीराम कोतवाल' यावर दोन दिवसीय महाचर्चा आयोजित करण्यात आली.

'घाशीराम कोतवाल' या नाटकावरील चर्चेपूर्वी या प्रयोगाची चित्रफीत दाखविण्यात आली.

उद्घाटक श्री. गिरीश गांधी म्हणाले की घाशीरामसारखी व्यक्तिरेखा कधी मरत नाही. प्रत्येक काळात अनेक रुपात ती जीवंत राहते.

आचार्य अ.द.वेलणकर यांनी 'घाशीराम कोतवाल' हे नाटक कुठल्या नाट्यप्रकारात येते हे विशद करुन सांगतांना म्हणाले की एकीकडे संगीत तर दुसरीकडे हिंसा व कौर्य असा मेळ साधतांना तेंडुलकरानी शर्करागुठित गोळी रसिकांना दिली आहे.

डॉ. आशा सावदेकर म्हणाल्या की संवादात एक

लयबद्धता आहे. म्हणून हिला संगीतिका म्हणावे. भाषा लोकनाटयाची असून सूत्रधाराचे नविनीकरण केले आहे. श्याम माधव धोंड म्हणाले, समूह हेच या नाटकाचे क्यारेक्टर आहे. डॉ. रवींद्र शाभणे म्हणाले, समकालीन रंगभूमीच्या दृष्टीने हे महत्वपूर्ण नाटक आहे. कला-नेपथ्य-निर्मिती याविषयी बोलतांना श्री गणेश नायडू म्हणाले की अनेक स्थळे असलेल्या या प्रयोगाला 'सूचक' नेपथ्याशिवाय पर्याय नव्हता. तसेच लयबद्धता आणि गतीमानता हे वैशिष्ठ असलेल्या प्रयोगात कुठेही अवरोध निर्माण होणे हे प्रयोगाला व आशयाला ढासळणारे ठरले असते.

डॉ. प्रभा गणोरकर म्हणाल्या की 'घाशीराम' ने एक वेगळा नाटयबंध प्रभावीपणे निर्माण केला आहे. देहबाली, नृत्य, संगीत आदिंच्या चपखल प्रयोगाने नाटक परिणामकारक व ऐतिहासिक ठरले.

अध्यक्षस्थानी असलेले वसंत आबाजी डहाके म्हणाले की ऐतिहासिक पात्रांच्या जनमानसात काही प्रतिमा निर्माण होतात. त्या प्रतिमा समाजात काही बाबींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या असतात. 'घाशीराम कोतवाल' हे नाटकही असेच प्रतिनिधिक नाटक असून मूल्यहीन समाजव्यवस्थाच मांडणारे आहे.

'मर्ढेकरांचे साहित्य' या चर्चासत्राचे उद्‌घाटन प्रख्यात विचारवंत डॉ. वि.स.जोग म्हणाले की शब्दांनाअर्थ नीट तोलता आला पाहीजे. मर्ढेकरांचे शब्द असेच होते. कुरुपता, अगतिकता त्याप्रमाणे सौंदर्याचेही शब्दांकन त्यांनी केले.

मर्ढेकरांनी वाङमयीन वातावरणाला नवसंजीवनी दिली, त्यामुळे ते अजरामर झाले. त्यांनी समीक्षेला एक वेगळी उंची दिली. असे डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी सांगितले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ.प्रभा गणोरकर म्हणाल्या की गेल्या शतकात या साहित्यिकाने वाङमयात मैलाचे दगड निर्माण केले आहेत. 'शिशिरागमनापासून' त्यांच्यातील वेगळेपणास प्रारंभ झाला. त्यांच्या कवितेतील अखंडपणे चालत राहणारे चित्र, अनुभूतींचा प्रवास कुसुमाग्रज, कवी अनिल आणि रेगे या तिघांच्या कवितांपेक्षा वेगळा असल्याचे दर्शविते.

'मर्ढेकरांची कविता' या विषयावर श्री वसंत आबाजी डहाके यांनी निबंध वाचला. डॉ. राजेन्द्र नाईकवाडे, डॉ.संध्या अमृते, डॉ. सुनील रामटेके यांनी चर्चा केली.

'मर्ढेकरांचे सौंदर्यशास्त्र' या विषयावर प्रा. सुरेश देशपांडे यांनी निबंध वाचन केले. प्रा. कृष्णा राऊत, प्रा. पुरुषोत्तम माळोदे, डॉ.अशोक पळवेकर यांनी चर्चा केली.

डॉ. रवीन्द्र शोभणे यांनी ' मर्ढेकरांच्या कादंबऱ्या' या विषयावरील निबंध सादर केला. डॉ. प्रमोद मुनघाटे, प्रा. रवीन्द्र ठाकरे,डॉ. शैलेन्द्र लेंडे यांनी या निबंधावर आपली मते मांडली.

प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सरचिटणीस डॉ.अक्षयकुमार काळे यांनीं केले.

**महाराष्ट्र महिला व्यासपिठ**

८: जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र व राष्ट्रचेतना मंच संयुक्त विद्यमाने राष्ट्रनिर्मित योगदान देणाऱ्या महिलांच्या व्यक्तिरेखाची 'अभिनय स्पर्धा' आयोजित केली गेली.

या स्पर्धेत सौ. मंजुषा भास्करवार यांना रोख रु. ५००/- चे प्रथम, सौ. प्रेमा धुले यांना रोख रु. ३००/- चे द्वितीय तर कु. मुग्धा बरडे यांना रोख रु. २००/- चे तृतीय पारतोषिक मिळाले. कु. कावेरी संगमनेरकर या बालिकेला उत्तेजनार्थ रोख रु. १००/- पारितोषिक देण्यात आले.

पारितोषिक वितरण मा. श्री. गिरीश गांधी यांच्या हस्ते तर परीक्षक म्हणून सौ क्षमा कुलकर्णी, सौ. जयश्री दत्ता हरकरे व श्री. गणेश नायडू यांनी काम पाहिले.

३० मार्च २००६: जागतिक महिला दिन व सावित्रीबाई फुले स्मृतिदिन निमित्त नागपूर कारागृहातील महिला बंदिवानांसाठी विविध स्पर्धा आयोजित करुन एक अभिनव उपक्रम राबविण्यात आला. पारितोषिक वितरण मा. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली, मा. डॉ. भूषणकुमार उपाध्याय उप-महानिरीक्षक, मध्यावर्ती कारागृह, नागपूर व सामाजिक कार्यकर्ती मा. डॉ. रूपाताई कुलकर्णी यांच्या विशेष उपस्थितीत सपन्न झाला.

या सर्व स्पर्धांचे संकल्पना व नियोजन प्रतिष्ठानच्या श्रीमती शैल जैमिनी यांचे होते.

**सामाजिक आशयाची काव्यसंध्या १३ एप्रिल २००६**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब जयंतीच्या पूर्वसंध्येला केन्द्राच्या वतीने गुरुवार दि. १३ एप्रिल २००६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता सामाजिक आशयाची काव्यसंध्या आयोजित केली गेली. काव्यसंध्येच्या अध्यक्षस्थानी कवयित्री व सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती सीमाताई साखरे होत्या. या काव्यसंध्येत

डॉ.सौ.सुलभा होर्लेकर, श्रीपाद प्रभाकर जोशी (चंद्रपूर), विजयकुमार राऊत, कौमुदी पाटील, उल्हास मनोहर, प्रशांत असनारे (अकोला) विजया ब्राम्हणकर, प्रभाकरराव काळे, भास्कर पांडे यांनी भाग घेतला. यावेळी स्थानिक व विदर्भातून आलेल्या कवींनी आपल्या कवितामधून समाजातील विदारक स्थितीचे चित्र उभे केले.

कार्यक्रमाची संकल्पना मनीषा साधू यांची होती. यावेळी विजय जिचकर, डॉ.चंद्रभान भोयर , धनश्यामदास पनपालिया, उमाकांत रामटेके व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी डॉ. साखरे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आलेत. शिल्पा गडमडे यांनी संचालन केले.

**दास्तान - ए - गजल - शनिवार दि. १५ एप्रिल २००६.**

मराठी गझलेचा प्रवास दर्शवणारा दास्तान-ए-गझल चा कार्यक्रम स्व. सुरेश भट यांच्या जयंतिनिमित्त नव्या-जुन्या गझलांचा सूरमयी प्रवास घडविला कार्यक्रम राष्ट्रभाषा संकुल येथे पार पडला.

या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे उर्दू शेरो शायरीचे गाढे अभ्यासक डॉ. विनय वाईकर यांचे अभ्यासपूर्ण निवेदन आणि सोनाली दिक्षीत यांचे सुरेल गझल गायन होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. असदुल्लाह यांनी केले. मनीषा साधू यांनी आभार मानले.

**पंडीत नेहरु यांची विकासाची संकल्पना शनिवार २७ मे २००६.**

पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या पुण्यतिथिनिमित्त शनिवार दि. २७ मे २००६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता राष्ट्रभाषा संकुल येथे '' प. नेहरु यांची विकासाची संकल्पना'' या महत्वपूर्ण विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला. अध्यक्षपदावरून बोलताना दैनिक भास्कर (नागपूर)चे संपादक मा. श्री. प्रकाश दुबे म्हणाले की, पंडित नेहरु यांचे विचार राजकीय पक्षामध्ये हळूहळू लयास जात आहेत. त्यांच्या विचारांची आज देशाला गरज आहे. परिसंवादातील प्रमुख वक्ते साहित्यिक आणि चिंतक डॉ. वि. स. जोग यांनी पं. नेहरू यांच्या कार्यकालाच्या दशकाचा लेखाजोखा प्रस्तुत केला.

श्रीपाद भालचंद जोशी म्हणाले की, नेहरुंची आर्थिक निती लंडन स्कूल ऑफ एकॉनॉमिक्स होती.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. चंद्रभान भोयर यांनी केले. प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री विजय जिचकर यांनी प्रस्ताविक केले. दीप-प्रज्वलन डॉ.जोग यांनी केले.

**'त्या एका क्षणी - ग्रंथ प्रकाशन समारंभ - रविवार दि. २८ मे २००६.**

विसंगत झालेले जग आज सुसंगत करण्याचे आव्हान वैचारिक लेखकांपुढे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी जगप्रसिद्ध लेखक आल्बेर कामू लिखित 'क्रॉस पर्पज' या नाटयकृतीचा मराठी भावानुवाद - ' त्या एका क्षणी' या कलाकृतीच्या प्रकाशन समारंभ प्रंसगी केलेत.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान व युगसंवाद वाङ्मयीन आणि सांस्कृतिक चळवळी तर्फे 'त्या एका क्षणी' या नाटयकृतीचे प्रकाशन झाले. प्रसिद्ध रंगकर्मी डॉ. सतीश पावडे यांनी या पुस्तकाचे लिखाण केले आहे. व्यासपीठावर ख्यातनाम कादंबरीकार, ज्येष्ठ पत्रकार शैलेश पांडे होते.

पुणे येथील पुष्प प्रकाशनतर्फे प्रकाशित या अनुवादित नाटयकृतीचे लोकार्पण रिलायन्स इन्फोकॉमचे उपाध्यक्ष श्री रवींद्र अवटी यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी रमेश लखमापुरे, प्रा. संयुक्ता थोरात, दीपलक्ष्मी भट यांनी नाटकातील प्रवेशांचे सादरीकरण केले. प्रा. राजकुमार गणवीर यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. अनिल नितनवरे यांनी आभार मानलेत.

**'जागतिक तंबाखू विरोधी दिवस व निबंध स्पर्धा पुरस्कार वितरण समारोह - दि. ३१.०५.०६**

जागतिक तंबाखु विरोधी दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण विभागीय केन्द्र आणि इंडियन कॅन्सर सोसायटी नागपूर शाखा यांच्या विद्यमाने 'तंबाखूचे व्यसन - दुष्परिणाम व उपाय' या विषयावर शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी, मराठी, हिन्दी, या भाषांमध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत शालेय गटातून प्रथम पुरस्कार सेंटर पॉईंट शाळेच्या प्रियंक गर्ग याने पटकविला तर द्वितीय व तृतीय पुरस्कार कोंढाळीचा तेजस धानोरकर, व मॉडर्न स्कूलचा आकाश जैन यांना तर ११ वी व पुढील गटात घेण्यात आलेल्या स्पर्धेत कमला नेहरू महाविद्यालयाची प्रियंका ठाकरे हिला प्रथम तर डॉ.आंबेडकर विधी महाविद्यालयाचे प्रशांत डहाट व शिवाजी

विज्ञान महाविद्यालयाचा चारूहास धर्माधिकारी यांना दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेतील सर्व विजेत्यांना रु.१००१, रु.७०१, रु. ५०१ रोख व प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली. दि.३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिवस राष्ट्रभाषा संकुलात आयोजिण्यात आला. माजी खासदार बनवारीलालजी पुरोहित कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते.

लोकस्ताचे निवासी संपादक श्री प्रवीण बर्दापूरकर अध्यक्षस्थानी होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंडियन कॅन्सर सोसायटीचे सचिव डॉ. मनमोहन राठी यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन श्री नरेन्द्र सतीजा यांनी केले

**कृतज्ञता समारोह - दि. ११ जून २००६**

सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. संजीव चौधरी व त्यांचे मित्र श्री छोटूभाई उर्फ अब्दुल अजीज यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून आग लागलेल्या घरातून लोकांचे संरक्षण केले ही नागपूरकरांकरीता अभिमानाची गोष्ट आहे. त्यापासून आजच्या युवा पिढीने बोध घेण्यासारखे आहे. असे प्रतिपादन श्री बनवारीलाल पुरोहित यांनी डॉ.संजीव चौधरी व श्री. अब्दुल अजीज यांच्या प्रती हृदभावना व्यक्त करणाऱ्या कृतज्ञता समारोह प्रसंगी दि. ११ जून ०६ रोजी राष्ट्रभाषा संकुलात सत्कार करतांना काढलेत ! विंग कमांडर (निवृत्त) व लेखक श्री. अशोक मोटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रतिष्ठान केन्द्राचे अध्यक्ष श्री गिरीश गांधी यांनी केले. यावेळी प्रतिष्ठानच्या वतीने शाल, श्रीफळ व मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. चौधरी व छोटूभाई यांचे कुटुंबीय उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरवातीला घटनेच्या दिवशी काय घडले याची चित्रफितही दाखविण्यात आली. संचालन सौ. रेखा दंडिगे यांनी तर आभार सौ. शैल जैमिनी यांनी मानलेत.

नागपूर विद्यापीठाचे राजनीतिशास्त्राचे पूर्वाध्यक्ष प्रा. र. वि. रानडे यांचा प्रसिद्ध विचारवंत डॉ. भा. ल. भोळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी श्री गिरीश गांधी होते. 'राजनीति की भावी दिशापर' या विषयावर प्रा. रानडे यांचे मौलिक व्याख्यान झाले.

सम्यक साहित्य मंच यांच्या संयुक्त विद्यमाने 'पावसात भिजण्याचे वय निघून गेले ...' या ओळीवर तरई गजलधारा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी श्री गिरीश गांधी व प्रमुख अतिथी म्हणून नागपूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. यदु जोशी तर विशेष अतिथी म्हणून निवृत्त विंग कमांडर व प्रसिद्ध लेखक श्री अशोक मोटे उपस्थित होते. या कार्यशाळेत एकूण १७ कवींनी भाग घेतला.

**ऑगस्ट**

सम्यक साहित्य मंच यांच्या संयुक्त विद्यमाने 'आरक्षण...' या विषयावर गझलधारा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी थोर विचारवंत आणि साहित्यिक डॉ.यशवंत मनोहर व प्रमुख अतीथी म्हणून श्री. गिरीश गांधी होते.या कार्यशअळेत २३ कवींनी भाग घेतला.

द्वितीय राजस्तरीय बाल साहित्य संमेलनात 'जाऊ कवितेच्या गावात' या शीर्षकाखालील सचित्र बाल कवितांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. प्रसिद्ध कवी श्री. शंकर विटणकर यांनी या प्रदर्शनाची जबाबदारी सांभाळली. तीनही दिवस या अभिनव प्रदर्शनाला बाल, शिक्षक व पालकांचा उत्स्फूर्त आणि चांगला प्रतिसाद मिळाला. कवि कुलगुरू कालीदास संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु डॉ. पंकज चांदे यांनी या प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले. बालकुमार साहित्यिक श्री. दिनकर देशपांडे व श्री. गिरीश गांधी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

**सप्टेंबर**

'पुस्तकांच्या ओझ्याखालील शिक्षणाची अवस्था' या महत्वपूर्ण विषयावर चर्चा आयोजित केली. अध्यक्षस्थानी माजी महापौर मा. अटलबहादूर सिंग होते. विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. श्रीधर साळुंके बालरोग तज्ञ डॉ.श्रीकांत चोरघडे, मानसोपचार तज्ञ डॉ.प्रबोध, सोमलवार हायस्कूलच्या मुख्याध्यापिका डॉ.विजया देसाई, सांदीपनी हायस्कूलच्या मुख्याध्यापिका डॉ.विजया धांदे अशी तज्ञ मंडळी पालक, शिक्षक, विद्यार्थी यांच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देत होती.

प्रतिष्ठानच्या सौ. मनीषा साधु व डॉ. शिरीष उपाध्ये यांनी संचालन केले. आभार सौ. शैल जैमिनी यांनी व्यक्त केले.

'हिंदू- सिख स्नेहमीलन' या विषयावर पुणे विद्यापीठाच्या नामदेव अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. अशोक प्रभाकर कामत यांचे व्याख्यान आयोजित केले होते. अध्यक्षस्थानी श्री गिरीश गांधी होते.

डॉ. कामत म्हणाले शिख सदाचारनिष्ट न्याय,

सत्यनिष्ठ, स्वयंनिर्भर आहेत. शीख म्हणजे भक्ती आणि शक्ती प्रपंच आणि परमार्थाचे मीलन होय.

प्रस्ताविकात श्री पृथ्वीपालसिंग यांनी हिंदु आणि शीख ऐक्याची आज नितांत गरज आहे. असे सांगितले श्री गिरीश गांधी यांनीही आपले विचार प्रकट केले. प्रतिष्ठानचे डॉ. चंद्रभान भोचर यांनी आभारप्रदर्शन केले.

नागपुरातील ज्येष्ठ दिग्दर्शक व नेपथ्यकार श्री मोरूदादा कोठीवान यांचे निधन झाले. त्यांना श्रद्धांजलीपर कार्यक्रम प्रतिष्ठानचे प्रा. ज्ञानेश वाकुडकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. वक्ता म्हणून डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी, रंगकर्मी श्री सुभाष चांदुरकर व लेखक-अभिनेता श्री सुरेश कुलकर्णी उपस्थित होते.

१९०६ साली झालेल्या पहिल्या सत्याग्रहाच्या शताब्दीनिमित्त महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांसाठी 'पहिला सत्याग्रह ते स्वातंत्र्य' या विषयावर आधारित चित्रस्पर्धा आणि निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आल्या.

चित्रस्पर्धेत एकूण ३९ आणि निबंधस्पर्धेत एकूण ४४ प्रवेशिका आल्या. चित्रस्पर्धेत स्व. भाऊसाहेब सुर्वे विद्यालयाचा अंकित बी. बिटले याने रोख रु. ३००/-चा प्रथम; सोमलवार हायस्कूल खामलाच्या कु. सई विजय गोळे हिने रोख रु. २००/- चा द्वितीय तर भिडे गर्ल्स हायस्कूलच्या कु. अभिलाषा बुरसे हिने रोख रु. १५०/- तृतीय पुरस्कार मिळविला.

निबंध स्पर्धेत प्रॉव्हिडन्स गर्ल्स हायस्कूलच्या कु. नीलम हरिशचंद्र विश्वकर्मा हिने रोख रु. ३००/-चा प्रथम, भिडे गर्ल्स हायस्कूलच्या कु. शीतल दुर्योधन गवई हिने रोख रु. २००/- चा द्वितीय व सोमलवार हायस्कूल, खामलाच्या कु. गंधाली अनिल नाजपांडे हिने रोख रु. १५०/- चा तृतीय पुरस्कार मिळविला.

वयाच्या चौदा वर्षापर्यंत सर्वांना मोफत पण सक्तीचें प्राथमिक शिक्षण दिलें जावें असें शासनाच्या धोरणाचें एक मार्गदर्शक तत्त्व आपल्या घटनेंत आहे. आणि म्हणून प्राथमिक शिक्षणाचा प्रसार हें त्या दिशेनें टाकलेलें पाऊल होय असेंच सर्वत्र म्हटलें जातें. शिक्षणप्रसार ही प्रौढ मतदानपद्धतीबरोबर येणारी गोष्ट असून प्रौढ मतदानपद्धति लोकशाही राज्यकारभाराचा पाया आहे. म्हणून, आपल्या नवजात लोकशाहीर्ची मुळें खोलवर रुजविण्याच्या दृष्टीनें प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारास साहजिकच राजकीय महत्त्व आहे. त्याचप्रमाणें आपल्या प्रचंड मनुष्यबळाची कार्यक्षमता वाढविण्यासहि त्याची पुष्कळच मदत होऊं शकेल. तसें झाल्यास आर्थिक क्षेत्रांतहि त्याचे इष्ट असे परिणाम घडून येतील. शिवाय शिक्षणाच्या या प्रसारांत संस्कृतीच्या प्रसाराचीं बीजें सांटलेलीं असून त्यामुळें मानवी मूल्यें व ध्येयें आम जनतेच्या आवाक्यांत आणणें शक्य होणार आहे. मूलोद्योग शिक्षणाबाबतचे मतभेद बाजूला ठेवले, तरी घटनेच्या या मार्गदर्शक तत्त्वाची शक्य तितकी त्वरित अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीनें, निरनिराळ्या शासनांनीं प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठीं जीं पावलें टाकलीं आहेत त्यांना आज सर्वांचाच पाठिंबा आहे याबद्दल वाद नाहीं..

- यशवंतराव चव्हाण

(दि. २३ डिसेंबर १९५९ अलिगड विद्यापिठाच्या पदवीदान समारंभात केलेले भाषण)

# विभागीय केंद्र - नाशिक

**१) बचत गट मार्गदर्शक मेळावा :-**

स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त विभागीय केंद्रातर्फे रविवार, दि. १२ मार्च २००६ रोजी 'बचत गट मार्गदर्शक सोहळ्याचे' आयोजन करण्यात आले.

के. टी. एच. एम. महाविद्यालयाच्या रावसाहेब थोरात सभागृहात सकाळी ११.०० वाजता मा. ना. सुर्यकांता पाटील - केंद्रीय ग्रामविकास व संसदीय कार्य राज्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत, मा. महेश झगडे, जिल्हाधिकारी नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली मेळावा संपन्न झाला.

महिला बचत गटांच्या माध्यमातून उत्पादीत केलेला माल जास्तीत जास्त बाजारपेठेमध्ये जाण्यासाठी तसेच मालाला मागणी वाढावी व व्यवसायवृद्धी होणेसाठी प्रतिष्ठानमार्फत विशेष प्रयत्न सुरू केले आहेत.

महिलांचे सबलीकरण व संघटन यासाठी निर्णय क्षमता, संवाद कौशल्य वाढविणे, संघटनेची शक्ती व त्यामुळे होणारी कामे यांची परस्पर जाणीव करुन देणे, जीवनाचा स्तर उंचाविण्यासाठी प्रयत्न करणे, स्वयंसहायता समूह चळवळीने स्त्रियांच्या स्वतःच्या मनावरील रुढी, परंपरा आणि पूर्वग्रह यांचा पगडा दूर करण्यासाठी, त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी बचत गट मार्गदर्शक मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्यात सुमारे २००० महिला उपस्थित होत्या.

**२) 'मुलांचे आरोग्य पालकांच्या हाती' पुस्तक प्रकाशन :-**

डॉ. सुभाष काश्यपे लिखित तसेच विभागीय केंद्र नाशिक व राजहंस प्रकाशन निर्मित 'मुलांचे आरोग्य पालकांच्या हाती' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. ४ जून २००६ रोजी आय. एम. ए. हॉल, नाशिक, येथे सायंकाळी ६.०० वाजता मा. डॉ. स्नेहलता देशमुख, माजी कुलगुरू मुंबई विद्यापिठ, मुंबई यांच्या शुभहस्ते व मा. डॉ. संजय चहांदे, विभागीय महसूल आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

बाल संगोपन या विषयाचे महत्व दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. प्रसूतीची चाहूल लागल्यापासून कोणती काळजी घ्यावी, लहानग्या बाळाला दूध कसे पाजावे, स्तनपानाबद्दलचे समज-गैरसमज कसे दूर करावेत, केव्हा आणि कोणती लस टोचावी, यासारख्या अनेक रुढ प्रश्नांची उत्तरे तर या पुस्तकात आहेतच; पण मुलाने/मुलीने किशोरावस्था ओलांडेपर्यंत पालकांनी त्याची जडणघडण कशी करावी, त्याचे / तिचे भवितव्य सुरक्षित व्हावे म्हणून योग्य वेळीच कोणते नियोजन कसे करावे, याचे अनुभवजन्य मार्गदर्शनही या पुस्तकात केलेले आहे.

**३) युवा अभिवादन फेरी :-**

शहीद भगतसिंगांच्या जन्मशताब्दी वर्ष व भारताच्या ६० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त नवमहाराष्ट्र युवा अभियान नाशिकतर्फे 'युवा अभिवादन फेरी' सोमवार, दि. १४ ऑगस्ट २००६ रोजी रात्री १०.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिवाजी रोड येथील पुतळ्यास अभिवादन करून शालीमार, खडकाळी सिग्नल, दुध बाजार, दामोधर थिएटर, गाडगे महाराज पुतळा, रविवार कारंजा, रेडक्रॉस सिग्नल, एम. जी. रोड मार्गे हुतात्मा स्मारक येथे समाप्त झाली. या प्रसंगी शहरातील नागरिक व विविध महाविद्यलयातील सुमारे १५० युवा/युवतींनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. शहरातील चौकामध्ये युवा अभिवादन फेरीमध्ये नागरिकांनी सहभाग नोंदविला.

राष्ट्राच्या आयुष्यात ६० वर्षे हा फार मोठा प्रवास नाही. आमच्या पिढीने भारतात असणारी लोकशाही अधिक सक्षम व्हावी, देशातील गरीबांपर्यंत ती पोहचवावी यासाठी अनेक प्रयत्न केले. त्या प्रयत्नांचा वारसा आम्ही पुढच्या पिढीला या अभिवादन फेरीमध्ये देत आहोत, असे प्रतिपादन विभागीय केंद्राचे सचिव ॲड. विलास लोणारी यांनी केले.

प.जवाहरलाल नेहरु यांच्या आकस्मात निधनानंतर, पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या आकस्मित हत्तेनंतरही तसेच माजी पंतप्रधान राजीव गांधीच्या हत्येनंतरसुद्धा लोकशाही अबाधीतच राहिली. भारतीय माणसांप्रमाणेच भारतीय लष्कराचीसुद्धा

भूमिका लोकशाहीवादीच आहे आणि लष्कराची देखील लोकशाहीवर श्रद्धा आहे. ही लोकशाहीवर असणारी श्रद्धा टिकवण्याची जबाबदारी तुमच्यासारख्या तरूणांवर आहे असे प्रतिपादन डॉ. कैलास कमोद यांनी व्यक्त केले.

'युवा अभिवादन फेरी' स आ.डॉ. शोभाताई बच्छाव यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विश्वास को.ऑप. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हरी कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना देशाला दहशतवाद्यांनी विळखा घातला आहे. याविरुद्ध मोठया प्रमाणावर लढा उभा करण्याची जबाबदारी आजच्या तरुणांवर आहे.

या युवा अभिवादन फेरीच्या समारोपप्रसंगी बाबा आमटे यांचे बरोबर दीर्घकाळ काम केलेले मुकूंद दिक्षीत यांनी लोकशाही टिकवायची असेल तर लाच घेणार नाही त्याचप्रमाणे लाच देणारही नाही असा सर्वांनी संकल्प करावा, असे मत व्यक्त केले. जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक वसंत (बाबा) हुदलीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. मध्यरात्री १२.०० वाजता हुतात्म्यांना अभिवाद करण्यासाठी तरूण व तरूणींची एवढया मोठया प्रमाणावरील उपस्थिती याचा अर्थ भारतातील लोकशाही तरूणांच्या रक्तारक्तात भिनलेली आहे, हे सिद्ध करते. या प्रसंगी भारताच्या सरनाम्याचे वाचन मंदार भारदे यांनीकेले. मनिष वाघमारे यांनी देशभक्तीपर गीतांचे गायन केले आणि या फेरीचा समारोप करण्यात आला.

- - - - - - - - - - - - XXXXX - - - - - - - - - - - XXXXX - - - - - - - - - - - XXXXX - - - - - - - - - - - XXXXX - - - - - - - - - - -

# कोकण विभाग - कार्यवृत्त

दिनांक १४-०३-२००६ ते दिनांक १९-०३-२००६ या कालावधीत महिलांना गृहउद्योग करण्याच्या दृष्टीने विक्री योग्य पदार्थाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. या प्रशिक्षणाचे प्रायोजिकत्व बँक ऑफ महाराष्ट्रने स्विकारले आहे. त्यात एकूण १०३ महिलांनी प्रशिक्षणाचा लाभ घेतला त्यामध्ये २ ठराव पास करण्यात आले. त्यातील आंबा निर्यातचे निवेदन अध्यक्ष श्री. भाऊसाहेब नेवाळकर यांनी केले.

२. दिनांक २८-०३-२००६ रोजी लांजा येथे झालेल्या मासिक सभेत ठरल्याप्रमाणे येथील कोंडये गावी दि. २४-०४ २००६ रोजी श्री. मधु पाल्ये यांच्या गावातील बागायतदार व शेतकरी यांची सभा कोकण कृषि विद्यापिठाचे माजी कुलगुरू श्री. श्रीरंग कद्रेकर, यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. त्याचा थोडक्यात वृत्तांत पुढीलप्रमाणे :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने गावागावांतून कृषिविषयक बाबींकडे लक्ष देण्याचे ठरविले असून त्याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून त्यांची आर्थिक बाजू मजबूत करण्यासाठी त्यांच्या अडीअडचणी समजून कार्य करण्यात येत आहे.

शासकीय अधिकारी श्री. कुलकर्णी साहेब, यांनी, खरीप कामात जी शेती करावयाची आहे, त्याबाबतचे मुद्दे मांडून मार्गदर्शन केले. अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये पुढे म्हणाले की, आम्ही हाती घेतलेल्या कार्यक्रमात आपल्या सर्वांचा सहभाग महत्वाचा आहे. बाराही महिने सर्वत्र हिरवेगार दिसले पाहिजे असा विचार करून गावात पायलट प्रोजेक्ट यशस्वी करून दाखवावयाचा आहे व आपल्या गावाचा नावलौकीक वाढवावयाचा आहे.

सभा संपल्यानंत्तर गावातील सरपंच व प्रमुख शेतकरी व्यक्ती यांची तेथील वीज प्रश्नावर जी अडचण निर्माण झालेली होती त्याबाबत प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने चर्चा झाली.

३. दिनांक २०-६-२००६ रोजी झालेल्या जिल्हा समिती रत्नागिरीच्या सभेचा इतिवृत्तांत :

मा. अध्यक्ष श्री, राजाभाऊ लिमये, यांनी माहे एप्रिल ते माहे मे महिन्यात झालेल्या कार्यक्रमाविषयी सविस्तर चर्चा केली. तसेच, माहे जुलै ०६ ते माहे मार्च ०७ या कालावधीत महिलांसाठी आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचे नियोजन करावे अशा सूचना महिला सदस्या सौ. स्मितल पावसकर यांना अध्यक्षांनी दिल्या.

मा. श्री श.ग. काळे साहेब, यांचे उपस्थितीत करावयाच्या कार्यक्रमाबाबत श्री. सुनिल शिर्के यांनी विषय मांडला. त्यावर मा. अध्यक्षांनी सांगितले की, मा.कोकण विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब नेवाळकर, यांच्याशी संपर्क साधून

इंडस्ट्रियल हेल्थ क्लब स्थापन करण्याच्या कार्यक्रमाबाबत तारीख नक्की करून कळविण्यास सांगितले.

श्री. कद्रेकरांनी छोटा विद्युत प्रकल्प अहवाल दिला त्यानुसार पुढील कार्यक्रम घेण्याचे ठरले.

४. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती रत्नागिरीच्या वतीने मारुती मंदिर येथील कार्यालयाच्या वरच्या मजल्यावरील हॉलमध्ये दि. २४/०८/२००६ रोजी बचत गटातील व इतर महिलांसाठी व्यवसायविषयक व आरोग्य विषयक जागृती या विषयीचे उद्‌बोधन तसेच सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महिलांना आयोग्यविषयक उद्‌बोधन करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या व जिल्हा महिला पतपेढीच्या माजी चेअरमन सावर्डा येथील सौ. युगंधरा राजेशिर्के यांना प्राचारण करण्यात आले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट म्हणजे मुस्लीम महिलांनी नऊवारी साडीत हिंदू समाजाप्रमाणे शृंगार करुन नृत्यात भाग घेतला. उपस्थित सर्व महिलांनी उसफुर्तपणे फुगडया घातल्या व शेवटी अल्पोपहार देवून कार्यक्रमाची सांगता केली.

xxxxx xxxxx xxxxx xxxxx

# औरंगाबाद विभाग केंद्र कार्यवृत्त

## मा. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते

## पद्मभूषण बाळासाहेब भारदे

## ॲकेडमीचे उद्‌घाटन.

महात्मा गांधी सेवा संघ औरंगाबाद व नवमहाराष्ट्र युवा अभियान संचालित पद्मभूषण बाळासाहेब भारदे ॲकेडमी व विविध उपक्रमांचे उद्‌घाटन मा. सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

दि. ३१ जुलै २००६ रोजी सकाळी ११ वाजता पार पडलेल्या उद्‌घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, औरंगाबाद विभागीय कार्यालयाचे सल्लागार डॉ. बापूसाहेब काळदाने उपस्थित होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस मा. मधुकर अण्णा मुळे, जेष्ठ विधिज्ञ ॲड प्रदीप देशमुख, प्रतिष्ठानच्या औरंगाबाद विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. नंदकिशोर कागलीवाल, नवमहाराष्ट्राचे संयोजक मा. दत्ता बाळसराफ, सहसंयोजक मा. विश्वास ठाकूर, स्वातंत्र्य सैनिक लक्ष्मीनारायाण जैस्वाल, लातूर, विभागीय केंद्राचे नवमहाराष्टाचे विभागीय संघटक मां. संजय शेटेआदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन नवमहाराष्ट्राचे औरंगाबाद संघटक अरूण रसाळ यांनी केले. सहसंघटक नीलेश राऊत यांनी आभार मानले. भारदे ॲकेडमी मध्ये सामाजिक कार्यकर्ता प्रशिक्षण वर्ग, शारीरिक पुनर्वसन व मार्गदर्शन केंद्र, पत्रकरिता प्रशिक्षण वर्ग, इंग्लिश लर्निंग सेंटर बुक उद्देशीय माहिती केंद्र आदी उपक्रम चालणार आहेत.

## चित्रपट रसास्वाद कार्यशाळा संपन्न

दि. १५ सप्टेंबर रोजी नवमहाराष्ट्र युवा अभियान विभागीय केंद्र औरगाबाद व वसंतराव नाईक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'चित्रपट रसास्वाद कार्यशाळेचे' आयोजन करण्या आले होते. या कार्यशाळेत इकाचे आंतरराष्ट्रीय चित्रपट समिक्षक अशोक राणे यांनी चित्रपटाचे रसग्रहण कसे करावे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य राजाराम राठोड प्राचार्य शेख समद, नाटककार प्रा. अजित दळवी, विजय कान्हेकर, दीपक पवार, नीलेश राऊत आदी उपस्थित होते. या कार्यशाळेसाठी सुहास तेंडुलकर, अरूण रसाळ यांनी सहाय्य केले.



# यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना राज्यस्तरीय पारितोषिक २००६ माननीय श्री भवरलाल हिरालाल जैन

## सन्मानपत्र

भारताच्या कृषी आणि ग्रामीण संस्कृतीच्या समृद्ध परंपरेचा वारसा घेवुन महाराष्ट्रातील जळगांव जिल्ह्यातील वाकोद या छोटयाशा गावात श्री. भवरलाल हिरालाल जैन यांचा जन्म दि. १२ डिसेंबर १९३७ रोजी झाला. त्यांच्या मातोश्री गौराबाई. प्राथमिक शिक्षण वाकोद येथे पार पडल्यानंतर पुढील शिक्षण त्यांनी जळगांवला घेतले व त्यानंतर मुंबईला महाविद्यालयीन शिक्षण घेऊन ते व्यापार व कायदा या क्षेत्रातील पदवीधर झाले. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून त्यांची राजपत्रित अधिकारी पदासाठी निवडही झाली. परंतु नोकरीतील चाकोरीबद्ध जीवन न जगता काहीतरी वेगळे करायचे असे त्यांनी ठरवल व मातोश्रीकडून रुपये सात हजारांचे भांडवल घेऊन ते व्यवसायात उतरले. रॉकेल विक्रीपासून सुरूवात करुन क्रमाक्रमाने त्यांनी शेतीशी संबंधित अशा खते, बी बियाणे, जंतुनाशके व ट्रॅक्टर या वस्तूंच्या विक्रीच्या क्षेत्रात पदार्पण केले. व्यवसायांतील ही चढती कमान म्हणजे त्यांच्या व्यवहार व व्यापार कौशल्याचे गमक होते. आपल्या व्यवसायात स्थिरस्थावर झालेले असतांना अचानकपणे एक दिवस त्यांच्या पेट्रोल पंपावर स्कॉटिश मिशनची रिग डिझेल घेण्यासाठी आली. त्या रिगवर लिहिले होते. 'ॲग्रीकल्चर, ए प्रोफेशन विथ फ्यूचर'. (शेती-एक उज्वल भवितव्य असलेला व्यवसाय) या संदेशातून त्यांना आपल्या पुढील कार्याची प्रेरणा मिळाली असे म्हणता येईल. शेती आणि शेतकरी यांच्या समृद्धीतूनच देशाच्या सर्वांगीण प्रगतीची वाटचाल करता येईल असा त्यांना मनोमनी विश्वास होता. त्या विश्वासाने त्यांनी कृषी-औद्योगिक विकासाच्या मार्गावर पुढील वाटचाल सुरु केली.

१९७८ साली केळ्यावर प्रक्रिया करण्याचा, एक आजारी कारखाना विकत घेऊन तिथे त्यांनी पपईच्या चिकापासून पपेन बनविण्यास सुरुवात केली. उत्कृष्ट दर्जाच्या उत्पन्नामुळे हा उद्योग आजही जगामध्ये गुणवत्तेत प्रथम स्थान टिकवून आहे. १९८० मध्ये त्यांनी पीव्हीसी पाईप करण्याचा कारखाना सुरु केला व त्यातूनच पुढे तुषार सिंचनपद्धत, ठिबक सिंचनपद्धत यासाठीचे पाईप आणि आवश्यक ते सर्व छोटे-मोठे भाग जोडलेली संपूर्ण यंत्रणा त्यांनी विकसित केली. पाणी म्हणजे शेतीचा प्राण आहे या जाणिवेतून पाण्याचा काटेकोरपणे वापर करुन जास्तीत जास्त उत्पादन कसे घ्यावे यासाठी त्यांनी ठिबक सिंचनाच्या तंत्रज्ञानाचा जोमाने प्रसार केला व देशाला जलक्रांतीच्या उंबरठयावर नेले. आजमितीस देशात १० लाख हेक्टर्सपेक्षा जास्त क्षेत्र जैन ठिबक सिंचन प्रणालीच्या आधारे ओलिताखाली आलेले आहे. उपलब्ध पाण्याचा आवाका वाढविणारे हे तंत्रज्ञान म्हणजे महाराष्ट्रासारख्या अवर्षण प्रवण राज्याला मिळालेले वरदानच आहे.

त्यांनी विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारित अत्याधुनिक प्रकल्प उभारुन कृषि-औद्योगिक क्षेत्रांतील पुढचे पाऊल टाकले. वेगवेगळ्या फळांवरील प्रक्रिया प्रकल्प, हरित व शीतगृहे, जैविकतंत्रज्ञान, प्रयोगशाळा, शेती संशोधन आणि विकास केंद्र इत्यादि प्रकल्पांच्या माध्यमांतून संपन्नतेकडे नेणारा राजमार्ग त्यांनी शेतकऱ्यांना खुला करुन दिला. भारतीय शेतकऱ्यांना आत्मविश्वास आणि आशावाद यांचे बळ देतांनाच आपल्या उद्योगांमध्ये जोपासलेल्या गुणवत्तेच्या व कार्यसंस्कृतीच्या आधाराने त्यांनी जागतिक बाजारपेठेत अग्रगण्य स्थान मिळवले.

कृषि-उद्योगांतील नेत्रदीपक यशामुळे त्यांना अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाले. त्यांत फाय फाउंडेशन, जमनालाल बजाज, गांधी-आंबेडकर सामाजिक न्याय पुरस्कार हे त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे द्योतक आहेत. अमेरिकन इरिगेशन असोसिएशनतर्फे देण्यात आलेला 'क्रॉफर्ड रीड' स्मृति पुरस्कार त्यांच्या सिंचनक्षेत्रातील असाधारण कतृत्वाची साक्ष देणारा आहे. अनेक विद्यापीठांनी त्यांच्या तंत्रज्ञानातील व्यासंगाची व विचारप्रवर्तक साहित्याची दखल घेऊन त्यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' व डॉक्टर ऑफ लेटर्स' अशा पदव्या बहाल करून सन्मानित केले आहे. भारताची विकास व्यवस्था महानगरामध्ये किंवा राजकीय व प्रशासकीय केंद्रामध्ये अडकून राहू नये याउद्देशाने रोजगार पुरवणारे

उत्पादक उद्योग ग्रामीण परिसरांत उभारुन त्यांनी विकास प्रक्रियेचा पाया विस्तारित केला. त्यांच्या सर्व उपक्रमात व्यावसायिकता, विज्ञान व तंत्रज्ञान, आर्थिक शिस्त आणि अपरिमित परिश्रम घेण्याची तयारी या गुणांचा संगम झाल्यामुळे सात हजार रुपयांच्या भांडवलावर सुरु झालेल्या छोटया व्यवसायापासून जैन उद्योग समूहाचा व्याप हजार कोटी रुपयांच्या पुढे गेला आहे. 'इवलेसे रोप लावियले दारी, त्याचा वेलु गेला गगनावरी' हे ज्ञानेश्वरांचे बोल सार्थ ठरावेत अशीच श्री. भवरलालजींची यशोगाथा आहे. नियोजनपूर्वक परिश्रमातून प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन यश मिळविण्यात त्यांच्या कार्यसंस्कृतीचे एक प्रतीक म्हणजे शिरसोली डोंगरमाळ या ओसाड टेकडीचे त्यांनी हिरव्यागार नंदनवनात केलेले रुपांतर. शेतीचा विकास हाच देशाचा समृद्धीचा आधार होऊ शकतो या श्रद्धेतून त्यांनी उभारलेले सर्व उद्योग व उपक्रम, शेतीशी व शेतकऱ्यांशी निगडित आहेत.

आधुनिक महाराष्ट्राचे द्रष्टे शिल्पकार मा. यशवंतराव चव्हाण यांनी कृषी-औद्योगिक समाजरचनेवर आधारित विकासाचे ध्येय जनतेसमोर ठेवले होते व त्यांचा सामान्य शेतकऱ्यांच्या सुजाण प्रयोगशीलतेवर दृढविश्वास होता. त्यांचा हा विश्वास सार्थ ठरविणाऱ्या श्री भवरलाल हिरालाल जैन यांना यशवतराव चव्हाण कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक २००६ आज दिनांक २५ नोव्हेंबर २००६ रोजी मा. यशवंतरावांच्या पुण्यस्मृतिदिनी प्रदान करताना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विशेष आनंद होत आहे.

मुंबई
दिनांक : २५ नोव्हेंबर २००६

**शरद पवार**
**अध्यक्ष**
**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई.**

## आतापर्यंत 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक' प्राप्त मान्यवर

| अ.क्र. | दिनांक | मान्यवर | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | १२.०३.१९९० | मा.तात्यासाहेब कोरे | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| २ | १२.०३.१९९१ | मा. बाबा आढाव | सामाजिक एकत्मता पारितोषिक |
| ३ | १९९२ | मा. विजय बोराडे | ग्रामीण विकास पारितोषिक |
| ४ | १२.०३.१९९३ | मा. नारायण सुर्वे | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| ५ | २५.११.१९९४ | मा. आप्पासाहेब चमणकर | कृषी - औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| ६ | १२.०३.१९९५ | श्रीमती शांताबाई दाणी | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| ७ | २५.११.१९९६ | मा.अरूण निकम | ग्रामीण विकास पारितोषिक |
| ८ | २५.११.१९९७ | मा. शंकरराव खरात | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| ९ | २५.११.१९९८ | डॉ. जयंतराव पाटील | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १० | २५.११.१९९९ | मा. दादासाहेब रुपवते | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| ११ | २५.११.२००० | सर्च-शोधग्राम, गडचिरोली | ग्रामीण विकास पारितोषिक |
| १२ | २५.११.२००१ | कवयित्री शांता शेळके | मराठी साहित्य-संस्कृती पारितोषिक |
| १३ | २५.११.२००२ | 'प्रयोग' परिवार या संस्थेला दिले | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |
| १४ | २५.११.२००३ | डॉ. यू. म. पठाण | सामाजिक एकात्मता पारितोषिक |
| १५ | २५.११.२००४ | डॉ. चित्रा नाईक, पुणे | ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास |
| १६ | २५.११.२००५ | पं. भीमसेन जोशी | मराठी साहित्य-संस्कृती/कला, क्रीडा पारितोषिक |
| १७ | २५.११.२००६ | मा. भवरलाल जैन | कृषी-औद्योगिक समाजरचना पारितोषिक |

# प्रतिष्ठानची विक्रीसाठी असलेली प्रकाशने :

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१. | यशवंतराव चव्हाण : विधी मंडळातील निवडक मराठी भाषणे भाग १<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २००.०० |
| ०२. | वाय. बी. चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस-विधीमंडळ भाग २<br>संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०३. | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट-वाय. बी. चव्हाण खंड १ ते ४<br>संपादन : राम प्रधान | प्रत्येकी २५०.०० |
| ०४. | यशवंतराव चव्हाण यांचे मौलिक विचार संकलन - ना. धों. महानोर | ३.५० |
| ०५. | सह्याद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ०६. | म. ज्योतिबा फुले यांचे निवडक विचार संकलन - प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ०७. | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास - संपादक - वि. स. पागे | ३५.०० |
| ०८ | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन - संपादन - अण्णासाहेब शिंदे | ६०.०० |
| ०९. | महाराष्ट्र : एक दृष्टीकोन - शरदराव पवार - भाषणसंग्रह - संपादन - दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १०. | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास - संपादन पी. बी. पाटील | १००.०० |
| ११. | नवभारत : परिवर्तनाची दिशा - संपादन - पी. बी. पाटील | १००.०० |
| १२. | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास - संशोधक / लेखक - लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३. | महिलांसंबंधीचे धोरण : स्वयंसिद्धतेकडे वाटचाल - डॉ. नीलम गोऱ्हे | १५.०० |
| १४. | यशवंतराव चव्हाण - चरित्र - लेखक - अनंतराव पाटील | ८०.०० |
| १५. | शब्दांचे सामर्थ्य - संपादन, राम प्रधान | ३७५.०० |
| १६. | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी)<br>(यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १७. | बाऊंटीफूल बनियन - डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र खंड ४ (इंग्रजी)<br>- बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १८. | ज्येष्ठ नागरिकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १९. | अजिंठा - (काव्यसंग्रह) लेखक - ना. धो. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| २०. | 'ई' बुक (मराठी/इंग्रजी) (यशवंत साहित्य / फोटो) | १५०.०० |

## • व्हिडिओ कॅसेटस् •

★ मी. एस.एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट

★ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट

★ प्रवासी पक्षी : सुप्रसिद्ध साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट

★ पुल वृत्तांत : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट

या चारही व्हिडीओ कॅसेटस्‌ची निर्मिती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने केली असून दिग्दर्शनाची जबाबदारी सुप्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.

★ कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शन - श्री. राम गबाले

★ येस् आय एम कम्युनिस्ट : कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट
दिग्दर्शन - विनय नेवाळकर

'सृजन' कार्यशाळेतील मुलांशी संवाद साधताना मा. सुप्रियाताई सुळे व मार्गदर्शन करताना प्रा. शुभानंद जोग.
(चव्हाण सेंटर, मुंबई)





'सृजन' कार्यशाळेत रमून गेलेली मुले.
(चव्हाण सेंटर, मुंबई)

नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या पंचवार्षिक आराखडयानिमित्त प्रसिद्ध करण्यात आलेल्या पोस्टरचे प्रकाशन करतांना डावीकडून कांचनमाला गावंडे, मा. सुप्रिया सुळे, मा. शरद काळे, मा. हुसेन दलवाई, मा. डॉ. रविंद्र बापट, दत्ता बाळसराफ व विश्वास ठाकूर.
(चव्हाण सेंटर, मुंबई)





यशवंतराव चव्हाण याच्या ९३ व्या जयंतीनिमित्त - **यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २००५** पुरस्कार प्रदान करताना डावीकडुन मा. हुसेन दलवाई, मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख, पुरस्कार विजेते मा. सॅम पित्रोदा, मा. अरूण गुजराथी, मा. न्या. वाय. व्ही. चंद्रचूड.
( चव्हाण सेंटर, मुंबई )

**यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार-२००५** प्रमुख मान्यवर : मा. सुप्रिया सुळे सन्मानपत्राचे वाचन करताना, मा. शरद काळे, मा. शिवाजीराव पाटील, निलंगेकर, मा. हुसेन दलवाई, मा. मुख्यमंत्री विलासराव देशमुख, मा. सॅम पित्रोदा, मा. अरूण गुजराथी, मा. न्या. वाय. व्ही. चंद्रचूड.
( चव्हाण सेंटर, मुंबई )





यशवंतराव चव्हाण जयंती समारंभ - नाशिक येथे मार्गदर्शन करताना केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री मा. ना. सूर्यकांता पाटील.
(नाशिक)

Designed & Printed by : SANAP P. PRESS, Mumbai - 400 002 Tel. : 22069607